**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८५१

निर्णय दिनांक ०१-०२-२००८

श्री. विश्वनाथ आण्णासाहेब मोरे, : अपिलार्थी

रा. मु. पो. बर्दापूर, तालुका अंबाजोगाई,

जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा नायब तहसीलदार (महसूल),

अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, अंबाजोगाई,

जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विश्वनाथ आण्णासाहेब मोरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), अंबाजोगाई श्री. सुजीत नरहरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई श्री. प्रशांत सुरेशराव सुर्यवंशी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून बर्दापूर जिल्हा बीड येथील जमीन गायरान गट नंबर १ आणि ५ संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. बर्दापूर येथील जमीन गायरान ग. नं. १ आणि ५ संबंधी मूळ अर्ज दि. १६-१-०६ चौकशी प्रमाणे निवेदन दि. ७-४-०६ अर्ज दि. १२-६-०६ प्रमाणे कागदपत्राची पूर्तता, अर्ज दि. १८-७-०६ ची पूर्तता करणे मुद्दे १ ते ३ चे अवलोकन व्हावे.

२. बर्दापूर येथील वहिती जमीन ग. नं. ५ क्षेत्र ५६ आर या जमिनीवर मालकी नोंद सरकारी आहे. सदर जमिनीवर इतर हक्कात बोझा मठ महालिंग, चिंच झाडे १२, विहीर एक स्वतंत्र ही नोंद घेण्यात आली आहे. ही नोंद कोणत्या हक्काव्दारे अथवा कोणत्या रेकॉर्ड आधारे नोंद घेण्यात आली आहे याचा खुलासा माहिती द्यावी.

३. सदरी जमीन ग. नं. ५ क्षेत्र ५६ आर ह्या जमिनीचा भोगवटा ताबा सरकारी अशी नोंद रेणूक विद्यालय संस्थेने पूर्ण बांधकाम कोणत्या अधिकाराखाली केले, कोणाच्या परवानगी केले आहे ते अधिकृत आहे काय ? सरकारने कोणत्या आदेशाने सदर संस्थेस बांधकामाची अथवा वास्तव्य करण्याची परवानगी दिली आहे ? सदर संस्थेच्या या संबंधी मालकी भोगवट्याविषयी काय पुरावे आहेत ? सदरी संस्थेने शासनाकडे यापूर्वी, यासंबंधी मागणी केली आहे ? यासंबंधी जिल्हाधिकारी साहेब, बीड यांनी तशी मान्यता, परवानगी दिली आहे काय ? सदर ग. नं. ५ हा सरकारी मालकीचे असलेने संस्थेने केलेले बांधकाम अथवा बेकायदेशीर वास्तव्य हे काढून टाकण्यात यावे, तसेच

या जमिनी शासकीय कामासाठी अथवा शासकीय प्रयोजनासाठी ताब्यात घेण्यात यावी.

४. सरकारी जमीन ग. नं. १ क्षेत्र ५ गुंठे एकत्रीकरण आधी ही जमीन १० गुंठे होती ती का कमी झाली ? या जमीन ग. नं. वर सरकारी मालकी वहिती अशी नोंद आहे. सदरी जमिनीवर सत्याई देऊ व रस्ता अशी नोंद आहे. ही सर्व अन्य बाब आहे. परंतु सदरी देऊळ या ५ आर जमिनीचे भोवतालचे जागेवर सरकारी जमिनीवर ग्रा. पं. बर्दापूर यांनी दि. २५-०१-०६ ठराव क्र. १ ने ठराव मंजूर केला आहे. शहरी ठरावात या जमिनीचा पूर्ण अतिकृमीत भाग शासनाने तहसील कार्यालयाने तात्काळ काढून टाकावा. अतिक्रमण हटवावे अशी शिफारस ठरावाव्दारे केली आहे. तेव्हा सदरी कार्यवाही अद्याप का पूर्ण झाली नाही याचा खुलासा माहिती द्यावी. सदरील १ ते ४ मुद्दे यातील सर्व मागणी केलेले माहिती खुलासा स्पष्टपणे ठरलेल्या मुदतीत अर्जदारास देण्यात यावा. सोबत ग्रामपंचायत ठरावाची नक्कल जोडलेली आहे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे प्रतिसाद दिला आहे.

" उपरोक्त संदर्भिय अर्जाव्दारे आपण अर्जात मौजे बर्दापूर येथील गट नंबर ९ व ५ याबाबत संबंधी दिनांक ०७-०४-२००६ चे मंडळ अधिकारी यांचे कार्यवाहीबाबत विचारणा केली आहे. सदर अर्जात संचिकेचा क्रमांक व स्पष्ट विषय याचा उल्लेख केलेला नाही. आपणास या कार्यालयात उपलब्ध माहिती देण्यात येईल."

तरी आपण दिनांक ०९-१०-२००६ रोजीचा दाखल केलेला अर्ज निकाली काढण्यात येत आहे. पत्राची एक प्रत घेऊन दुसरी सहीनिशी परत करावी. ''

सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आज सुनावधीमध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-११-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-१२-२००६ रोजी प्रथम सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांचे मुद्दे ग्राह्य धरुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपील निकाली काढतांना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ माहितीसाठी केलेल्या अर्जामध्ये संचिका क्रमांक व स्पष्ट विषयाचा उल्लेख केला नसल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी बेजबाबदारपणाने सुनावणी घेतली असल्याचे या अर्जामध्ये पुढे नमूद केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी पुढे जन अपिलीय अधिकारी यांनी अधिकाराचा दुरुपयोग करुन नियमाची पायमल्ली व अवहेलना केली असल्यामुळे त्यांच्यावरही शास्ती लावण्याची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तद्वतच जमीन गट नंबर ५ आणि गट नंबर १ मध्ये असलेले बर्दापूर येथील अनाधिकृत कब्जे काढून टाकण्यात यावे अशी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मौजे बर्दापूर येथील शासकीय जमीन सर्व्हे नंबर १ व ५ मध्ये अनाधिकृतरित्या बांधकाम झालेले आहे ते काढून टाकण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सदर अतिक्रमण काढून टाकण्यासंदर्भात कोणतीही कारवाई केलेली नाही. या प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुनही त्याचा काहीही उपयोग झाला नाही. संदर्भिय सरकारी जमिनीवरील अतिक्रमण काढून टाकण्यासंदर्भात आदेश देण्याची त्यांनी आयोगास शेवटी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांचे म्हणणे शासकीय जमिनीवरील अतिक्रमण काढण्यासंदर्भात आहे. या संदर्भात अपिलार्थीने माहिती मागितली असता त्यांनी ही माहिती त्यांच्या कार्यालयात शोधली तथापि अपिलार्थीने त्यांच्या अर्जात फेरफार क्रमांक नमूद केला नसल्यामुळे त्यांना सदर जमिनीच्या ७/१२ च्या उता-यावर फेरफार कशाच्या आधारावर झाला हे कळू शकले नाही व अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती देता आली नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ३ व ४ मध्ये काही अनाधिकृत बांधकामाबाबत प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारली आहे. या संदर्भात तहसील कार्यालयात वेगळ्याने कारवाई चालू आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक ११-१२-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपला या संदर्भातील आदेश दिनांक २५-१२-२००६ रोजी पारीत केला. कुठल्याही जमिनीवर जमिनीच्या हक्कासंबंधात झालेला बदल हा त्या ७/१२ उता-यावर असलेल्या फेरफार क्रमांकाच्या सहाय्याने शोधून घेतला जातो. अपिलार्थीने ज्या जमिनीच्या मालकी हक्कासंदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. त्या जमिनीच्या ७/१२ उता-यावर कोणताही फेरफार क्रमांक नसल्याने अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना

देता आली नाही. सदर जमिनीच्या ७/१२ उता-यावर श्री महालिंग मठ व विहिर अशी प्रथमपासून नोंद आहे त्यामुळे सदर जमिनीचा सरकारी कब्जा होण्यापुर्वीच सदर मठ तिथे आस्तित्वात असावा.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता या ठिकाणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दिनांक १७-१०-२००६ च्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला आहे. तथापि अपिलार्थीस हे पत्र प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये संचिकेचा क्रमांक व स्पष्ट विषय याची अपेक्षा केली आहे. जन सामान्यांना महसूल विभागातील संचिकेचा क्रमांक माहित असणे हे सामान्यतः अपेक्षित नाही. किंबहुना सर्व साधारणतः एखाद्या नागरीकास महसूल विभागातील संचिकेचा क्रमांक व विषय माहित असणे ही बाब अशक्यप्राय आहे असे म्हटल्यास फारसे वावगे ठरु नये. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ४ मुद्दयावर माहिती अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ वगळता उर्वरीत ३ मुद्दयावरील माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील माहिती या शब्दाच्या स्पष्ट केलेल्या व्याख्येमध्ये कोठेही बसत नाही. मात्र मुद्दा क्रमांक २ येथे अपिलार्थीने जमिनीचा गट नंबर दिलेला आहे या गट क्रमांकाच्या आधारे जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत जमिनीचा ७/१२ उतारा शोधून त्यावर मठ महालिंग, चिंचेची झाडे १२, विहीर अशी नोंद असल्याचे म्हटले आहे. ही नोंद कोणत्या फेरफारान्वये घेण्यात आली त्या फेरफार क्रमांकाचा ७/१२ उता-यावर कोठेही उल्लेख नाही त्यामुळे अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक २ मधील प्रश्नास जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतेही उत्तर अथवा माहिती उपलब्ध असणार नाही हे उघड आहे. तथापि त्यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीस कळविण्याऐवजी अपिलार्थीकडून संचिका क्रमांक, स्पष्ट विषय अशी अपेक्षा केली. जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस जरी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी ते चुकीच्या पध्दतीने दिला आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणार नाही हे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात जन सामान्यांना सकारात्मक व त्यांना समजेल अशा भाषेत प्रतिसाद द्यावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस न समजेल अशा पध्दतीने दिलेल्या प्रतिसादाबद्दल त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्सर अथवा कोणत्याही असद्‌हेतुने टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची तरतूद अधिनियमामध्ये नसल्याने त्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ संदर्भात यथायोग्य माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ संदर्भात यथायोग्य माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक ०१-०२-२००८ राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विश्वनाथ आण्णासाहेब मोरे, रा. मु. पो. बर्दापूर, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८५४

निर्णय दिनांक ०१-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. रऊफ एन. पटेल,<br>पटेल प्रोव्हीजन्स, प्रियदर्शनी इंदिरानगर,<br>गारखेडा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रऊफ एन. पटेल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद श्री. भारत धोंडीराम तोडकरी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्री. संतोष कवडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९६२-६३ या कालावधीतील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जमिनीसंदर्भात व त्यावरील पेट्रोलपंपासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " दिल्ली गेट येथील जिल्हा परिषद मालकीच्या पेट्रोलपंप भाडे तत्वावर देण्यासाठी प्रस्तावित केलेल्या मुळ संचिकेची झेरॉक्स देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील उपविभागीय अभियंता, बांधकाम, जिल्हा परिषद यांच्याकडे दिनांक ११-१२-२००६ रोजी पाठवून त्यांना अपिलार्थीस विहित फी घेऊन माहिती देण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील पत्रास अनुसरुन उप अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता रुपये ५२५ /- इतक्या रक्कमेचा भरणा करण्याचे सूचित केले.

उप अभियंता यांच्या सदर पत्रानुसार कारवाई न करता व कोणतेही शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

दिनांक ०९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. " माहितीच्या अधिकाराखाली माहिती न दिल्याबाबत" असे त्यांनी प्रथम अपिलाचे कारण त्यांच्या या अपील अर्जात दर्शविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिनांक ०७-०२-२००७, १४-०२-२००७ या दोन दिवशी सुनावण्या ठेवल्या असता प्रथम सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी यांच्या गैरहजेरीमुळे तर व्दितीय सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने केलेल्या विनंतीवरुन या दोनही सुनावण्या पुढे ढकलण्यात आल्या. या अपिल अर्जावर अंतीमतः दिनांक २३-०२-२००७ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर होते.

सदर सुनावणीचे आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये पारीत केले. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तयार असल्याचे अपिलार्थीस दिनांक ०८-०१-२००७ च्या पत्राव्दारे कळविल्याने अपिलार्थीने शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे दिनांक ३०-१२-२००६ रोजीचे पत्र त्यांना दिनांक ०८-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याने त्यांना विनामूल्य माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे अपिलार्थीस पाठवावयाचे पत्र त्यांनी दिनांक ३०-१२-२००६ रोजी तयार करुन ठेवले होते. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागवूनही ते

त्यांचे कार्यालयात कधीही हजर झाले नाहीत. अपिलार्थी जर त्यांच्या कार्यालयात हजर झाले नाहीत तर अपिलार्थीस दिनांक ०८-०१-२००७ रोजी पत्र पाठविण्याचा गरज का पडली असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यावर जन माहिती अधिकारी यांना कोणतेही स्पष्टीकरण आयोगासमोर देता आले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भा-तील कारवाई कार्यकारी अभियंता यांनी जन माहिती अधिकारी या नात्याने पार पाडावयास हवी होती. तथापि या प्रकरणी येथे अपिलार्थीस त्यांच्या नियंत्रणाखालील उप अभियंत्याकडे पाठवून (जे सहाय्यक जन माहिती अधिकारी देखील नाहीत) त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे, ही त्यांची कृती पूर्णतः चुकीची आहे. अपिलार्थीस पाठवावयाचे दिनांक ३०-१२-२००६ रोजीचे पत्र औरंगाबाद या शहरातल्या शहरामध्ये अपिलार्थीस पाठविण्याकरिता त्यांना ७ दिवसाचा कालावधी का लागावा यासंबंधीचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी आयोगासमोर देऊ शकले नाहीत. त्यांनी अपिलार्थीस अंतीमतः त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत पत्र हस्तांतरीत केले. जर त्यांच्याकडे दिनांक ३०-१२-२००६ रोजी ही माहिती तयार होती तर त्यांनी तदनंतरच्या १/२ दिवसामध्ये अशा प्रकारची कारवाई का केली नाही या प्रश्नाला त्यांच्या युक्तिवादामध्ये कोणतेही उत्तर नाही. त्यामुळे त्यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती दिनांक ३०-१२-२००६ रोजी तयार होती या त्यांच्या विधानास कोणतीही पुष्टी मिळत नाही.

सबब अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाठविलेले पत्र विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांना विनामूल्य माहिती मिळण्याचा हक्क आहे, हा आयोगासमोर मांडलेला मुद्दा ग्राह्य धरण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगवशात येथे असे नमूद करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य स्वतः पार न पाडता आपल्या हाताखालील अन्य एका कर्मचा-यास, अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित करण्याची कृती गैर आहे हे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे व इतःपर त्यांनी अशी प्रवृत्ती टाळावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०१-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रऊफ एन. पटेल, पटेल प्रोव्हीजन्स, प्रियदर्शनी इंदिरानगर, गारखेडा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८३३

निर्णय दिनांक ०२-०२-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सदाशिव कचरु वाघमारे,<br>शाक्यनगर, डॉ. आंबेडकर चौक (भोईवाडा),<br>कोलवालपुरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्राचार्य, पी. ई. एस. अभियांत्रिकी<br>महाविद्यालय, नागसेन वन, औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्राचार्य, पी. ई. एस. अभियांत्रिकी<br>महाविद्यालय, नागसेन वन, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रबंधक, पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय, नागसेन वन, औरंगाबाद

निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सदाशिव कचरु वाघमारे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय श्री.

मोहन दिगांबर सोनटक्के (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय श्री. मिलिंद मनोहरराव देशपांडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, १९९४ ते २००६ या कालावधीतील पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालयातील वर्ग-४ या पदाच्या त्यांनी उल्लेखिलेल्या कर्मचा-यांच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदर माहिती खालील नमूद केलेल्या प्रपत्रात मागितली होती.

| अ. क. | कर्मचा-याचे नांव | जन्म तारीख | प्रथम नियुक्ती दिनांक | | पद नाम | शैक्षणिक अर्हता | भरलेले पद स्थानिक जाहिराती नुसार असल्यास वर्तमानपत्राचे नाव व दिनांक | वेतनश्रेणी | | इतर माहिती अस्थायी / स्थायी कर्मचा-यांची छाया नियुक्ती आदेश देणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अस्थायी पद व दिनांक | स्थायी होते वेळेस पद व दिनांक | | | | अस्थायी | स्थायी | |
| १ ते ४४ | | | | | | | | | | |

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. सदर माहिती नाकारण्याचे कारण त्यांनी “ संस्थेची अंतरीक बाब “ असे दिले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या

तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तद्वतच उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नसल्याचे आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी पूर्ण माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जात, मागणी केलेल्या स्थानिक जाहिराती संदर्भातील माहिती स्थायी अस्थायी कर्मचा-यांच्या नियुक्तीच्या छायांकीत प्रती त्यांना मिळाल्या नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती दिनांक २३-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे व स्थायी अस्थायी कर्मचा-यांच्या नियुक्ती आदेशाच्या प्रती अपिलार्थीस दिनांक ०९-०४-२००७ रोजी दिलेल्या आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. सुरुवातीच्या काळात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा त्यांच्या खाजगी महाविद्यालयास लागू होतो किंवा कसे याची त्यांना कल्पना नसल्याने त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. तथापि संस्थेबरोबर झालेल्या चर्चेनुसार त्यांनी तदनंतर अपिलार्थीस दिनांक २३-०१-२००७ रोजी व दिनांक ०९०४-२००७ रोजी माहिती दिली आहे. अपिलार्थीस दिनांक ०९-०४-२००७ रोजी दिलेली माहिती ही अपिलार्थीस अशाच प्रकारच्या दिनांक ११-०८-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात झालेल्या सुनावणी आदेशाप्रमाणे दिलेली आहे. अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येईल की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील स्थानिक वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीचा स्तंभ जन माहिती अधिकारी यांनी रिकामा ठेवलेला आहे. सदर स्तंभ रिकामा ठेवण्याचे कारण त्यांना विचारले असता, त्यांनी या नेमणुका १९९५-९६ च्या आसपास झाल्या असल्याने व त्यातील सदर कर्मचा-यांच्या भरतीसंदर्भात कोणत्याही स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात दिली नसल्याचे आज आयोगासमोर कबूल केले आहे. त्यामुळे सदर स्तंभ (जाहिराती दिल्या नसल्याने) रिकामा ठेवल्याचे सांगण्यात आले. अपिलार्थीने अशाच प्रकारच्या दुस-या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशाच प्रकारची माहिती मागितली होती व त्याच संदर्भातील व्दितीय अपिलाची सुनावणी आयोगासमोर होऊन आयोगाने या प्रकरणी दिनांक ०४-०४-२००७ रोजी आपले आदेशही पारीत केले आहेत.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्यासंदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो देण्यात आली नसल्याचे आजच्या सुनावणीमध्ये आढळून आले आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी स्थानिक वर्तमानपत्रातील दिलेल्या जाहिरातीसंदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०२-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सदाशिव कचरु वाघमारे, शाक्यनगर, डॉ. आंबेडकर चौक (भोईवाडा), कोलवालपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय, नागसेन वन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय, नागसेन वन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८५८

निर्णय दिनांक ०२-०२-२००८

श्री. कसबे बाळासाहेब गणपतराव, : अपिलार्थी
मु. पो. शुक्रवार पेठ, मातंगनगर, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो),
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी,
उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कसबे बाळासाहेब गणपतराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो) श्री. प्रकाश अहिरराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल)

व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्री. डी. आर. बनसोड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांच्याकडे २००४-२००५ या कालावधीतील धान्य वाटपासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " २००४ ते २००५ मध्ये गहू रोजगार हमी योजना अंतर्गत मजुरांना वाटप झाला किती क्विंटल वाटप व कुपनाच्या पावतीची झेरॉक्स देण्यात यावी. (ता. तुळजापूर)"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तहसील कार्यालय तुळजापूर यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने अपिलार्थीच्या अर्जाची छायांकीत प्रत उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी त्यांचे पत्र दिनांक १४-११-२००६ अन्वये तहसीलदार तुळजापूर यांना पाठवून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्याबाबत निर्देश दिले. याची एक प्रत अपिलार्थीस देऊन तहसीलदार तुळजापूर यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले.

तहसीलदार तुळजापूर यांनी उपजिल्हाधिकारी रोहयो यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रास अनुसरुन त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध असून त्या माहितीची एकूण पृष्ठे ५,६२,८६७ इतकी होत असून प्रती पृष्ठ दोन रुपये याप्रमाणे या शुल्काची रक्कम भरण्याबाबत अपिलार्थीस कळविले. सदर पत्राचा बटवडा तहसीलदार तुळजापूर यांनी त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत केला. स्थानिक स्तरावरील बटवडा तहसीलदार तुळजापूर यांच्या कार्यालयातर्फे त्यांच्या शिपायामार्फत

करण्याची पध्दत त्यांच्याकडे प्रथमपासून चालत आलेली आहे. तहसीलदार तुळजापूर यांनी दिनांक १४-१२-२००६ व दिनांक १९-१२-२००६ रोजी अपिलार्थीस सदर माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी या दोनही दिवशी केलेल्या पंचनाम्यावरुन दिसून येते. सदर पंचनाम्याची प्रत त्यांनी आयोगास सादर केलेली आहे. तहसीलदार तुळजापूर यांनी दिनांक १४-१२-२००६ रोजीचा पंचनामा सहा साक्षीदारांच्या उपस्थितीत केला असून दिनांक १९-१२-२००६ चा पंचनामा चार साक्षीदारांच्या उपस्थितीत केल्याचे दिसून येते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या या प्रथम अपिलामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीमध्ये बदल करुन तालुका कृषि अधिकारी तुळजापूर यांनी २००४-२००५ मध्ये वाटप केलेल्या रोहयो अंतर्गत किती गहू वाटप झाला त्या कुपनच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-१२-२००६ रोजी सुनावणी घेतली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने केलेल्या अपील अर्जाचा विषय तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संबंधीत असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी आपली सुनावणी तालुका कृषि अधिकारी यांच्याकडील माहिती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत प्राप्त करुन देण्याइतकी सीमीत ठेवली आहे व अपिलार्थीस तालुका कृषि अधिकारी यांच्याकडील माहिती ३० दिवसात देण्याची व्यवस्था करण्याचे आश्वासित केले. तथापि सदर प्रस्तावास अपिलार्थीने मान्यता न दिल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला व यासंबंधीचे आपले आदेश दिनांक ०५-०१-२००७ रोजी पारीत केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी त्यांचे अपील फेटाळण्याच्या निर्णयाविरुध्द व्दितीय अपील केले आहे व आपली मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेऊन माहितीशी संबंधीत कार्यालय म्हणून कृषि अधिकारी, तुळजापूर यांच्या कार्यालयाचा त्यांनी उल्लेख केलेला आहे. अपिलार्थीच्या केलेल्या व्दितीय अपिलावरुन त्यांना निश्चित कोणत्या कार्यलयाची माहिती हवी याचा बोध होत नाही.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्याना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नाही. दिनांक १५-०१-२००७ रोजी तहसीलदार तुळजापूर यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये संदर्भ दिलेल्या कुपनाच्या प्रती त्यांना द्याव्यात.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेला दिनांक १५-०१-२००७ चा अर्ज हा तहसीलदार तुळजापूर यांच्याकडे केलेला अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खालील तरतुदीनुसार केलेला अर्ज नाही. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-११-२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेले धान्य कुपन्स त्यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी आजही उपलब्ध आहेत. अर्जदाराने सदर कुपन्सची पाहणी करुन त्याबाबत त्यांना ज्या कुपन्सच्या प्रती हव्या आहेत त्या त्यांनी काढून घ्याव्यात. अपिलार्थीने मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणा-या शुल्काची कल्पना त्यांनी त्यांच्या दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस दिली होती. तथापि सदर पत्राची तामीली होऊ शकली नाही. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस देण्याचा दिनांक १४-१२-२००६ व १९-१२-२००६ रोजी प्रयत्न केला तथापि अपिलार्थी त्यांनी दिलेल्या पत्यावर

उपलब्ध होऊ शकले नाहीत. अपिलार्थीच्या अनुपस्थितीबाबत त्यांनी काही साक्षीदारांच्या उपस्थितीत पंचनामे देखील केले आहेत. दरम्यानच्या काळात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मूळ अर्जात सर्व यंत्रणांच्या कुपन्सबाबत माहिती मागितली होती, तथापि त्यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांनी तालुका कृषि अधिकारी तुळजापूर यांच्याकडील कुपन्सच्या प्रतीची मागणी केली. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे व प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीत बदल झाला असल्याने त्यांनी अपिलार्थीस तालुका कृषि अधिकारी यांच्याकडील माहिती संदर्भात सदर माहिती त्यांना ३० दिवसात उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करतो असे सांगितले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला प्रस्ताव अपिलार्थीस नामंजूर असल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून अपिलार्थीच्या अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कारवाई केली आहे. अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्यासाठी विनंती करणारे पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीच्या मागणीमध्ये अंशतः बदल केल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस आवश्यक असलेली कृषि विभागाकडील माहिती पुरविण्याचे आश्वासीत केले होते. तथापि अपिलार्थीस सदर प्रस्ताव मान्य नसल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीने मागितलेल्या कुपन्सच्या प्रतीची संख्या अंदाजे सहा लाख इतकी होत आहे. अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे प्रथम अर्ज केल्यानंतर परत तहसीलदार

तुळजापूर यांच्याकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी अर्ज करुन काही विशिष्ट क्रमांकाच्या कुपन्सच्या प्रतीची मागणी केली आहे. अपिलार्थीने सदर अर्ज माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केला नसल्याने सदर अर्जाचा विचार येथे करण्यात येत नाही तथापि यावरुन अपिलार्थी यांना निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही हे सिध्द होते. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मते अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध असल्याचे म्हटले आहे. तद्वतच त्यांच्याकडे प्राप्त झालेले सर्व कुपन्स ते अपिलार्थीस सःशूल्क दाखविण्यास देखील तयार आहेत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे किंवा सदर माहिती दडविण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. मात्र अपिलार्थीने त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या स्वरुपामध्ये वेळोवेळी बदल केलेला दिसतो. अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये निर्देशीत केलेल्या पत्त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती देण्यासाठी त्यांचा प्रतिनिधी दिनांक १४-१२-२००६, १९-१२-२००६ रोजी पाठविला असल्याचे त्यांनी सादर केलेल्या पंचनाम्याच्या प्रतीवरुन सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रांची अपिलार्थीने मूळ अर्जात दिलेल्या पत्त्यावर तामिली करण्यास जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी गेल्यानंतर त्यांच्या पत्नीने सदर पत्र स्विकारण्यास नकार दिला तर दिनांक १४-१२-२००६ च्या पंचनाम्यावर अपिलार्थीच्या पत्नीची सही देखिल आहे. अपिलार्थीच्या पत्नीने सदर पत्र स्विकारण्यास दोन्ही वेळा नाकार दिल्याचे या पंचनाम्यामध्ये म्हटले आहे. यावरुन अपिलार्थी त्यांनी मागितलेल्या विस्तृत प्रमाणातील माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी आवश्यक ते शुल्क भरावयाची त्यांची इच्छा नाही हे सिध्द होत आहे. अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस ते दारिद्र रेषेखालील व्यक्ति नसल्याने, आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांचेकडे भरणे अनिवार्य आहे. तेव्हा अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही असे त्यांचे म्हणणे अग्राह्य ठरवून अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

अपिलार्थीस अजूनही जर माहिती आवश्यक असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर कुपन्सच्या प्रतीची पाहणी करण्यासाठी वेगळ्या अर्जाव्दारे मागणी करावी व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज प्राप्त झाल्यावर अपिलार्थीस सदर कुपन्स माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार पाहण्यासाठी प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०२-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कसबे बाळासाहेब गणपतराव, मु. पो. शुक्रवार पेठ, मातंगनगर, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८५८

निर्णय दिनांक ०२-०२-२००८

श्री. कसबे बाळासाहेब गणपतराव, : अपिलार्थी
मु. पो. शुक्रवार पेठ, मातंगनगर, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो),
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी,
उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कसबे बाळासाहेब गणपतराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो) श्री. प्रकाश अहिरराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल)

व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्री. डी. आर. बनसोड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांच्याकडे २००४-२००५ या कालावधीतील धान्य वाटपासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " २००४ ते २००५ मध्ये गहू रोजगार हमी योजना अंतर्गत मजुरांना वाटप झाला किती क्विंटल वाटप व कुपनाच्या पावतीची झेरॉक्स देण्यात यावी. (ता. तुळजापूर)"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तहसील कार्यालय तुळजापूर यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने अपिलार्थीच्या अर्जाची छायांकीत प्रत उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी त्यांचे पत्र दिनांक १४-११-२००६ अन्वये तहसीलदार तुळजापूर यांना पाठवून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्याबाबत निर्देश दिले. याची एक प्रत अपिलार्थीस देऊन तहसीलदार तुळजापूर यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले.

तहसीलदार तुळजापूर यांनी उपजिल्हाधिकारी रोहयो यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रास अनुसरुन त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध असून त्या माहितीची एकूण पृष्ठे ५,६२,८६७ इतकी होत असून प्रती पृष्ठ दोन रुपये याप्रमाणे या शुल्काची रक्कम भरण्याबाबत अपिलार्थीस कळविले. सदर पत्राचा बटवडा तहसीलदार तुळजापूर यांनी त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत केला. स्थानिक स्तरावरील बटवडा तहसीलदार तुळजापूर यांच्या कार्यालयातर्फे त्यांच्या शिपायामार्फत

करण्याची पध्दत त्यांच्याकडे प्रथमपासून चालत आलेली आहे. तहसीलदार तुळजापूर यांनी दिनांक १४-१२-२००६ व दिनांक १९-१२-२००६ रोजी अपिलार्थीस सदर माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी या दोनही दिवशी केलेल्या पंचनाम्यावरुन दिसून येते. सदर पंचनाम्याची प्रत त्यांनी आयोगास सादर केलेली आहे. तहसीलदार तुळजापूर यांनी दिनांक १४-१२-२००६ रोजीचा पंचनामा सहा साक्षीदारांच्या उपस्थितीत केला असून दिनांक १९-१२-२००६ चा पंचनामा चार साक्षीदारांच्या उपस्थितीत केल्याचे दिसून येते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या या प्रथम अपिलामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीमध्ये बदल करुन तालुका कृषि अधिकारी तुळजापूर यांनी २००४-२००५ मध्ये वाटप केलेल्या रोहयो अंतर्गत किती गहू वाटप झाला त्या कुपनच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-१२-२००६ रोजी सुनावणी घेतली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने केलेल्या अपील अर्जाचा विषय तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संबंधीत असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी आपली सुनावणी तालुका कृषि अधिकारी यांच्याकडील माहिती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत प्राप्त करुन देण्याइतकी सीमीत ठेवली आहे व अपिलार्थीस तालुका कृषि अधिकारी यांच्याकडील माहिती ३० दिवसात देण्याची व्यवस्था करण्याचे आश्वासित केले. तथापि सदर प्रस्तावास अपिलार्थीने मान्यता न दिल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला व यासंबंधीचे आपले आदेश दिनांक ०५-०१-२००७ रोजी पारीत केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी त्यांचे अपील फेटाळण्याच्या निर्णयाविरुध्द व्दितीय अपील केले आहे व आपली मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेऊन माहितीशी संबंधीत कार्यालय म्हणून कृषि अधिकारी, तुळजापूर यांच्या कार्यालयाचा त्यांनी उल्लेख केलेला आहे. अपिलार्थीच्या केलेल्या व्दितीय अपिलावरुन त्यांना निश्चित कोणत्या कार्यलयाची माहिती हवी याचा बोध होत नाही.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्याना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नाही. दिनांक १५-०१-२००७ रोजी तहसीलदार तुळजापूर यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये संदर्भ दिलेल्या कुपनाच्या प्रती त्यांना द्याव्यात.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेला दिनांक १५-०१-२००७ चा अर्ज हा तहसीलदार तुळजापूर यांच्याकडे केलेला अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खालील तरतुदीनुसार केलेला अर्ज नाही. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-११-२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेले धान्य कुपन्स त्यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी आजही उपलब्ध आहेत. अर्जदाराने सदर कुपन्सची पाहणी करुन त्याबाबत त्यांना ज्या कुपन्सच्या प्रती हव्या आहेत त्या त्यांनी काढून घ्याव्यात. अपिलार्थीने मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणा-या शुल्काची कल्पना त्यांनी त्यांच्या दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस दिली होती. तथापि सदर पत्राची तामीली होऊ शकली नाही. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस देण्याचा दिनांक १४-१२-२००६ व १९-१२-२००६ रोजी प्रयत्न केला तथापि अपिलार्थी त्यांनी दिलेल्या पत्यावर

उपलब्ध होऊ शकले नाहीत. अपिलार्थीच्या अनुपस्थितीबाबत त्यांनी काही साक्षीदारांच्या उपस्थितीत पंचनामे देखील केले आहेत. दरम्यानच्या काळात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मूळ अर्जात सर्व यंत्रणांच्या कुपन्सबाबत माहिती मागितली होती, तथापि त्यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांनी तालुका कृषि अधिकारी तुळजापूर यांच्याकडील कुपन्सच्या प्रतीची मागणी केली. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे व प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीत बदल झाला असल्याने त्यांनी अपिलार्थीस तालुका कृषि अधिकारी यांच्याकडील माहिती संदर्भात सदर माहिती त्यांना ३० दिवसात उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करतो असे सांगितले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला प्रस्ताव अपिलार्थीस नामंजूर असल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून अपिलार्थीच्या अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कारवाई केली आहे. अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्यासाठी विनंती करणारे पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीच्या मागणीमध्ये अंशतः बदल केल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस आवश्यक असलेली कृषि विभागाकडील माहिती पुरविण्याचे आश्वासीत केले होते. तथापि अपिलार्थीस सदर प्रस्ताव मान्य नसल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीने मागितलेल्या कुपन्सच्या प्रतीची संख्या अंदाजे सहा लाख इतकी होत आहे. अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे प्रथम अर्ज केल्यानंतर परत तहसीलदार

तुळजापूर यांच्याकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी अर्ज करुन काही विशिष्ट क्रमांकाच्या कुपन्सच्या प्रतीची मागणी केली आहे. अपिलार्थीने सदर अर्ज माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केला नसल्याने सदर अर्जाचा विचार येथे करण्यात येत नाही तथापि यावरुन अपिलार्थी यांना निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही हे सिध्द होते. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मते अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध असल्याचे म्हटले आहे. तद्वतच त्यांच्याकडे प्राप्त झालेले सर्व कुपन्स ते अपिलार्थीस सःशूल्क दाखविण्यास देखील तयार आहेत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे किंवा सदर माहिती दडविण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. मात्र अपिलार्थीने त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या स्वरुपामध्ये वेळोवेळी बदल केलेला दिसतो. अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये निर्देशीत केलेल्या पत्त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती देण्यासाठी त्यांचा प्रतिनिधी दिनांक १४-१२-२००६, १९-१२-२००६ रोजी पाठविला असल्याचे त्यांनी सादर केलेल्या पंचनाम्याच्या प्रतीवरुन सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रांची अपिलार्थीने मूळ अर्जात दिलेल्या पत्त्यावर तामिली करण्यास जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी गेल्यानंतर त्यांच्या पत्नीने सदर पत्र स्विकारण्यास नकार दिला तर दिनांक १४-१२-२००६ च्या पंचनाम्यावर अपिलार्थीच्या पत्नीची सही देखिल आहे. अपिलार्थीच्या पत्नीने सदर पत्र स्विकारण्यास दोन्ही वेळा नाकार दिल्याचे या पंचनाम्यामध्ये म्हटले आहे. यावरुन अपिलार्थी त्यांनी मागितलेल्या विस्तृत प्रमाणातील माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी आवश्यक ते शुल्क भरावयाची त्यांची इच्छा नाही हे सिध्द होत आहे. अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस ते दारिद्र रेषेखालील व्यक्ति नसल्याने, आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांचेकडे भरणे अनिवार्य आहे. तेव्हा अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही असे त्यांचे म्हणणे अग्राह्य ठरवून अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

अपिलार्थीस अजूनही जर माहिती आवश्यक असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर कुपन्सच्या प्रतीची पाहणी करण्यासाठी वेगळ्या अर्जाव्दारे मागणी करावी व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज प्राप्त झाल्यावर अपिलार्थीस सदर कुपन्स माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार पाहण्यासाठी प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०२-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कसबे बाळासाहेब गणपतराव, मु. पो. शुक्रवार पेठ, मातंगनगर, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१६६

निर्णय दिनांक : ०२-०२-२००८

१ श्री. ईस्माईल पटेल इमाम पटेल, : तक्रारदार
न्यु बायजीपूरा,औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. ईस्माईल पटेल इमाम पटेल (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्राररदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. १४.११.२००७ रोजी केलेल्या अर्जामध्ये अशी तक्रार केली आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उत्तरवादी यांचेकडे मागितलेली दोन पानांची माहिती देण्याप्रीत्यर्थ उत्तरवादी यांनी त्यांचेकडून रु.९०/- इतके शुल्क भरुन घेतले आहे. सदर शुल्क जास्त असल्याचे त्यांना वाटल्यावरुन, त्यांनी योग्य ती फी घेऊन उत्तरवादी यांना माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये असे दिसून येते की, तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडून त्यांचेकडील दि. १६.७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहिती मागितली होती. तक्रारदाराच्या या अर्जास

उद्देशून उत्तरवादी यांनी तक्रारदारास दि. ८.८.२००७ रोजी सदर माहिती देण्यापोटी शुल्क रु. ९०/- इतके आकारून तक्रारदारास आवश्यक असलेली माहिती दिलेली आहे. तक्रारदारास प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन करता उत्तरवादी यांनी तक्रारदारास दोन पृष्ठाची माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

कोणत्याही अर्जदारास, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाद्वारे दाखल केलेल्या अर्जानुसार माहिती देण्यासाठी किती शुल्क आकारावे, यासंबंधी महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभागातर्फे दि. ११.१०.२००५ रोजी अधिसूचना क्र. RTI 2005/C-R.315/0515 जारी केली गेली आहे. सदर अधिसूचनेतील तरतुदीनुसार उत्तरवादी यांनी, तक्रारदार यांचेकडून रु.२/- प्रतिपृष्ठ इतक्या दराने शुल्क आकारुन, संबंधित तक्रारदारास आवश्यक ती माहिती प्राप्त करुन देणे, त्यांना अनिवार्य आहे. तथापि येथे असे झाल्याचे दिसून आले आहे की, उत्तरवादी यांनी, त्यांचे कार्यालयात दि. ८.८.२००७ रोजी पावती क्रमांक २७०३१ अन्वये तक्रारदार यांचेकडून रु. ९०/-शुल्कापोटी भरुन घेतले आहेत. अधिनियमाद्वारे निश्चित केलेल्या दरापेक्षा उत्तरवादी यांनी तक्रारदारास माहिती देण्यापोटी रु. ८६/- इतका जादा शुल्क लावल्याचे, या प्रकरणात निःसंशयपणे दिसते. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची व नियमभंग करणारी आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी तक्रारदारास त्यांचेकडून माहिती देण्यापोटी, त्यांचेवर पावती क्रमांक २७०३१ दि. ८.८.०७ द्वारे आकारलेल्या रु.९०/- इतक्या शुल्कामधून तक्रारदारास दोन पृष्ठांची माहिती देण्यापोटी लागलेले शुल्क रु.२/- प्रतिपृष्ठ प्रमाणे दोन पाने माहितीपोटी एकूण शुल्क रु. ४/- वजा करुन उर्वरित रु. ८६/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच २४ तासांचे आत परत करावेत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. उत्तरवादी यांनी तक्रारदारास दोन पृष्ठांची माहिती देण्यापोटी लावलेले जादा शुल्क रु. ८६/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच २४ तासांचे आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ईस्माईल पटेल इमाम पटेल, रा. न्यू बायजीपूरा, इंदिरानगर, गल्ली नं.१९ क, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती .

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१६७

निर्णय दिनांक : ०२-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अंबादास आसाराम कोळेकर, औरंगाबाद. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ कार्यकारी संचालक, देवगिरी सहकारी साखर कारखाना.फुलंब्री. | : | उत्तरवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. अंबादास आसाराम कोळेकर (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर कार्यकारी संचालक, देवगिरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, फुलंब्री ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्राररदार यांनी त्यांचेकडील दि. २७.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, तक्रारदार यांनी देवगिरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, फुलंब्री यांचेकडून दि. ११.०६.२००७ रोजीच्या अर्जान्वये काही माहिती मागितली असता, संबंधित साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अर्जाचा सरळपणे स्वीकार न केल्यामुळे ७-८ वेळा चकरा माराव्या लागल्या. त्याचप्रमाणे त्यांनी माहिती मिळविण्यासाठी परत दुसऱ्यांदा दि. २५.०८.२००७ रोजी अर्ज केला. तरी देखिल उत्तरवादी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती अर्जदारास प्राप्त झाली नाही. त्यांनी पुन्हा दि. १७.१०.२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने अर्ज केला उत्तरवादी यांचे कार्यालयातील कर्मचारी त्यांचा

तक्रार अर्ज स्वीकारण्यास टाळाटाळ करुन त्यांना माहिती मिळण्यापासून वंचित ठेवतात, असे त्यांचे थोडक्यात म्हणणे आहे.

आज रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीमध्ये तक्रारदार श्री. अंबादास आसाराम कोळेकर हे हजर होते. तथापि त्यांनी आयोगाकडे अशाप्रकारचा कोणताही अर्ज केला नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. उत्तरवादी यांनी देखील त्यांचे कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या असल्याचे सांगितले.

तक्रारदार यांचे मते, त्यांचे नावाने कोण्या अज्ञात व्यक्तीने ही तक्रार केली असून सदर तक्रार खोटी आहे.

खूद्द तक्रारदारांनीच आयोगाकडे आज रोजी विचाराधीन असलेली तक्रार खोटी असल्याचे नमुद केले आहे. सबब सदर तक्रार खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. श्री. अंबादास आसाराम कोळेकर यांची आयोगाकडे केलेली दिनांक २७.१०.२००७ रोजीची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंबादास आसाराम कोळेकर, विनोद फर्निचर, जाधवमंडी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, देवगिरी सहकारी साखर कारखाना.फुलंब्री.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१६८

निर्णय दिनांक : ०२-०२-२००८

१ श्री. अनिलकुमार बाबूराव सोनकामळे, : तक्रारदार
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. अनिलकुमार बाबूराव सोनकामळे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, औरंगाबाद( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द राज्य माहिती आयोगाने दि. २३.८.२००७ रोजी सुनावणीमध्ये आदेशित केल्याप्रमाणे १५ दिवसांचे आत त्यांना माहिती दिली नसल्याचे नमुद केले आहे.

तक्रारदाराचे म्हणणे असे आहे की, औरंगाबाद जिल्हयात एकंदर किती टोल नाकी स्थापन केले आहेत. ती कोणत्या दिनांकापासून केली आहेत, त्या टोलनाक्याची मुदत किती आहे व प्रत्येक टोलनाक्यावर आजपर्यन्त किती रकमेची वसूली केली आहे व येथून पुढे किती रकमेची वसूली केली जाईल. अशा प्रकारची माहिती त्यांना अपेक्षित असतांना उत्तरवादी यांनी त्यांना वेगवेगळया वेळी दिलेली माहिती विसंगत असून त्यामध्ये ताळमेळ नाही.

उत्तरवादी यांनी तक्रारदार यांना या मुद्यांवर माहिती दिलेली आहे तथापि, उत्तरवादी यांनी तक्रारदारास दिलेल्या माहितीमध्ये तफावत आढळून येत आहे. सदर तफावतीचे कारण उत्तरवादी यांना विचारले असता त्यांनी त्यांनी टोल आकारणीच्या कालावधीत फरक असल्यामुळे या रकमेमध्ये तफावत येत असल्याचे सांगितले. सबब उत्तरवादी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी पुन्हा एकदा टोल नाकानिहाय रकमांची तपासणी करुन तक्रारदार यांना एकच निश्चित कालावधीतील माहिती तिचा ताळमेळ घालून तक्रारदाराने हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य द्यावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनिलकुमार बाबूराव सोनकामळे, रा.चौसरनगर, ज्योतीनगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१५४

निर्णय दिनांक : ०४-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. पंढरीनाथ दगू पवार (पगार)<br>रा. पहाडगल्ली,घ. नं. १८२७, येवला,<br>ता. येवला जि. नाशिक | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>मुख्याधिकारी, नगरपालिका येवला<br>जि. नाशिक. | : | उत्तरवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. पंढरीनाथ दगू पवार (पगार) (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पालिका, येवला यांचे प्रतिनिधी श्री. सुनिल बाळकृष्ण गवळी, बांधकाम लिपीक, येवला नगर पालिका (त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयाकडे त्यांच्याकडील दि. २६.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, नगर परिषद, येवला, जिल्हा नाशिक येथील जन माहिती अधिकारी यांचेकडून काही माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे मागितली आहे. सदर माहितीतील काही मुद्यांबाबत त्यांना अर्धवट माहिती प्राप्त झालेली असल्यामुळे, त्यांनी जन

अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील केले होते. सदर अपीलाची सुनावणी पुढे ढकलण्याची तक्रारदार यांनी केलेली विनंती संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी मान्य न करता अपीलावर निर्णय देऊन उत्तरवादी यांना पाठीशी घातले म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदर अपीलावर सुनावणी प्रलंबित असून उत्तरवादी यांना आता या टप्प्यावर शास्ती लावण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

तक्रारदाराच्या या प्रकरणातील त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले दि. १३.०६.२००६ रोजीच्या अपीलावर सुनावणी अद्याप प्रलंबित आहे. तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील त्यांनी मूळ माहितीचा अर्ज, प्रथम अपील व त्या अपीलावरील निर्णय त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नसल्यामुळे परत पाठविण्यात आलेला आहे, असे दिसून येते. आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये तक्रारदारास, सूचित करण्यात आले की, सदर प्रलंबित अपील आवश्यक ती कागदपत्रे जोडून राज्य माहिती आयोगाकडे सादर करावी, म्हणजे त्यावर योग्य वेळी तक्रारदाराच्या मूळ माहितीच्या अर्जातील सर्व मुद्यांचा परामर्ष घेण्यात येऊन, दोन्ही बाजूंचे म्हणणे नोंदवून सुनावणीमध्ये योग्य तो निर्णय देण्यात येईल.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पंढरीनाथ दगू पवार (पगार) रा. पहाडगल्ली,घ. नं. १८२७, येवला, ता. येवला जि. नाशिक

२ जन माहिती अधिकारी यांना मुख्याधिकारी, नगरपालिका येवला जि. नाशिक. या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला,सन पोचखानवाला मार्ग,सी-फेस,वरळी,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८६५

निर्णय दिनांक  ०५-०२-२००८

श्री. शिवानंद काशिनाथ मळभंगे, : अपिलार्थी
मु. पो. देवणी, तालुका देवणी,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा प्राचार्य, विवेक वर्धिनी उच्च माध्यमिक
विद्यालय, देवणी, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शिवानंद काशिनाथ मळभंगे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, विवेक वर्धिनी उच्च माध्यमिक विद्यालय श्री. राठोड रामराव मेघा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा

परिषद यांचे प्रतिनिधी अधीक्षक वर्ग-२ श्री. पवार अमोल श्रीधर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयातील आकरावीच्या प्रवेश प्रक्रियेविषयी शैक्षणिक वर्ष २००६-२००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ १. चालू शैक्षणिक वर्ष २००६-०७ मधील ११ वी वर्गातील विज्ञान, कला, वाणिज्य शाखेतील एकूण मुलांची संख्या किती व मुलांचा कोटा किती व तुकडी वर्ग किती अंक आकडेवारीसहित सविस्तर देण्यात यावे.
>
> २. महाराष्ट्र राज्य वगळून बाहेर राज्यातील ११ वी विज्ञान शाखेतील २००६-०७ मधील प्रवेश उमेदवार मुलांची संख्या किती व बाहेर राज्यातील प्रवेश कोटा किती व त्याचे सर्व एस. एस. सी. पासचे मार्कसिट झेरॉक्स देण्यात यावे.
>
> ३. ११ विज्ञान शाखेतील २००६-०७ मधील विज्ञान शाखेतील एकूण प्रवेश कोटा किती. त्यामुळे महाराष्ट्रातील कोटा किती प्रवेश उमेदवारीची संख्या आकडेवारीसहित देण्यात यावी.
>
> ४. २००६-०७ मधील ११ वी विज्ञान शाखेच्या प्रवेशासाठी विभागीय बोर्ड मंडळ, लातूर यांच्या आदेशानुसार एस. एस. सी. पास मुलांची टक्केवारी बाबत जी. आर. परिपत्रक व बाहेर राज्यातील प्रवेशाबाबत मुलांचे एस. एस. सी. पासचे टक्केवारी बाबत जी. आर. परिपत्रक देण्यात यावे.
>
> ५. आपल्या उच्च माध्यमिक विद्यालयात २००६-०७ मध्ये ११ वी विज्ञान शाखेत प्रवेश देते वेळी एस. एस. सी. पास उमेदवारांची निवड प्रक्रिया कशी

काय केली. तारखासहित कमीत कमी एस. एस. सी. पासची टक्केवारी किती. जास्तीत जास्त टक्केवारी किती. मिरीट प्रमाणे निवड केली किंवा नाही याचा सविस्तर खुलासा देवून बाहेर राज्यातील मुलांची मिरीटप्रमाणे निवड केली किंवा नाही. केली असेल तर कशी काय केली. कमीत कमी एस. एस. सी. पासची टक्केवारी किती याबद्दल सविस्तर माहिती देण्यात यावी.

६. ११ वी २००६-०७ मधील विज्ञान शाखेतील बाहेर राज्यातील मुलांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण बंद झालेली यादी लातूर बोर्डाकडे पाठविलेला अहवालाची प्रत तारखे सहित देण्यात यावे.

७. आपण ११ वी विज्ञान शाखेत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे निवड कोणत्या प्रक्रियाव्दारे निवड करण्यात आलेले आहे याचे सविस्तर खुलासा देण्यात यावे.

८. वरील काही माहिती आपल्या विभागात उपलब्ध नसल्यास कोणत्या शासकिय प्राधिकरण विभागातून हस्तगत करावे विभाग पत्त्यासहित खुलासा देण्यात यावे ही नम्र विनंती.”

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ माहितीच्या अर्जावर दहा रुपये किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविलेले आढळून येत नाहीत.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली सर्व माहिती तयार ठेवलेली असून कार्यालयीन वेळेत येऊन माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस अंडर

सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने दिनांक २१-०२-२००७ रोजी पाठविल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या कालावधीमध्ये संबंधीत शिक्षण संस्थेचे सचिव जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले असल्याने जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत संस्थेच्या सचिवाकडे अपील अर्ज करण्याचे सुचविले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नाही याची येथे विशेष करुन नोंद घेण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद लातूर यांची सदर कृती अत्यंत बेजबाबदारपणाची असून त्यांनी अपिलार्थीचे अपील संबंधीत संस्थेचे सचिव यांच्याकडे, अपिलार्थीस न्याय देण्याच्या दृष्टीने पाठवावयास हवे होते. तथापि या प्रकरणी त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. मूळात सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे, आयोगाने आगाऊ सूचना देऊन देखील आवक जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत उपलब्ध नाही. यावरुन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयाने सदर पत्र पाठविले किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले

आहे. यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्याचबरोबर आयोगास असा इशारा दिला आहे की, आपणाकडून "अ व ब" प्रमाणेच अन्याय झाल्यास नाईलाजास्तव न्यायालयात न्याय मागण्यास त्यांना जावे लागेल.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या पत्नीकरिता संबंधीत शिक्षण संस्थेकडे आकरावी प्रवेशाकरिता अर्ज दाखल केला असता अर्जासंबंधीची कागदपत्रे संबंधीत शिक्षण संस्थेने ४ महिने संस्थेकडे ठेऊन तदनंतर त्यांच्या पत्नीला प्रवेश नाकारला. त्यांच्या पत्नीला प्रवेश नाकारल्याचे कारण संस्थेला विचारले असता किमान २५ ते ३० वेळा त्यांना जन माहिती अधिकारी व संबंधीत लिपीक यांनी त्यांचे कार्यालयात फे-या मारण्यास भाग पाडले व त्याव्दारे त्यांनी त्यांचा मानसीक छळ केला. त्यांच्या पत्नीस शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश कधी मिळेल असे त्यांनी विचारले असता त्यांना देणगी स्वरुपात रुपये २५ ते ३० हजार इतके त्यांच्या संस्थेकडे जमा केल्यास त्यांचे काम होऊ शकेल असे संस्थेच्या कार्यालयातील लिपीक श्री. निडवंचे व्ही. आर. यांनी सांगितले. त्याचबरोबर श्री. बसवराज पाटील नावाच्या शिक्षकाने इतर राज्यातील त्यांच्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी अपिलार्थीस दाखवून प्रत्येक विद्यार्थ्यामागे २५ ते ३० हजार रुपये घेतल्याची यादी त्यांनी अपिलार्थीस दाखविली. तदनंतर अपिलार्थी यांनी ब-याच वेळा त्यांच्या कार्यालयात चकरा मारल्या पण काही उपयोग झाला नाही व त्यांचा अपमान झाला. अपिलार्थीस झालेल्या त्रासाबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या माहितीच्या अर्जावर १० रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटवले नाहीत, माहिती व्यक्तिशः अपेक्षित करुन माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत व अपिलार्थीस २५ ते ३० हजार त्यांच्या पत्नीस महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्याप्रीत्यर्थ

मागितले असल्याचे त्यांचे म्हणणे असत्य आहे. अपिलार्थीच्या पत्नीस त्यांना विज्ञान शाखेत प्रवेश हवा होता. या शाखेत प्रवेश प्राप्त करुन घेण्याकरिता इंग्रजीमध्ये ३५ व विज्ञानामध्ये ४० टक्के इतक्या किमान मार्काची आवश्यकता असते. तथापि त्यांच्या पत्नीस आवश्यक ते मार्क नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या पत्नीस आकरावी विज्ञान शाखेत प्रवेश नाकारला. यावर अपिलार्थी यांचे म्हणणे असे पडले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे आकरावी विज्ञान शाखेकडे प्रवेश मागितला नव्हता त्यांनी कला शाखेत प्रवेश मागितला होता.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यावेळी संबंधीत शिक्षण संस्थेचे सचिव हे जन अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. जर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे जन अपिलीय अधिकारी नव्हते तर त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज संबंधीत शिक्षण संस्थेकडे का पाठविला नाही. याबाबत जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी कोणतेही उत्तर देऊ शकले नाहीत. तद्वतच आयोगाने सुनावणीच्या नोटीसमध्ये आवक जावक नोंदवहीच्या प्रतीची माहिती बरोबर घेऊन येण्यासाठी सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीस पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ आयोगास कोणताही पुरावा सादर केला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांची आयोगाच्या सुनावणीस स्वतः उपस्थित न राहता कार्यालयातील कनिष्ठ कर्मचा-यास उपस्थित राहण्यास सांगणे, संबंधीत कर्मचा-याकडे आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध नसणे, अपिलार्थीच्या अपील अर्जावर आवश्यक ती कारवाई न करणे या त्यांच्या कृती त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट करतात. त्यांच्या या अशा प्रकारच्या बेपर्व वर्तनाची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व आयोगाची कक्षा पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिलेला आहे. आज रोजी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कोणती माहिती त्यांनी तयार करुन ठेवली आहे असे विचारले असता त्यांनी अपिलार्थीस देण्याकरिता माहिती तयार ठेवली असल्याचे आयोगास सांगितले व सदर माहिती आयोगास प्रत्यक्षतः दाखवली. सदर माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी दिनांक २०-०२-२००७ रोजी माहिती तयार करुन ठेवली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त माहिती तयार असल्याचे कळवून ते स्वस्थ राहिले.

सदर माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील बहुतांश माहितीचा त्यामध्ये समावेश असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ माहितीच्या अर्जावर १० रुपये किंमतीचे कोर्ट फी स्टॅम चिकटविलेले नाही हे येथे प्रामुख्याने नमूद करावे लागेल. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११ ऑक्टोंबर २००५ रोजीच्या क्रमांक आरटीआय/२००५/सी.आर./३१५/०५/५ अन्वये पारीत केलेल्या अधिसूचनेतील कलम ३ अन्वये अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या प्रत्येक अर्जावर दहा रुपये किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मूळात सदर अत्यावश्यक तरतुदीचा भंग केला असल्याचे येथे दिसून येत आहे. अपिलार्थीचा माहिती मागण्यासाठीचा अधिनियमातील कलम ६ अन्वये केलेला मूळ अर्ज, ज्यावर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल आधारित आहे, अशा प्रकारे अवैध ठरत असल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय घेण्याच्या या टप्प्यावर अपिलार्थीने उपस्थित केलेल्या या मूलभूत मुद्दयाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. अपिलार्थीस त्यांच्या पत्नीस संबंधीत शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेतांना ज्या अडचणी आल्या त्या तक्रारीचे गंभीर स्वरुप पाहता या संदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी या शिक्षण संस्थेची चोकशी करणे जरुरीचे आहे असे आयोगास वाटते.

सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी या शिक्षण संस्थेची, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये केलेल्या तक्रारीसंदर्भात चौकशी करुन त्यावर यथायोग्य कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस विचाराधीन असलेली माहिती देण्याबाबत, अपिलार्थी यांनी नव्याने दहा रुपये इतक्या किंमतीचा कोर्ट फी स्टॅम त्यांच्या माहितीच्या अर्जावर चिकटून जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागावी व जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त होताच ती माहिती अपिलार्थीस तात्काळ पुरवावी.

उपरोक्त प्रकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी यांचे वर्तन आक्षेपार्ह असल्याचे आढळून आले आहे. त्यांच्या वर्तनाविषयी या निकालपत्रामध्ये सुरुवातीच्या परिच्छेदामध्ये आयोगाने अभिप्राय व्यक्त केले आहेत त्याचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी गांर्भीयपूर्वक करावे असे त्यांना पुनश्चः सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०५-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिवानंद काशिनाथ मळभंगे, मु. पो. देवणी, तालुका देवणी, जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, विवेक वर्धिनी उच्च माध्यमिक विद्यालय,

देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकरी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८६६

निर्णय दिनांक ०५-०२-२००८

श्री. होळे दशरथ अच्युतराव, : अपिलार्थी
रा. अष्टामोड, पोस्ट गांजूर, तालुका चाकूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर
जन अपिलीय अधिकारी : जिल्हाधिकारी, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. होळे दशरथ अच्युतराव व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा निवासी

उपजिल्हाधिकारी श्री. किशन नारायणराव जावळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " मौ. जढाळा तालुका चाकूर जिल्हा लातूर येथील जमीन सर्व्हे नंबर ५७/२ चा फेरफार क्रमांक ९३४ ची नक्कल मिळणे व फेरफार क्रमांक १२०८ रद्द करणे बाबत. "

अपिलार्थीने सदर अर्जामध्ये माहितीचा विषय या मुद्यासमोर दिनांक ०६-१०-२००६ रोजीच्या सुनावणीची नक्कल मिळणेबाबत असा उल्लेख केला आहे.

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर अपिलार्थीने जरी १३-०२-२००७ अशी तारीख लिहिली असली तरी सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०३-२००७ रोजी कारवाई करुन अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे अपेक्षित असलेली माहिती समक्ष हस्तांतरीत केली. सदर माहिती मुदतीत मिळाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील त्यांच्या मूळ अर्जावर स्वाक्षरीसह पोच दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी

अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. त्यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीने सदर अपील अर्जानंतर दिनांक ०४-०४-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पोस्टाच्या दिरंगाईमुळे उशीराने मिळाली असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले होते. तथापि आता त्यांना माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपील न चालविण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली. अपिलार्थीच्या या विनंतीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

तदनंतर अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले असून त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक दिली नाही व त्याचबरोबर त्यांनी दाखल केलेले अपील अद्यापपर्यंत अर्निणीत ठेवल्याबद्दल संबंधितांवर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी पुढे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांनाही शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगा-कडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांचा दिनांक १३-०२-२००७ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक १३-०३-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी लगेच अपिलार्थीस दिनांक १५-०३-२००७ रोजी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयातील अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अपिलार्थीने केलेली सही त्यांनी आयोगास दाखविली. यामध्ये अपिलार्थीने त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मुदतीत मिळाली असल्याचे अभिप्राय लिहून त्याखाली आपली सही केली आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त झाल्याची पोच पावती दिली आहे. त्याचबरोबर त्यांनी केलेले जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपील देखील तशाच विनंतीवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीस ठेवले नाही. एवढे असूनही त्यांनी परत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे दिसून येते. वरील संपूर्ण घटनाक्रम पाहता या प्रकरणामध्ये अपिलार्थीने वेळोवेळी स्वतःची भूमिका बदलून आपल्या वर्तणुकीतील विसंगती दर्शविली आहे असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाचे खंडण करण्याकरिता किंवा खरोखरच माहिती प्राप्त न झाल्याचा अपिलार्थीचा दावा सिध्द करण्यासाठी त्यांनी आयोगासमोर कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत व आजच्या सुनावणीसही ते गैरहजर राहिले आहेत हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्राचा आधार घेणे आयोगास योग्य वाटते. सदर कागदपत्रावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या या विसंगतीपूर्ण वर्तनामुळे व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पुरविली

असल्यामुळे, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले दिनांक १८-०६-२००७ चे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०५-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. होळे दशरथ अच्युतराव, रा. अष्टामोड, पोस्ट गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.
२ जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८६७

निर्णय दिनांक   ०५-०२-२००८

श्री. शिवकुमार तुळजाराम फुलारी, : अपिलार्थी
गौसपुरा, दोस्ताना पान टपरी जवळ,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था
लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था,
लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शिवकुमार तुळजाराम फुलारी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था श्री. निकम नरेंद्र रामचंद्र (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था श्री. शेख फैय्याज अहमद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व

सचिव स्नेहप्रभा सहकारी भा. मा. गृहनिर्माण संस्था मर्या. यांचे वतीने ॲडव्होकेट श्री. महेंद्रकुमार डी. इंगळे (यापुढे त्यांना त्रयस्त पक्ष म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी श्री. शिवकुमार तुळजाराम फुलारी यांनी आयोगाकडे दिनांक २३-०१-२००८ रोजीचे शपथपत्र दाखल केले असून, आयोगाकडे केलेला व्दितीय अपील अर्ज, जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला मूळ माहितीसाठीचा व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अपील अर्ज या सर्व अर्जावर त्यांच्या वडिलांनी त्यांच्या खोट्या सह्या केल्याचे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील याच अपिलार्थीचे प्रथम अपील देखील फेटाळतांना इतर मुद्दयांबरोबर हा मुद्दा विचारात घेतला आहे. अपिलार्थी यांच्याबरोबर, त्रयस्त पक्षाने देखील आयोगाकडे एक वेगळे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी, अपिलार्थी यांचे वडील श्री. तुळजाराम फुलारी हे संस्थेचे माजी सचिव असून त्यांनी त्यांच्या सचिव पदाच्या कालावधीत गैरव्यवहार करुन संस्थेच्या उदिष्टपुर्तीच्या कामात अडथळे निर्माण केले होते त्यामुळे त्यांना सचिव पदावरुन दूर जावे लागले या बाबीचा राग मनात धरुन ते संस्थेच्या विरुध्द व सहकार खात्याच्या अधिका-यांविरुध्द खोट्या तक्रारी व केसेस करतात आणि कोणाच्याही नावाने संस्थेकडे तक्रारी करुन माहिती मिळवून माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करुन मानसीक त्रास देतात. आयोगाकडे केलेले व्दितीय अपील त्यांनी त्यांच्या मुलाच्या म्हणजेच एस. टी. फुलारी यांची बनावट व खोटी सही करुन खोटे व बनावट अपील आयोगासमोर दाखल केले आहे, असे म्हटले आहे.

त्याचबरोबर या प्रकरणी अपिलार्थी यांनी केलेला मूळ अर्ज व आयोगाकडे केलेले व्दितीय अपील यातील नमूद केलेला पत्ता व आज अपिलार्थीने त्यांचे मतदार ओळखपत्र आयोगास सादर केले यावरील पत्ता यामध्ये विसंगती आढळून येत असल्याने अपिलार्थीच्या नावाने दुस-या कोणा व्यक्तीने अर्ज केल्याचे त्यांचे गृहीतक दृढ होत आहे.

वरील शपथपत्रावरुन मूळ अपिलार्थी यांची कोणीतरी बनावट सही करुन व्दितीय अपील सादर केल्याचे सिध्द होत असल्याने सदर अपील खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील खारीज करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०५-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिवकुमार तुळजाराम फुलारी, गौसपुरा, दोस्ताना पान टपरी जवळ, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९२०
निर्णय दिनांक-०५ फेब्रुवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर,<br>मु.पो.सताळा, तालूका-अहमदपूर.<br>जिल्हा-लातूर-४१३५२३. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औसा,<br>जि.लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>तालूका कृषि अधिकारी, औसा,<br>जिल्हा.लातूर. | : | |
| | प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औसा. |
| | प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, औसा. |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०५.०२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, औसा, श्री. माधव भागवतराव बावगे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औसा, श्री. मोरे राजकुमार तुकाराम (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-२९-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९०-९१ या कालावधीतील फलोत्पादन योजने अंतर्गत केलेल्या कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" एम.बी.रजिस्टरमध्ये नोंदविलेल्या नोंदीच्या झेरॉक्स प्रति.

- बँकेमार्फत आर्थिक सहाय्याचा पुरवठा करताना नोंदविण्यात आलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रति.
- फळरोप पुरवठा करण्यासाठी नोंदवण्यात आलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रति.
- फळरोप लागवडपुर्व व लागवड नंतर प्रथमवर्षासाठी पायाभूत रासायनिक खतांचा आणि रासायनिक औषधांचा लाभधारक शेतक-यांना वस्तुरुपाने पुरवठा करताना नोंदविण्यात शासनमान्य रेकॉड्‌र्समधील माहितीच्या झेरॉक्स प्रति"

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०८-०९-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- ०२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीस त्यांनी

मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये ७०/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे या पत्राव्दारे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ०७-११-२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संदर्भीय पत्रावर पोंचसही दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या कडील सदर पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ११-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्यामूळे व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०३-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले असून त्यामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये देण्यास, शासकीय कृषि माहिती अधिकारी, औसा यांनी हेतूपूरस्सर कसूर केल्याचे म्हटले आहे. या अपीलामध्ये त्यांनी पुढे त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यामध्ये हेतूपूरस्सर विलंब लावल्याने त्यांच्यावर कलम २० अन्वये योग्यती कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी माहितीसाठीचा मूळ अर्ज केल्यानंतर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही. त्यांच्याकडील दिनांक- २९-०८-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद दिला तो मुळीच दिनांक- ०२-११-२००६ रोजी, तथापि सदर पत्र प्राप्त होण्यापूर्वीच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर कोणतीही कार्यवाही न करता, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केल्यानंतर दिनांक- ०२-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ७०/- रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे कळविले. जन माहिती अधिकारी हे उशिराने माहिती देण्यास तयार झाल्याबद्दल जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि या अपीलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. मात्र माहिती अधिका-यांकडील दिनांक- ०२-११-२००६ रोजीच्या पत्राचा संदर्भ देवून कृषि उपसंचालक, जिल्हा कृषि अधिकारी यांनी त्यांना ७०/- रुपये इतक्या शुल्काचा भरणा करण्यांचे त्यांच्याकडील दिनांक- २२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचविले. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अन्वये कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामूळे त्यांनी हे व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, १९९०-१९९१ साली तालूका कृषि अधिकारी कार्यालय, औसा हे कार्यालय अस्तित्वात नव्हते अपिलार्थीने ज्या योजनातंर्गत माहिती मागविली होती. त्या योजना (Principal) प्रमूख कृषि अधिकारी लातूर, उपविभागीय कृषि अधिकारी, प्रशिक्षण व भेट योजना, लातूर फलोत्पादन

उपसंचालक, लातूर व विभागीय मृदसंधारण अधिकारी, लातूर, या चार कार्यालयांकडून राबविल्या जात होत्या. या सर्व कार्यालयाचे जुलै, १९९८ मध्ये एकत्रिकरण झाले व सर्व अभिलेखे जिल्हा कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी, लातूर यांच्याकडे हस्तांतरित झाले. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मोजमाप पुस्तिका तालूका कृषि अधिकारी कार्यालयाकडे हस्तांतरीत झाल्या व उर्वरित सर्व अभिलेखे उपविभागीय अधिकारी कृषि, लातूर यांच्या कार्यालयाकडे हस्तांतरित झाले. तद्नंतर संबंधीत अभिलेख्याचे वर्गीकरण करुन मोजमाप पुस्तिका वगळता इतर सर्व अभिलेखे 'क' वर्गातील असल्याने व 'क' वर्गातले अभिलेखे जतन करण्याचा कालावधी ५ वर्षाचा असल्यामूळे, सदर जतन कालावधी संपल्यानंतर ही कागदपत्रे नष्ट करण्यात आली आहेत. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी फक्त मोजमाप पुस्तिका त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. अपिलार्थीने मागितलेल्या माहिती पैकी मोजमाप पुस्तिकाच्या झेरॉक्सप्रती देण्यास ते तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपीलअर्ज त्यांना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या कार्यालयातून दिनांक- २०-१०-२००६ रोजी प्राप्त झाला. जन अपिलीय अधिकारी यांना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी या अपील अर्जासोबत पाठविलेल्या पत्रामध्ये त्यांना अपिलार्थीस विचारेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे पाठविण्याचे सूचित केले. त्यावरुन त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी एकूण ७०/- रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे त्यांच्याकडील दिनांक-०२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले व त्याची प्रत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना दिली. अपिलार्थीच्या अपील अर्जाची सुनावणी कशा प्रकारे असू नये व सदर अर्ज कशा प्रकारे हाताळू नये, याचा उत्तम नमूना कृषि विभागातील कर्मचारी / अधिकारी यांनी या प्रकरणातील त्यांच्या कृतीव्दारे घालून दिला आहे. जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अपीलअर्ज प्राप्त झाल्यानंतर वास्तविकतः त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघानाही एकत्र बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून घेवून व ते नोंदवून त्यावर आपला अंतिम निर्णय पारीत करणे हे अपील ठरविणे या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी या प्रकरणात अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय देण्याची कोणत्याही प्रकारच्या कृतीचा अवलंब केलेला नाही. त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीची नोंद आयुक्त कृषि, पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना येथे सूचविण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद पाहाता या ठिकाणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास विहित अधिनियमाव्दारे विहित मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती १६ वर्षापूर्वीची जुनी असून या माहिती संदर्भातील बहूतांश अभिलेखे नष्ट करण्यात आल्याचे कृषि विभागाच्या अधिका-याने आज सुनावणीमध्ये सांगितले. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मोजमापपुस्तिकाच्या प्रति आजही त्यांच्याकडे उपलब्ध असून त्या देण्यास जन माहिती अधिकारी तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे कबुल केले आहे की, कृषि विभागाच्या सर्व कार्यालयाचे जुलै, १९९८ मध्ये एकत्रिकरण होवून अपिलार्थिने मागितलेली माहिती उपविभागीय कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या कार्यालयाकडे एकत्रित करण्यात आली. याचाच अर्थ अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात शोध घेतल्यास उपलब्ध होवू शकते असा होतो. त्यामूळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मागितलेली माहिती ४ कार्यालयामध्ये विखुरली गेली होती. त्यामूळे सदर माहिती शोधण्यासाठी प्रयास पडले वगैरे युक्तीवाद आयोग मान्य करीत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मोजमाप पुस्तिकाच्या प्रति वगळता उर्वरित सर्व माहिती, सदर अभिलेख्याचे जतन करण्याचा कालावधी ५ वर्षाचा असल्यामूळे नष्ट करण्यात आली आहे व त्या प्रमाणे त्यांनी आयोगासमोर शपथपत्र सादर केले आहे. वरील वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस आता मोजामाप पुस्तीकाच्या नस्ती शिवाय इतर कोणतीही माहिती उपलब्ध होवू शकत नाही, हे उघड आहे. या प्रकरणी मूळात अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा जास्त विलंब लावल्याने व त्याव्दारे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीचा निश्चीतपणे भंग केल्याने ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतूदीस निश्चीतपणे पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देवून आपल्या कार्यशैलीतील स्पष्ट केलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वा वृती बद्दल त्यांचेवर आयुक्त (कृषि) यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी. सदर प्रशासकीय कार्यवाही त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामूळे जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कार्यवाहीचे कोणतेही आदेश नाहीत.

त्याचबरोबर अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने, माहिती देण्याचा विहित कालावधी संपून गेला असल्यामूळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) अन्वये विनामूल्य माहिती पुरवावी लागेल, हे उघड आहे. त्यामुळे अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच

१० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरवावी. असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद न देवून त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाइ बद्दल त्यांच्यावर आयुक्त (कृषि) यांनी प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक- ०५-०२-२००८.

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद

**प्रत**

१. श्री.हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, मु.पो.सताळा, तालूका-अहमदपूर. जिल्हा-लातूर- पिनकोड-४१३५२३.

२. जनमाहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औसा, जिल्हा-लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औसा, जिल्हा- लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-०५, यांना

या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८६८
निर्णय दिनांक-०५ फेब्रुवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.नरेंद्र चंद्रशेखर पाटील,<br>शितली स्मृती, अहिल्याबाई होळकर<br>उद्यानाजवळ, बिदर रोड,<br>उदगीर, जिल्हा-लातूर. | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>विशेष भूसंपादन अधिकारी, पूर्णा प्रकल्प,<br>लातूर. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, लातूर. | | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०५.०२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.नरेंद्र चंद्रशेखर पाटील (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, पूर्णा प्रकल्प, लातूर, श्री.प्रदीप विश्वंभरराव मरवाळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, लातूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-३१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन १९९३ ते २००६ या कालावधीतील देवर्जन मध्यम प्रकल्पनाच्या उजव्या कालव्यासाठी भूसंपादनाच्यापोटी वाटप झालेल्या मावेजा संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१) स.नं. ७० मधील २ हे. जमिन श्री. मल्लिकार्जून माणिकराव पाटील, रा. नेकनाळ यांनी सन १९८३ मध्ये सौ.शितल चंद्रशेखर पाटील यांना विक्री केलेली होती. सन १९९३ दरम्यान स.नं. ७० मधील ४६ आर जमिन देवर्जन मध्यम प्रकल्पाच्या उजव्या कालव्यासाठी आपल्या कार्यालयाने संपादित केली. ही वस्तुस्थिती असतांना सदर जमिनीचा मावेजा श्री.मल्लिकार्जून माणिकराव पाटील यांच्या नावाने कोणत्या दस्तऐवजांच्या आधारे मंजूर झाला.

२) अर्जदार नरेंद्र चंद्रशेखर पाटील रा.नेकनाळ यांनी दि. २७-१०-१९९४ रोजी अर्जाव्दारे स.नं.७० मध्ये संपादित ४६ आर जमिनीचा मावेजा मिळण्यास श्री.मल्लिकार्जून माणिकराव पाटील पात्र नाहीत असा आक्षेप घेतला होता. सदर अर्जावर आपल्या कार्यालयाने काय कार्यवाही केलेली होती ?

३) स.न. ७० मधील जमिन व संपादित ४६ आर.जमिनीची मालकी सिध्द करण्यासाठी श्री. मल्लिकार्जून माणिकराव पाटील रा.नेकनाळ यांनी Reg. C.S.No. 268/1995 दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर लातूर यांच्या

न्यायालयात दाखल केला. सन १९९९ दरम्यान श्री. मल्लिकार्जून माणिकराव पाटील यांचा मृत्यू झाला, त्यांचे वारस व वकिल दावा चालविण्यास ईच्छूक नसल्यामूळे Reg. C.S.No. 268/1995 दि. १८/१०/२००० रोजी न्यायालयाने Reg. DISMISSED IN DEFAULT असा आदेश अंतिम दिला. या निर्णयानंतर.

i) श्री. मल्लिकार्जून माणिकराव पाटील यांच्या वारस म्हणून श्रीमती. पुण्यावती मल्लिकार्जून पाटील यांच्या नांवाची नोंद आपल्या कार्यालयाने घेतली.

ii) श्रीमती. पुण्यावती मल्लिकार्जून पाटील यांना स.नं.७० मधील ४६ आर. संपादित जमिन मावेजा दिनांक- ३/३/२००६ रोजी वाटप करण्यात आला.

क्र. i) व ii) मध्ये नमूद केलेली कार्यवाही आपल्या कार्यालयाने कोणत्या दस्ताऐवजांच्या आधारे व कोणत्या कायद्यातील कोणत्या कलम / पोटकलमान्वये केली स्पष्ट करावे."

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे दिनांक २२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी पुढे, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती संबंधात उपलब्ध कागदपत्राची आवश्यकता असल्यास तर ते सशुल्क पुरविण्याची तयारी देखील दर्शविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. तथापि अपिलार्थीच्या या प्रथम अपीलअर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी न झाल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १८-०१-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून अपिलीय अधिकारी यांचा निर्णय माहिती अधिका-याच्या स्वाक्षरीने अपिलार्थीस दिल्याचे व सदर निर्णयाने ते संभ्रमीत झाल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या कृतीस जन अपिलीय अधिकारी हे पायबंद घालत नसल्याचे त्यांनी या अपीलामध्ये नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या ठिकाणी अपिलार्थीच्या प्रथम अपीलअर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, लातूर यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता विशेष भुसंपादन अधिकारी - जे या प्रकरणी जन माहिती अधिकारी आहेत. त्यांच्याच स्वाक्षरीने अपिलार्थीस परत त्यांच्या प्रथम अपीलाच्या संदर्भाने दिनांक- १६-१०-२००६ रोजी एक पत्र पाठविण्यात आले आहे. यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक- २२-०९-२००६ रोजीच्या पत्रामधील मुद्यांची पुनरावृती करण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनीच जन अपिलीय अधिकारी म्हणून अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय पारित करणे

अथवा अपिलार्थीशी निर्णयासाठी पत्रव्यवहार करणे अवैध असून, जन अपिलीय अधिका-याने स्वतः निर्णय देणे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत आहे.

आज झालेल्या युक्तिवादाचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी याच विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०६-०६-२००६ रोजी केलेल्या अर्जा संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती व प्रश्नाधीन असलेल्या अर्जा संदर्भात दिलेली माहिती या दोन्हीही माहितींमध्ये विषय एक असूनही माहिती मात्र पूर्णतः विसंगत आहेत. या विसंगतीचा ताळमेळ घालण्यात यावा.

अपिलार्थीने जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जिल्हाधिकारी, लातूर यांनी या अपीलाची सुनावणी न घेता अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनीच परत अपिलार्थीस आपले अभिप्राय कळविणे. हे माहिती अधिकार अधिनियमाच्या मधील मूळ तरतुदीस व तत्वांना छेद देते. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जिल्हाधिकारी, लातूर यांनी या टप्यावर सुनावणी घेणे अनिवार्य आहे, असे आयोगास वाटते. सबब जिल्हाधिकारी, लातूर यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक- ३०-०९-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर स्वतंत्रपणे सुनावणी घेवून अपिलार्थीस आपले पूर्णतः म्हणणे मांडण्याची संधी देवून त्यावर आपला निर्णय पारीत करावा. सदर अपीलाची सुनावणी जिल्हाधिकारी, लातूर यांनी हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत घ्यावी व आपला निर्णय तात्काळ पारीत करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी लातूर यांनी हे आदेश निर्गमीत होताच अपिलार्थीच्या दिनांक-३०-०९-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर २० दिवसाच्या आत सुनावणी घेवून आपला निर्णय तात्काळ पारीत करावा.

औरंगाबाद
दिनांक- ०५-०२-२००८.

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद

प्रत

१. श्री. नरेंद्र चंद्रशेखर पाटील, शितल स्मृती, अहिल्याबाई होळकर उद्यानाजवळ, बिदर रोड, उदगीर, जिल्हा- लातूर.
२. जनमाहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, पूर्णा प्रकल्प, लातूर, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१५३

निर्णय दिनांक : ०५-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अन्सारी बशीर अहमद अ.रज्जाक,<br>ताशा गल्ली नं. ८, धुळे. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी<br>तथा, उपविभागीय अधिकारी, धुळे | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. अन्सारी बशीर अहमद अ. रज्जाक (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, धुळे श्री. गोविंद मुरलीधर कदम (त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, महसूल विभागाचे तहसीलदारापासून ते सचिव स्तरावरील सर्व अधिकाऱ्यांकडून त्यांनी तयार केलेल्या तक्त्यामध्ये माहिती मिळविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. तथापि त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधितांकडून प्राप्त झालेली नाही. त्याचबरोबर धुळे शहरामध्ये कोणत्याही प्रकारची कायदेशीर नोटीस न देता सुमारे ११६ केरोसीन परवानाधारकांचे परवाने महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकतर्फी रद्द करुन ते परवाने परस्पर इतर व्यक्तींना दिले आहेत. या प्रक्रीयेमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याची शंका या तक्रारीमध्ये व्यक्त केली आहे. त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे, तक्रारदाराने माहिती देण्यासंदर्भात उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, धुळे यांना आदेश देण्याची, आयोगास

विनंती केली आहे. याच तक्रारीमध्ये त्यांनी असेही नमुद केले आहे की, त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्याच्या विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी, तसेच धुळे तहसील कार्यालयातील शासकीय सेवेत असलेले अधिकारी/कर्मचारी यांनी अधिकाराचा दुरुपयोग करुन रॉकेल विक्रीचे परवाने स्वतःचे घरात घेतलेले आहेत, सदर परवाने रद्द करण्याचे व विनानोटीस ज्यांचे परवाने रद्द झालेले आहेत, त्यांना पुन्हा परवाने देण्याबाबत आदेश महसूल आयुक्त, नाशिक यांना द्यावेत, अशीही त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये उत्तरवादी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या म्हणण्याप्रमाणे तक्रारदार यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत दि. ६.१.२००६ रोजी अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रथमतः त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी अर्ज दाखल केला होता. अन्न व नागरी पुरवठा मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयाकडून त्यांचे दि. २५.१.२००६ रोजीच्या पत्राद्वारे उत्तरवादी यांचे कार्यालयात तो अर्ज पाठविण्यात आला होता. सदर पत्र व तक्रारदाराचा अर्ज उत्तरवादी यांना दि. ३०.१.२००६ रोजी प्राप्त झाले. तक्रारदार यांचे मूळ अर्जास उत्तरवादी यांनी त्यांच्याकडील दि. ७.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन तक्रारदार यांना रु. २९४४/-इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचविले. त्याचबरोबर या पत्रामध्ये त्यांनी दि. १६.३.२००६ पूर्वी तक्रारदारांना आवश्यक ती रक्कम त्यांचे कार्यालयात न भरल्यास, त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येईल, अशीही तक्रारदारास सूचना केली आहे. उत्तरवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे तक्रारदार यांनी माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी आवश्यक ते शुल्क शासकीय कोषागारात न भरल्यामुळे त्यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दि. २४.४.२००६ अन्वये तक्रारदार यांचा अर्ज निकाली काढला. या निर्णयावर तक्रारदार यांनी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी धुळे यांचेकडे दि. १.४.२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपील केले. सदर अपीलाच्या दि. २.५.२००६ रोजीच्या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडून आवश्यक ती फी भरुन घेतल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यास त्यांनी माहिती देण्याचे सूचविले. जन अपिलीय अधिकारी यांचे निर्णयावर समाधान न झाल्याने तक्रारदार यांनी मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयात दि. २७.६.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. या अपीलाची सुनावणी आतापर्यंत झालेली नाही, असे उत्तरवादी यांनी आज झालेल्या सुनावणीमध्ये सांगितले.

उत्तरवादी यांचे म्हणण्याप्रमाणे, तक्रारदार यांनी सन १९८० पासून किरकोळ केरोसिन परवानाधारकांच्या माहितीची मागणी केली आहे व ती माहिती एका विशिष्ट नमुन्यात तयार करुन तक्रारदार यांना हवी आहे. उत्तरवादी यांनी आज सुनावणीमध्ये तक्रारदार यांनी मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(९) च्या तरतुदीप्रमाणे समर्थनीय ठरत नाही असा युक्तीवाद केला आहे; सदर युक्तीवाद आयोग मान्य करीत नाही. कारण सर्वसाधारणपणे अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांनी ज्या स्वरुपात मागितली आहे त्याच स्वरुपात देण्याची या कलमामध्ये तरतुद आहे. याचबरोबर त्यांनी शासन निर्णय क्र. १००३/प्र.क्र.३२४९/नापु-२७,दि. ७.७.२००६ नुसार उपविभागीय अधिकारी यांचेकडून नवीन किरकोळ केरोसिन परवाना मंजूर करण्याचे अधिकार, परवान्याचे अनुषंगीक सर्व अधिकार व अनुज्ञप्ती काढण्यात येऊन, ते जिल्हा पुरवठा अधिकारी यांना प्रदान करण्यात आले असल्याचे देखिल आयोगाच्या निदर्शनास आणले आहे..

उपरोक्त प्रकरणी येथे असे दिसून येते की, मूळात तक्रारदारांचा दि. ६.१.२००६ रोजीचा अर्ज उत्तरवादी यांना दि. ३०.१.२००६ रोजी प्राप्त झाला, त्यासंदर्भात उत्तरवादी यांनी दि. २.३.२००६ रोजी किंवा तत्पूर्वी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) अन्वये कार्यवाही करणे अपेक्षित होते. तथापि त्यांनी या प्रकरणी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही न करता प्रतिसाद न दिल्याचे सिध्द होत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, तक्रारदार यांनी मागितलेली माहिती, आता जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे ताब्यात असल्याने, त्यांचेकडून ती घेऊन उत्तरवादी यांनी सदर माहिती तक्रारदाराने मागणी केलेल्या तक्त्यामध्ये, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

तक्रारदार यांनी केलेल्या सदर तक्रारी संदर्भात तक्रारदाराच्या मूळ तक्रार अर्जाची झेरॉक्स प्रत महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना देण्यात येऊन त्यांनी या अर्जात तक्रारदाराने केलेल्या अर्जासंदर्भात लवकरात लवकर चौकशी करावी, अशी त्यांना सूचना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२. महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी तक्रारदाराने केलेल्या संदर्भित अर्जासंदर्भात लवकरात लवकर चौकशी करावी.

३.	उत्तरवादी यांनी, तक्रारदार यांनी मागितलेली माहिती, आता जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे ताब्यात असल्याने, ती त्यांचेकडून घेऊन तक्रारदाराने मागणी केलेल्या तक्त्यामध्ये त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अन्सारी बशीर अहमद अ.रज्जाक,गल्ली नं. ८, धुळे.

२ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ विभागीय महसूल आयुक्त, नाशिक विभााग, नाशिक रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा पुरवठा अधिकारी, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९०२

निर्णय दिनांक ०६-०२-२००८

श्री. सुभाष नारायणराव पोफळे, : अपिलार्थी
रा. आळंद, तालुका फुलंब्री,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, आळंद, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुभाष नारायणराव पोफळे, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, आळंद, तालुका फुलंब्री व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री हे सर्व गैरहजर आहेत तर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्री. व्ही. व्ही. गुजर हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये मौजे आळंद तालुका फुलंब्री येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मिळकत क्रमांक ३०८ वर झालेल्या अतिक्रमणासंदर्भात गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे केलेल्या दिनांक १६-०२-२००४ व ०९-११-२००४ रोजीच्या अर्जावर झालेल्या कारवाईसंदर्भात दिनांक १९-०२-२००४ ते ११/२००४ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " अर्जदाराच्या दिनांक १६-०२-०४ व दिनांक ०९-११-०४ मा. गट विकास अधिकारी, पं. स. फुलंब्री यांचेकडे केलेल्या विनंती अर्जावर, वरील संदर्भिय प्रकरणात मा. गट विकास अधिकारी पं. स. फुलंब्री यांनी काय कार्यवाही केली, त्याची माहिती खालील प्रमाणे पाहिजे.
>
> १. अर्जदाराच्या मूळ अर्जावर गट विकास अधिकारी यांचा शेरा.
>
> २. त्यानुसार ग्रा. पं. आळंदला काय निर्देश केले, त्याची माहिती. "

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपील अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे केल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीने मागितलेली माहिती ग्रामपंचायत

स्तरावरील असल्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री हे जन अपिलीय अधिकारी आहेत असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांचे दिनांक ०७-०६-२००६ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीस सदर माहिती दिल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री यांना त्यांच्याकडील दिनांक १३-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचे अपील हस्तांतरीत केले. तथापि गट विकास अधिकारी, फुलंब्री यांनी सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर सुनावणी घेण्याचे व त्यांना माहिती देण्याचे का टाळले अशी विचारणा करण्यात यावी असे तसेच संबंधीत जन माहिती अधिका-यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांना न्याय द्यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगा-कडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही साधी सरळ व सोपी होती.

अपिलार्थीने त्यांच्याकडून त्यांच्या मालकीच्या मौजे आळंद येथील गट क्रमांक २ मधील मिळकत क्रमांक ३०८ मध्ये काही व्यक्तिंनी अनाधिकृत बांधकामे केली असून ती बांधकामे चालू असतांना सदर बांधकामांना परवानगी देऊ नये अशा अर्थाचे गट विकास अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०२-२००४, ०९-११-२००४ रोजी अर्ज केले होते. या मूळ अर्जावर गट विकास अधिकारी यांचा शेरा व ग्रामपंचायत आळंदला दिलेले निर्देश अपिलार्थीस हवे आहे. थोडक्यात अपिलार्थीने केलेल्या दिनांक १६-०२-२००४ व ०९-११-२००४ रोजीच्या अर्जाची गट विकास अधिकारी यांचे अभिप्रायासह झेरॉक्स प्रत अपिलार्थीस आवश्यक आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार केलेल्या त्यांच्या विचाराधीन अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कारवाई केली नाही. तद्वतच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक १९-०५-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेऊन आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाचे दर्शन घडविले आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाची महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग यांनी दखल घ्यावी असे त्यांना सुचविण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर त्यांनी कोणतीही कृती न करणे हे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट करते.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित मुदतीत कारवाई न करुन दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य

प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस शासनाकडे का करु नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीमध्ये त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांना या प्रकरणामध्ये काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हे आदेश अंतीम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न केल्याबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस शासनाला का करु नये याचा खुलासा त्यांनी ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०६-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष नारायणराव पोफळे, रा. आळंद, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, आळंद, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९०३

निर्णय दिनांक ०६-०२-२००८

श्री. संजय लक्ष्मण नाईकवाडे, : अपिलार्थी
भोईगल्ली, चिखलवाडी,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अधीक्षक अभियंता,
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, कार्यालय,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, सिंचन भवन,
नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संजय लक्ष्मण नाईकवाडे, जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०९-२००२ ते २०-१०-२००६ या कालावधीतील श्री. लक्ष्मण बाबय्या नाईकवाडे यांच्या सेवासमाप्तीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“१. दिनांक २६-११-८१ च्या आदेशान्वये चौकीदार पदावर नियुक्ती दिलेली असतांना शिपाई रुपांतरीत केलेल्या आदेशाची छायाप्रत.

२. नियम-८ खालील कार्यवाही सुरु करण्यात आल्यानंतर नोंदविलेला “रोजनामा” च्या छायाप्रती.

३. साक्षीदाराने नोंदविलेल्या साक्षीच्या छायाप्रती.

४. सादरकर्ता अधिका-याचे युक्तिवादाचे टाचण.

५. चौकशी अधिका-याचा चौकशी अहवाल.

६. एकूण किती सुनावण्या झाल्या त्याचा तपशील व त्यासाठी वडिलांना बोलावण्यात आलेल्या समन्सच्या छायाप्रती.

७. चौकशी अधिकारी / सादरकर्ता अधिकारी यांचे नियुक्ती आदेश.

८. दिनांक २०-१०-२००६ रोजी माझ्या वडिलांनी केलेल्या अपील अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी त्यांचे कार्यालयात रुपये २६ इतके शुल्क भरण्याचे सुचविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करतांना अपिलार्थीने दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या निकालाविरुध्द सदर अपील केल्याचे म्हटले आहे. तथापि दिनांक २८-१२-२००६ रोजीचे आदेश आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये समाविष्ट नाहीत.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०१-२००७ रोजी सुनावणी ठेवली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. सदर सुनावणीचे पत्र जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०१-२००७ रोजी पाठविले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी घेतली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही.

जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या कथित निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना विहित मुदतीत माहिती मिळाली नाही, मुदतीअंती चुकीची व अर्धवट माहिती जन माहिती अधिका-याने दिली व त्यांची फसवणूक केली. तद्वतच जन अपिलीय अधिकारी यांनी वेळकाढूपणा करुन मुदतवाढ मागितली आहे अशी कारणे अपिलात नमूद केली आहेत.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत. आयोगास अपिलार्थीतर्फे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २७-११-

२००६ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे. तथापि अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले किंवा कसे हे अपिलार्थीने आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन कळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) अन्वये कारवाई केली असल्यामुळे, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीने म्हटल्याप्रमाणे दोषी ठरविता येत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिल अर्जामध्ये चुकीची व अर्धवट माहिती देऊन त्यांची फसवणूक केली असल्याचे म्हटले आहे. तथापि आपले म्हणणे मांडण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर गैरहजर आहेत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या विषयी व्यक्त केलेले अभिप्राय सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर कोणताही पुरावा सादर करु शकले नाहीत. सबब अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्या-योग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०६-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय लक्ष्मण नाईकवाडे, भोईगल्ली, चिखलवाडी, नांदेड.
(By R.P.A.D.)

२ जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९१३
निर्णय दिनांक-०६ फेब्रुवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.सुदाम कान्हु आवारे,<br>मु.पो. इमामपूर ता.जि. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>मा.उपजिल्हाधिकारी, रो.ह.यो. शाखा,<br>अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>रो.ह.यो.शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>अहमदनगर. | : | |
| | प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | उपलेखापाल (रो.ह.यो.)<br>जिल्हाधिकारी कार्यालय,<br>अहमदनगर. |
| | प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी | : | उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.)<br>जिल्हाधिकारी कार्यालय,<br>अहमदनगर. |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.सुदाम कान्हु आवारे (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा उपलेखापाल ( रो.ह.यो.) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर, श्री. रावसाहेब वामन बुधवंत (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २३-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन २००४ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे माहिती मागविली आहे.

" रो.ह.यो. कामावरील हजेरी सहाय्यकांची सन २००४ ची जेष्ठता सुची शासन सेवेत सामावून घेण्यासाठी पात्रता दर्शविलेली सन २००४ ची जेष्ठता यादी.

श्री.एस.के.आवारे, हजेरी सहाय्यक यांची शैक्षणिक पात्रता एस.एस.सी पास असुन ती एस.एस.सी नापास अशी मा. आयुक्त यांना कळविली. ती असी का कळविली याचे लेखी स्वाक्षरीने उत्तर- तसेच हयास जबाबदार असणा-या अधिकारी/ कर्मचारी यांची संपूर्ण नांवे."

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०३-०५-२००६ रोजी

प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याप्रित्यर्थ त्यांनी हे अपील केले असल्याची माहिती जन अपिलीय अधिकारी यांना या अपील अर्जामध्ये दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- १०-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, त्यांना सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी १८/- रुपये इतके शुल्क सरकारी खजिन्यात भरल्यानंतरच त्यांना माहिती देण्यात येईल, असे विदित केले. या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांच्या कार्यालयातील श्री.एम.एम.कडनर, अ.का. यांनी प्रत्येक पानास २/- रुपये प्रमाणे ९ पानाकरिता १८/- रुपये चलनाने सरकारी खजिन्यात भरण्या करिता समक्ष सूचना देवूनही अपिलार्थीने सदर रकमेचा भरणा केला नाही. असेही पुढे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) यांची नेमणूक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी केली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील अपीलावर सुनावणी न घेता, अपिलार्थीस त्यांचा निर्णय अशा प्रकारे कळविण्याची त्याची अशा प्रकारची कृती गैर व बेजबाबदारपणाची आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस, त्यांनी प्रथम माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर त्यांच्या अर्जावरील आपला निर्णय जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) अन्वये विहीत मुदतीत लेखी कळविणे गरजेचे आहे. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री.एम.एम.कडनर, अ.का. या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-याच्या तोंडी विधानावर विश्वास ठेवून अपिलार्थीस शुल्क भरण्याच्या सूचना प्राप्त झाल्याचे गृहित मानले व त्यावर अपिलार्थीस वरील प्रमाणे निर्णय कळविला.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील ठरविण्याच्या अशा कृतीबद्दल आयोग या ठिकाणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस सदर निर्णय त्यांनी अंडरपोस्टींग सर्टीफिकेटने पाठविलेला आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर पत्र प्राप्त झाले नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडरपोस्टींग सर्टीफिकेटने पत्र पाठविले असल्यामूळे अपिलार्थीस त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाले नाही हे म्हणणे आयोग अग्राहय धरत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्यामूळे व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते २००४ सालापर्यंत मस्टरकारकून म्हणून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (रोहयो) यांच्या कार्यालयात हजेरी सहाय्यक म्हणून कार्यरत होते. सदर हजेरी सहाय्यकांना शासकीय नोकरीत सामावून घेत असतांना जे हजेरी सहाय्यक एस.एस.सी उत्तीर्ण होते. त्यांना लिपीक पदावर व जे हजेरी सहाय्यक एस.एस.सी अनुत्तीर्ण होते त्यांना शिपाई या पदावर सामावून घेण्यात आले. त्याप्रमाणे ते सध्या अहमदनगर जिल्हापरिषद येथील कार्यालयात शिपाई या पदावर कार्यरत आहेत. ते एस.एस.सी उत्तीर्ण असतांना देखील जिल्हाधिकारी कार्यालयाने तयार केलेल्या ज्येष्ठता यादीमध्ये त्यांची शैक्षणिक पात्रता एस.एस.सी नापास अशी दाखविली गेली असल्यामूळे त्यांना शिपाई या पदावर सामावून घेण्यात आले. ते एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण असल्याने ते लिपिक पदावर नेमणूक मिळण्यास

पात्र असतानांही त्यांना त्याच्या खालच्या दर्जाच्या वर्ग-४ च्या शिपाई या पदावर नेमले गेल्याने त्यांच्यावर झालेला अन्याय दूर व्हावा अशी त्यांनी अपेक्षा आयोगासमोर व्यक्त केली. त्याचबरोबर जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या कार्यालयात ठेवलेल्या जेष्ठता यादीमध्ये त्यांचे नांवा पूढे एस.एस.सी नापास ऐवजी एस.एस.सी उत्तीर्ण असा बदल करुन त्यांना योग्यत्या पदावर सामावून घेण्यासंदर्भात आदेश देण्याची अपेक्षा त्यांनी आयोगासमोर व्यक्त केली. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे अपिलार्थीचा सदर अर्ज प्राप्त झाला नाही. माहिती अधिकार अधिनियमा संदर्भातील सर्व कामे सहायक जन माहिती अधिकारी यांच्याकडून केली जात होती. अपिलार्थीस मागितलेली माहिती आता त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ती विनामूल्य देण्यास तयार आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फ युक्तीवाद करण्यात आज रोजी कोणीही उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २३-०३-२००६ रोजी त्यांचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्याच दिवशी प्राप्त झाल्याप्रित्यर्थ त्यांच्या कार्यालयातील लिपीकाने लेखीपोंच त्यांच्या कार्यालयाच्या शिक्यासहित त्याच दिवशी दिलेली आहे. यावरुन अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाला होता, हे सिध्द होते. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदी प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या आत कार्यवाही

करावयास हवी होती. तथापि उपरोक्त प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणताच निर्णय अपिलार्थीस विहित मुदतीत दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे अपिलार्थीचा अर्ज सहाय्यक माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला परंतु त्यांनी तो माहिती अधिकारी यांचेकडे सादर केला नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग मान्य करीत नाही. कारण अपिलार्थीस माहिती देण्याचे प्रथम काम जन माहिती अधिकारी यांचे आहे. सहाय्यक जन माहिती अधिकारी हे त्यांना फक्त माहिती देण्यासाठी, अर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी फक्त सहाय्यक म्हणून काम करतात. अपिलार्थीस माहिती देखिल जन माहिती अधिकारी यांच्या सहीने दिली जाते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये माहिती देण्याच्या अथवा नाकारण्याच्या कोणत्याही प्रक्रीयेमध्ये सहाय्यक जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षतः जबाबदार ठेवलेले नाही. सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्ज सादर केला नाही. हे त्यांच्या कार्यालयीन प्रशासनाचे अपयश आहे, असे आयोग मानते. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर त्यांनी दिनांक- १०-०५-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपिलार्थीस, सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी त्यांना १८/-रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यांच्या मते अपिलार्थीस त्यांनी आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी १८/-रुपये शुल्काचा भरणा सरकारी खजिन्यात भरण्याच्या सूचना त्यांचे कार्यालयातील श्री.एम.एम.कडनर, अ.का. यांनी अपिलार्थीस समक्ष दिल्या होत्या. श्री. एम.एम.कडनर, अ.का. यांनी अपिलार्थीस अशा प्रकारची कोणतीही सूचना कधीही दिल्या नव्हत्या, असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक- १०-०५-२००६ रोजीच्या पत्रामध्ये श्री. एम.एम.कडनर,अ.का. यांनी अपिलार्थीस कधी सूचना दिल्या होत्या त्या दिनांकाचा व वेळेची नोंद नाही. उपजिल्हाधिकारी (रोहयो) या सारख्या जबाबदार पदावर काम करणा-या अधिका-याला अपिलार्थीस माहिती

प्राप्त करुन घेण्यापोटी लागणा-या शुल्का संबंधी माहिती लेखी कळवावयाची असते. याची देखील माहिती नसावी, ही बाब दुर्देवी आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीचे अपील ठरवितांना त्यांनी जर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून अपिलाची सुनावणी घेतली असती तर या सर्व बाबीची शहानिशा होवून अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ त्यांच्याच पातळीवर योग्य तो निर्णय लागला असता, तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाइ स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाइ व कर्तव्यपरायणतेच्या अभावाची आयुक्त (महसूल) नाशिक विभाग यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

येथे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये रोहयो कामावरील हजेरीसहाय्यकांची सेवाजेंष्ठता यादीची प्रत व त्यांची शैक्षणिक पात्रता कळविण्यामध्ये चुका केलेल्या कर्मचा-यांचे नाव व पदनाम मागितले आहे. अपिलार्थीने आयोगासमोर सादर केलेल्या कागदपत्रावरुन ते एस.एस.सी पास असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठविलेल्या हजेरीसहाय्यकाची जेष्ठतायादी मध्ये देखील अपिलार्थी हे एस.एस.सी उत्तीर्ण असल्याचे दर्शविण्यात आले होते. तथापि जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या कार्यालयाने हजेरी सहाय्यकांची सेवा जेष्ठता यादी करीत असतांना त्यांना एस.एस.सी अनुत्तीर्ण असे दाखविले आहे. एस.एस.सी अनुत्तीर्ण असे दर्शविल्यामूळे त्यांना लिपीक पदा ऐवजी शिपाई या पदावर नेमले गेले. ही बाब अपिलार्थीवर निश्चीतपणे अन्याय करणारी आहे, असे कोणीही मान्य करील. सबब आयुक्त (महसूल) नाशिक विभाग यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी स्वतः चौकशी करुन अपिलार्थीच्या

शैक्षणिक पात्रतेमध्ये  चूक करणा-या कर्मचा-यावर प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व त्याचबरोबर अपिलार्थीच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये आवश्यक तो बदल करण्याच्या दृष्टीने योग्य ते आदेश पारीत करावेत.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद न देवून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केला आहे. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) अन्वये विनामूल्य माहिती पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली दोनही मुद्यावरील संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस महिती देण्यापोटी विलंब लावल्याबद्दल जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की,  आयुक्त (महसूल) नाशिक यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमा प्रमाणे हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन तद्नंतर आपला अनुपालन अहवाल १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१  अपील  मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती  अधिकारी यांनी अपिलार्थीस, मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली दोन्हीही मुद्यावरील संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद न देवून दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाइ बद्दल त्यांच्यावर आयुक्त (महसूल) नाशिक, यांनी  प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश  निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक- ०६-०२-२००८.

( वि.बा.बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त<br>
खंडपीठ - औरंगाबाद

**प्रत**

१. श्री.सुदाम कान्हु आवारे, मु.पो.इमामपूर, तालूका जिल्हा- अहमदनगर.

२. जनमाहिती अधिकारी तथा  उपलेखापाल (रोहयो) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात  पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त (महसूल) नाशिक, यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९१४
निर्णय दिनांक-०६ फेब्रुवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.आडेसरा संजय सुरेश क.क्र.६८६३, सहाय्यक अभियंता श्रेणी-२, नाशिक महानगरपालिका, नाशिक. ३-ब, सानिका को.ऑप.हौ.सो. राजपाल कॉलनी, मखमलाबाद नाका, पंचवटी, नाशिक-४२२००३. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन) महानगरपालिका, नाशिक. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, नाशिक. | : | |

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०६.०२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.आडेसरा संजय सुरेश (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन) महानगरपालिका नाशिक, श्री. जुगनसिंह ढाकरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांचे प्रतिनिधी, विधी अधिकारी, म.न.पा.नाशिक, श्री.मोहन विश्वनाथ रानडे, (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-०५-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपअभियंता या संवर्गातील पदाच्या संख्ये बाबत एकूण सात मुद्यावर खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

‘‘अ) नाशिक म.न.पा.च्या आस्थापना परिशिष्टावर उपअभियंता संवर्गात एकूण किती पदे आहेत ?

ब) उप अभियता हे पद अर्हतारहित कर्मचा-यांसाठी आहे किंवा कसे?

क) सध्या किती कर्मचारी उप अभियंता या पदावर स्थायी किंवा प्रभारी स्वरुपात कार्यरत आहेत?

ड) एकूण जागांपैकी उप अभियंता संवर्गात पदवीधारक व पदविकाधारक तसेच अर्हतारहीत अभियंत्यासाठी प्रत्येकी किती पदे आहेत ?

इ) सद्य स्थितीत किती पदवीधारक अभियंते स्थायी तसेच प्रभारी स्वरुपात उप अभियंता पदावर कार्यरत आहेत ?

ई) सद्य स्थितीत किती पदविकाधारक / अर्हतारहीत अभियंते स्थायी तसेच प्रभारी स्वरुपात उप अभियंता पदावर कार्यरत आहेत ?

फ) उप अभियंता पदावर अर्हतारहीत शाखा अभियंतांची नेमणुक कोणत्या नियमाधीन करण्यात येते ?"

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- १४-०९-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात काही स्पष्टीकरण विचारले असता, जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास अनुसरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिनांक- २५-०९-२००६ रोजी सदर स्पष्टीकरण दिले आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस निश्चीत काय हवे आहे, याचा बोध अपिलार्थीच्या दिनाक २५-०९-२००६ रोजीच्या पत्राने त्यांना झाल्यामूळे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०९-२००६ रोजी प्रथम अर्ज केला असे गृहीत धरण्यात येत आहे. अपिलार्थी यांच्याकडील दिनांक- २५-०९-२००६ व दिनांक- ०५-०९-२००६ रोजीच्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक- ०५-१०-२००६ रोजी काही माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १८-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करतांना, जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असल्याचे कारण अपिलार्थीने दर्शविल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर दिनांक- ३०-११-२००६ रोजी सुनावणी घेवून दिनांक- ०८-१२-२००६ रोजी आपले आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती १५ दिवसाच्या आत देण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या

दिनांक- ०८-१२-२००६ रोजीच्या आदेशास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- १८-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सुधारीत माहिती दिली.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २१-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी त्यांना हवी असलेली माहिती स्पष्टपणे मिळाली नसल्याचे नमूद करुन, माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीचे उल्लंघन करणा-या विरुध्द नियमानूसार कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक-ब च्या संदर्भातील माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक-ब मध्ये उपअभियंता हे पद अर्हताधारक कर्मचा-यासाठी आहे किंवा कसे, असे विचारले असता, उपअभियंता ( स्थापत्य, यांत्रिकी, विद्यूत, ॲटो ) या संवर्गासाठी मंजूर अर्हते बाबत शासन निर्णयाच्या छायांकितप्रती विहित शुल्क भरुन महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय नाशिक पूर्व या विभागामधील अभिलेखा विभागाकडून उपलब्ध करुन घ्याव्यात, असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उत्तर दिले. तसेच त्यांच्या मूळ अर्जातील प्रश्न क्रमांक- इ संदर्भात सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे कार्यरत असलेले पदवीधारक उपअभियंते, स्थायी तसेच प्रभारी स्वरुपात उपअभियंता या पदावर कार्यरत असलेल्या पदवीधारक उपअभियंत्यांची संख्या त्यांना प्राप्त झाली नाही. अशा प्रकारे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट स्वरुपाची माहिती प्राप्त झाली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक-ब संदर्भातील माहितीचे उत्तर त्यांच्याकडील प्रश्न क्रमांक-फ च्या उत्तरामध्ये समाविष्ट आहे. राज्य शासनाच्या नगर विकास विभागाच्या दिनांक- ०७ जुलै, १९९९ अन्वये दिलेल्या आदेशाप्रमाणे जरी सदर आदेश (विद्युत) प्रवर्गासाठी दिले गेले असले तरीही इतर सर्व शाखेच्या पदवीधर व पदविकाधारक अभियंत्यांच्या संवर्गासाठी हेच नियम लावले जातात. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या प्रश्न-इ संदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती दिली आहे. ( अपिलार्थी यांच्या मते सदर माहिती, उपअभियंता संवर्गातील जेष्ठता यादीतील संख्येशी जूळत नाही. ) अपिलार्थीने उपस्थित केलेला मुद्दा क्रमांक- ई च्या संदर्भात स्पष्टीकरण देतांना त्यांनी असे सांगितले की, शासनाच्या दिनांक ०७ जुलै, १९९९ च्या आदेशातील मार्गदर्शक तत्वे सर्व संवर्गातील उपअभियंत्यांना लावली जातात.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद पाहता व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या ठिकाणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम दिनांक- ०५-१०-२००६ रोजी व प्रथम अपीलाची सुनावणी झाल्यानंतर दिनांक- १८-१२-२००६ रोजी सुधारीत माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीचा मूळ आक्षेप जन महिती अधिकारी यांनी दिलेल्या उपअभियंता पदवीधारक, उपअभियंता पदविकाधारक, यांच्या संवर्गातील संख्ये वरती आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी या दोन्हीही वेळेस दिलेल्या माहितीमध्ये विसंगती असून त्यांना अपेक्षित असलेली माहिती अद्यापही जन माहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे दिलेली नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली व दोन्हीही पत्रातील उपअभियंत्याच्या संख्येचा योग्य तो ताळमेळ घालून अपिलार्थीस निश्चीत स्वरुपात ३ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे मान्य केले.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही असद्हेतूने माहिती देण्याचे टाळाटाळ केली किंवा माहिती दडवून ठेवल्याचे निश्चीतपणे सिध्द न झाल्याने, त्यांच्यावर कोणत्याही कार्यवाहीचे आदेश नाहीत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी बरोबर केलेला पत्रव्यवहार पाहता, त्यांनी अपिलार्थीने उपस्थित केलेल्या काही मुद्दांवर सरळपणे उत्तरे दिली नाहीत, हेही तितकेच सत्य आहे. उदाहरणार्थ- अपिलार्थीने मुद्दा क्रमांक- ब येथे विचारलेल्या प्रश्नास जन माहिती अधिकारी यांना, होय किंवा नाही असे उत्तर देता आले असते. तथापि त्यांनी असे उत्तर न देता, अपिलार्थीस शासन निर्णयाच्या प्रती महानगरपालिकेच्या अभिलेख विभागाकडून प्राप्त करुन घेण्याचे सुचविले. जन माहिती अधिकारी यांची अशा प्रकारची कृती बरोबर नसून त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे माहितीसाठीच्या प्राप्त झालेल्या अर्जाना विहित मुदतीत व सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

आदेश

१.अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, स्पष्ट स्वरुपात व सत्य माहिती त्यांच्याकडील माहितीचा ताळमेळ घालून ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे )

दिनांक- ०६-०२-२००८. राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.आडेसरा संजय सुरेश क.क्र.६८६३, सहाय्यक अभियंता श्रेणी-२, नाशिक महानगरपालिका, नाशिक. ३-ब, सानिका को.ऑप.हौ.सो. राजपाल कॉलनी, मखमलाबाद नाका पंचवटी, नाशिक-४२२००३.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन) महानगरपालिका, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त,महानगरपालिका, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१५५

निर्णय दिनांक : ०६-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शांतीलाल मंगा चौधरी, मु. सोनगीर, ता. जि.धुळे. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, धुळे | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. शांतीलाल मंगा चौधरी, (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, धुळे श्री. मिलींद दत्तात्रय धांडे (त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडून माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार तीन वेगवेगळया अर्जाद्वारे माहितीची मागणी केली होती.त्यामधील पहिल्या अर्जाद्वारे दि. २७.१.२००६ रोजी सोनगिर ता.जि. धुळे येथील भूखंड वाटप प्रकरणात चौकशी करण्याबद्दल उत्तरवादी यांनी गट विकास अधिकारी, धुळे यांना चौकशीचे आदेश दिले होते, सदर अहवाल उत्तरवादी यांचेकडे प्राप्त झालेला होता व त्या अहवालाची प्रत तक्रारदाराने मागितली होती परंतु उत्तरवादी यांनी सदर अहवालाची प्रत न देता ती माहिती गट विकास अधिकारी यांचेकडून घेण्यात यावी, असे दि. १५.२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. दुसऱ्या अर्जाद्वारे

त्यांनी जिल्हा परिषदेकडूनच दि. २१.२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे सन ९४-९५ मध्ये सोनगीर ग्रामपंचायततर्फे केलेल्या भूखंड वाटप प्रकरणाशी संबंधित ३७ ग्राम पंचायत सदस्यांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. धुळे यांनी दिलेल्या आदेशाच्या प्रतींची मागणी केली होती व अर्जामध्ये या प्रती ४८ तासांच्या आत मिळण्यासाठी विनंती केली होती. सदर अर्जाचे उत्तरी उत्तरवादी यांनी दि. १.३.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे रु. ७/- शुल्क भरणा करावे, त्यानंतर ही माहिती टपालाने किंवा व्यक्तिशः देण्यात येईल, असे कळविले. ही माहिती ४८ तासांच्या आत देण्याची विनंती केली असता ८ दिवसांनंतर उत्तरवादी यांनी वरीलप्रमाणे कळविले. तिसरा माहितीसाठीचा अर्ज तक्रारदाराने याच प्रकरणात दि. २१.३.२००६ रोजी केला असून त्याद्वारे त्यांनी ग्रामपंचायत सदस्यांविरुध्द सोनगिर पोलीस स्टेशनमध्ये दि. ११.२.२००६ रोजी गुन्हा नोंद झाला आहे, त्यासंबंधी सोनगिर पोलीस स्टेशन निरीक्षक यांनी उत्तरवादी यांचे कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती ४८ तासांचे आत मिळण्यासाठी विनंती केली होती. सदर अर्जासंदर्भात सुध्दा ७ दिवसांनंतर उत्तरवादी यांनी सदर प्रत न देता ती पोलीस स्टेशन, सोनगिर यांचेकडून घेण्यासाठी, संबंधित पोलीस स्टेशनला अर्ज सादर करावा, असे कळविले. या संदर्भात तक्रारदार यांनी समक्ष सुनावणीमध्ये सांगितले की, उत्तरवादी यांनी त्यांना मागितलेली माहिती त्यांचेकडे उपलब्ध असतांना पुरविली नाही तसेच ती माहिती न देण्यासंबंधी कारणे दिली नाहीत, तसेच जर ती माहिती त्यांचेकडे नव्हती तर त्यांनी त्यांचा मूळ अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे कायद्यातील तरतुदीनुसार हस्तांतरित करणे आवश्यक होते, तसेही त्यांनी केले नाही. याबाबत तक्रारदार यांना नंतर प्राप्त झालेल्या चौकशी अहवालामध्ये पाच व्यक्तींचे विरुध्द कार्यवाही प्रस्तावित असतांना ती माहिती वेळेत न मिळाल्यामुळे ४१ व्यक्तींचे विरुध्द गुन्हे दाखल केले गेले व सर्व व्यक्तींना अटकपूर्व जामीन मिळण्यास अडचण निर्माण होऊन शारीरिक, आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागला. उत्तरवादी यांनी असे करतांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५,६ व ७ चा भंग केला असून यासाठी उत्तरवादी हे त्यासाठी जबाबदार असल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी, अशी आयोगास विनंती केली.

आज सुनावणीचे वेळी उत्तरवादी यांनी त्यांचा युक्तीवाद लेखी निवेदनाद्वारे सादर केला आहे. त्यांनी युक्तीवादामध्ये असे सांगितले की, अर्जदार हे या गुन्हा प्रकरणातील आरोपी नव्हते, तसेच तक्रारदार हे इतर व्यक्तीबाबत ग्राम पंचायत, पंचायत समिती तसेच जिल्हा परिषद या तीनही स्तरावर एकाच वेळी एकाच माहितीसाठी वेगवेगळया अर्जाद्वारे माहितीची मागणी करीत असतात. त्यांचा ब्लॅकमेलींगचा धंदा

आहे. उत्तरवादी यांचे कार्यालयातील सर्व माहिती खुली असून कोणताही अर्ज प्राप्त झाल्यास त्यावर विहित मुदतीत कार्यवाही करण्यात येते. या प्रकरणासंबंधी तक्रारदार यांनी गट विकास अधिकारी स्तरावरसुध्दा माहिती मागितली होती व ती माहिती गट विकास अधिकारी यांचेमार्फत त्यांना पुरविण्यात आली आहे. या संदर्भात माहिती मिळाल्यासंबंधीच्या पत्रावर तक्रारदार यांची पोच उत्तरवादी यांनी दाखविली.

तक्रारदार यांच्या याच भूखंड वाटप प्रकरणातील दि. २१.२.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंदर्भात मुख्य राज्य माहिती आयुक्त यांनी सुनावणी घेऊन दि. ५.८.२००६ रोजी आदेश पारीत केले होते. सदर आदेशामध्ये तक्रारदाराचे अपील अर्जात नमुद, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ अन्वये अर्जदार यांना ४८ तासांच्या आत माहिती देण्याबाबत केस लॉ अद्यापि विकसीत झालेला नसल्यामुळे तक्रारदाराने जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्तीबाबतची विनंती अमान्य करुन अपील निकाली काढले आहे.

उत्तरवादी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये तक्रारदार यांना, त्यांनी वेळोवेळी व कायद्यातील तरतुदीनुसार विहित मुदतीत माहिती पुरविलेली आहे, असे नमुद करुन पुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना जर ४८ तासात माहिती आवश्यक होती तर त्यांनी माहितीचा अर्ज उत्तरवादी यांना समक्ष भेटून द्यावयास हवा होता, म्हणजे  त्यावर त्वरित कार्यवाही करता आली असती. परंतु त्यांनी सदर अर्ज आवक/जावक शाखेत दिला होता. त्याचप्रमाणे त्यांच्या अर्जावर त्यांनी स्वतःचा दूरध्वनी/भ्रमणध्वनी दिला नसल्यामुळे त्यांचेशी संपर्क साधता आला नव्हता. त्यांनी एकच माहिती ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या तीनही कार्यालयाकडून मागितली असून एका कार्यालयाकडून त्यांना ती मिळाली आहे. आजही या प्रकरणातील सर्व अभिलेखे अपिलार्थीस दाखविण्यासाठी ते तयार आहेत, त्यामुळे  तक्रारदार यांनी केलेली तक्रार योग्य नसून ती निकाली काढण्याची विनंती त्यांनी आयोगास केली आहे.

दोन्ही बाजूंचा युक्तीवाद लक्षात घेता, असे आढळून येते की, सोनगिर ग्रामपंचायत येथील सन १९९४-९५ मध्ये भूखंड वाटप प्रकरणात झालेल्या गैरव्यवहारासंबंधी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेली चौकशी, त्यासंबंधीचे अहवाल व त्यानंतर संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यासंबंधी झालेला पत्रव्यवहार यासंबंधी, तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडून मागितलेली माहिती उत्तरवादी यांनी त्यांना पुरविलेली आहे. या प्रकरणी तक्रारदारास ४८ तासांचे आत माहिती देण्यासंदर्भातील अर्ज हा संबधित व्यक्तीच्या व्यक्तीस्वातंत्र्यासंबंधी असल्यास ४८ तासांच्या आत माहिती देण्याबाबत तरतुद आहे व या

प्रकरणी तक्रारदार यांच्या जीवितास अथवा स्वातंत्र्यास धोका होणार असल्याबाबत स्पष्ट पुरावा त्यांनी सादर केला नव्हता किंबहुना त्यांचा वैयक्तिकरित्या त्या प्रकरणात सहभाग नव्हता. त्यांचेवर कोणताही गुन्हा दाखल झालेला नव्हता, ही वस्तुस्थिती पाहता त्यांनी मागितलेली माहिती; माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ नुसार ४८ तासात देण्यासंबंधीची त्यांची विनंती या प्रकरणी ग्राहय धरता येणार नाही. या प्रकरणी तक्रारदाराने त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित माहिती मागविली आहे. अधिनियमातील कलम ११ मध्ये त्रयस्थ व्यक्तिशी संबंधित माहिती देण्यासंदर्भात कलम ७ (१) च्या दुसऱ्या परिच्छेदाचा कोठेही आधार घेतलेला नाही किंवा या संदर्भात कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उल्लेख नाही. यावरुन ४८ तासात माहिती देण्याची तरतुद स्वतःविषयी आहे, हे गृहितक दृढ होत आहे. तक्रारदाराने केलेल्या अर्जाबाबत सर्वसाधारणपणे ३० दिवसांचे आत माहिती देण्यासंबंधीच्या तरतुदीनुसार उत्तरवादी यांनी तसेच त्यांचे अधिपत्त्याखालील गट विकास अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे, तक्रारदाराने उत्तरवादी यांनी कलम ५,६ व ७ चा भंग केल्याचे त्यांच्या युक्तीवादामध्ये म्हटले होते तथापि या प्रकरणी कलम ५, ६ संबंधी उत्तरवादी यांनी काहीही कार्यवाही करणे अभिप्रेत/बाकी नाही. कलम ७ मधील विहीत तरतुदीप्रमाणे त्यांनी तक्रारदारास माहिती देण्याची व्यवस्था केली आहे. तक्रारदारास उत्तरवादीने माहिती देण्याचे सहेतुक टाळल्याचे निःसंशयपणे येथे सिध्द होत नाही. उलट, तक्रारदारास आवश्यक ती माहिती व त्यासंदर्भातील सर्व अभिलेखे उपलब्ध करुन देण्यास उत्तरवादी तयार असल्याचे दिसून येते. ही बाब लक्षात घेता तक्रारदार यांची, उत्तरवादी यांचेविरुध्द आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतची विनंती मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०२-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शांतीलाल मंगा चौधरी, मु. सोनगिर ता.जि.धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, धुळे धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८९६

निर्णय दिनांक ०७-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहंमद शहबाज सिद्दीकी,<br>घर क्र. ४-११-६०, मुबारक मस्जीद जवळ,<br>निजामीया कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापिका,<br>औरंगाबाद उर्दू प्राथमिक शाळा, गणेश<br>कॉलनी, हिनानगर, औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहंमद शहबाज सिद्दीकी व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, औरंगाबाद उर्दू प्राथमिक शाळा हे गैरहजर आहेत तर जन

अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद श्री. जिवाजी बाबुराव बागूल (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात एकूण १७ मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. शाळेची शासन मान्यता प्रत द्यावी व ३.१ मंजूरी आदेश प्रत द्यावी.

२. शिक्षकांची सेवा जेष्ठता यादी द्यावी.

३. शिक्षकांची वैयक्तिक मान्यतेचे सर्व पत्र देण्यात यावे.

४. शाळा इमारत बांधण्याची महानगरपालिका, औरंगाबादच्या परवानगीचे पत्र द्यावे.

५. शाळा इमारत नकाशा (मनपा प्रमाणित) ज्यामध्ये खालील बाबींचा उल्लेख असावा.

(अ) वर्ग खोल्या व क्षेत्र, (ब) मुला व मुलींसाठी वेगवेगळे शौचालयाची संख्या, (क) लायब्ररी, लेबॉरेटरी, स्टॉफ रुम क्षेत्र व संख्या, (ड) शाळा क्रीडांगण क्षेत्र व स्वरुप, (इ) शाळा क्रींडागण क्षेत्र व स्वरुप (ई) पिण्याचे पाण्याच्या व्यवस्था, वाटर टॅक, स्वरुप व किती लिटर.

६. शाळा इमारत व्हॅल्युएशन प्रमाणपत्र व भाडा पावतीची प्रत व इमारत मालकाचे नांव पत्त्यासह.

७. शाळेत अग्नीशामक यंत्र खरेदी केल्याचे पावत्या.

८. शाळेच्या २००३-०४, २००४-०५, २००५-०६ ऑडिट रिपोर्टची नक्कल द्यावी.

९. स्टॉक बुक क्र.३२ व ३३ च्या छायांकित प्रत द्यावे (२००६ पर्यत).

१०. वर्ग तुकड्यांची मान्यतेच्या पत्राची छायांकित प्रत द्यावी (वर्ग १ ते ७).

११. शाळा ग्रंथालय मध्ये २००० ते २००६ पर्यत पुस्तकांची संख्या द्यावी व ग्रंथालय रजिस्टरचे छायांकित प्रत २००० ते २००६ पर्यत द्यावे.

१२. शैक्षणिक साहित्य यादी व त्याचे स्टॉक बुकची छायांकित प्रत २००० ते २००६ वर्षवार प्रमाणे द्यावे.

१३. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शासनाकडून मिळालेल्या अनुदानाचा तपशील खालील प्रमाणे द्यावा.

अ) शाळा अनुदान मिळालेले दिनांक व संबंधीत खात्यात केलेले खर्चाची माहिती व पावत्यांची प्रत.

ब) शिक्षक अनुदान खर्च हिशोब व पावत्यांची प्रत.

क) संगणक अनुदानासाठी मिळालेली रक्कम संगणक खरेदी केल्याबद्दल कोटेशन व पावत्य व भुकदान केल्याचे चेक नंबर.

१४. शाळा भरण्याचे व सुटण्याची वेळ लिहून द्यावी.

१५. २००६-२००७ शिक्षकवार व वर्गवार शाळा वेळापत्रकाची नक्कल द्यावी.

१६. कार्यकारी मंडळाची परिशिष्ट "अ" मध्ये द्यावी व कार्यकारी मंडळामये रक्ताचे नाते असेल तर ते स्पष्ट करावे.

१७. शैक्षणिक वर्ष २००५-२००६ या वार्षिक निकालाची नक्कल द्यावी वर्ग १ ते ७ वी."

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करतांना अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे स्पष्ट करुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्सर व जाणीवपूर्वक त्यांना माहिती न देता लपविली असल्याचे नमूद करुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची त्यांना विनंती केली.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी म्हणून घोषित केले गेले नसल्याने अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी असे सूचित केले की, संबंधीत संस्थेचे सचिव हे अपिलीय अधिकारी म्हणून घोषित केले असल्यामुळे त्यांनी संबंधीत शाळेच्या व्यवस्थापन सचिवाकडे अपील अर्ज करावा, एवढे कळवून त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. या पत्राची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांना देऊन अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना देण्याची सूचना दिली.

जन अपिलीय अधिकारी यांची वरील सूचना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये संबंधीत संस्थेच्या सचिवाकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलावर संस्थेच्या सचिवांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने सचिवाकडे त्यांचा अपील अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असून सदर अर्ज सचिवाकडे प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी दिलेली पोच पावतीची झेरॉक्स प्रत अपिलार्थीने आयोगास सादर केली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांकडूनही कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत त्यामुळे अपिलार्थी यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जा-मधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्याकडे ज्यावेळी दाखल झाले त्यावेळी ते अपिलीय अधिकारी नसल्याने व संबंधीत संस्थेचे सचिव हे अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे कळवून त्याची एक प्रत जन माहिती अधिकारी यांना दिली होती.

उपरोक्त प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांचा कल सामान्य नागरिकांस माहिती न देण्याकडे जास्त दिसतो असे त्यांनी आयोगास सांगून संबंधीत जन माहिती अधिकारी यांना मुख्य माहिती आयुक्त यांनी अशाच एका दुस-या प्रकरणासंदर्भात त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अपील क्रमांक २००६/१४६/०२ चा निर्णय देतांना त्यांना रुपये १००० /- ची शास्ती लावली होती हे आयोगाच्या निदर्शनास आणले.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी या अर्जास प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-

०३-२००७ रोजी व्दितीय अपील करेपर्यंत देखील त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे दिसून येते. माहिती मागणे हा अपिलार्थीचा हक्क आहे व ती विहित मुदतीत पुरविणे हे संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाने त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस स्वतःला पात्र ठरविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्यासारखेच वर्तन जन अपिलीय अधिकारी यांचे आहे. त्यांनी देखील अपिलार्थीच्या अपिलावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग केल्याचे दिसून येते. थोडक्यात संबंधीत शिक्षण संस्थेने जनसामान्यांना कोणतीही माहिती द्यावयाची नाही असे जणू निश्चयच केला आहे की काय असे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या वर्तनावरुन वाटते. सदर संस्थेला शासनाचे अनुदान प्राप्त होत असल्याने सदर संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण ठरते. म्हणूनच जन माहिती अधिकारी हे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीनुसार वरीलप्रमाणे कारवाई करण्यास पात्र होत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस आजपावेतो माहिती न दिल्याबद्दल, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. अपिलार्थीस

माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत देतील याचे नियंत्रण करावे. तद्वतच आवश्यक वाटल्यास संबंधीत संस्थेवर मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४९ अन्वये यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सदर माहितीचे सनियंत्रण शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी करावे.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०७-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहंमद शहबाज सिद्दीकी, घर क्र. ४-११-६०, मुबारक मस्जीद जवळ, निजामीया कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, औरंगाबाद उर्दू प्राथमिक शाळा, गणेश कॉलनी, हिनानगर, औंरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८९७

निर्णय दिनांक ०७-०२-२००८

श्री. अजय गंगाधरराव देवधर, : अपिलार्थी
व्दारा- ॲड एस. बी. भरदम,
गणपती गल्ली, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपसंचालक भूमी अभिलेख,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी
अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमी अभिलेख, औरंगाबाद विभाग, दमडी महल, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक भूमी अभिलेख, औरंगाबाद विभाग, दमडी महल, औरंगाबाद

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अजय गंगाधरराव देवधर, जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमी अभिलेख व जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक भूमी अभिलेख हे गैरहजर आहेत तर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमी अभिलेख सीमा देशमुख ह्या हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मे २००६ ते ऑगस्ट २००६ या कालावधीतील उपसंचालक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयात झालेल्या रिक्त पदे भरतीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“१. उपसंचालक, भूमी अभिलेख औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद यांचे अधिपत्या-खालील खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील रिक्त पदे भरती करणेकरिता दिनांक १४-०५-२००६ रोजी लेखी परिक्षा घेण्यात आलेली आहे, त्यासंबंधी जाहिरातीनुसार भरावयाच्या पदांचा खालीलप्रमाणे संवर्गनिहाय तपशील देण्यात यावा.

| अ.क्र. | पदाचे नांव | एकूण पदसंख्या | अ. जा. | अ. ज. | वि. ज. भटक्या जमाती | | | | विमाप्र | इप्रवर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वि. जा. (अ) | भ. ज. (ब) | भ. ज. (क) | भ. ज. (ड) | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |

२. भूमी अभिलेख खात्याचे औरंगाबाद विभागातील अधिनस्त कार्यालयातील वर्ग ३ गट क लिपीक टंकलेखक/भुकरमापक संवर्गातील खुला/मागासवर्गीय अनुशेष भरती कामी दिनांक १४-०५-२००६ रोजी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेत पात्र झालेल्या उमेदवाराची नांवे, पत्ता व गुणासह यादीची प्रत देण्यात यावी.

३. दिनांक १४-०५-२००६ रोजी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेत पात्र उमेदवारांच्या घेण्यात आलेल्या मौखिक व व्यक्तीमत्व चाचणी परिक्षेतील उमेदवार निहाय गुणांची यादी देण्यात यावी.

४. उपरोक्त लेखी व मौखिक चाचणीतून अंतिम निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची संवर्गनिहाय गुणांसह यादी देण्यात यावी.

५. अंतिम निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची संवर्गनिहाय संख्या देण्यात यावी.

६. समांतर आरक्षणानुसार भरण्यात आलेल्या पदांची संवर्गनिहाय टक्केवारी देण्यात यावी.

७. सदर भरतीमध्ये अंशकालीन कर्मचा-यांना आरक्षण होते काय ? असल्यास टक्केवारीचे प्रमाण किती आहे ? व किती पदे अंशकालीन कर्मचा-यांमधून भरण्यात आली आहेत ? (उमेदवारांचे नांवासह)

८. अपिलेट अधिकारी यांचा हुद्दा व संपूर्ण पत्ता देण्यात यावा. ”

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात सुनावणीसाठी दिनांक १३-११-२००६ रोजी उपस्थित राहण्याचे त्यांच्याकडील दिनांक ०१-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीच्या पत्राच्या संदर्भाने अपिलार्थी यांनी, त्यांना दिनांक ०९-११-२००६ रोजी ते आर्थिक परिस्थितीमुळे सदर सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांना कळविले. अपिलार्थी यांनी त्यांच्या सदर पत्रामध्ये त्यांच्या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांना निर्णय घेऊन सदर निर्णय त्यांना अवगत करण्याची विनंती केली. तथापि केवळ अपिलार्थी गैरहजर राहिले म्हणून जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आयोगासमोर सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांचे, केवळ अपिलार्थी सुनावणीस उपस्थित नाहीत म्हणून त्यांच्या अपिलावर सुनावणी घ्यावयाची नाही हे गृहीतक बरोबर नाही. अपिलार्थीच्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी घेता आली असती तथापि त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या गैरहजेरीचे क्षुल्लक कारण पुढे करुन अपिलाची सुनावणी घेण्याचे टाळले असे म्हणणे जास्त योग्य होईल असे आयोगास वाटते.

जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिला-मध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती त्यांना प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणत्याही प्रकारचा निर्णय दिला नाही असे निर्देशीत करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगा-कडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १८-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रुपये ३६२ व पोस्टेज खर्च रुपये ३२ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्यासाचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी या त्यांच्या म्हणण्याप्रीत्यर्थ आयोगास कोणताही पुरावा आज सुनावणीमध्ये सादर करु शकल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०९-२००६ रोजी पाठविलेल्या पत्राबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवक जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगाने आगाऊ सूचना देऊन देखील उपलब्ध नाही. सदर पत्र अपिलार्थीस मिळाले नसल्याचे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अर्जावरुन सिध्द होत आहे. जर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १८-०९-२००६ रोजीचे पत्र प्राप्त झाले असते तर त्यांनी त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्याचा उल्लेख केला असता परंतु आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन सदर पत्र अपिलार्थीस मिळाले नसल्याचे जास्त प्रमाणात सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत पत्र पाठविले हा त्यांचा दावा सिध्द करण्यासाठी आज रोजी त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा पुरावा उपलब्ध नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणती माहिती तयार करुन ठेवली आहे हे विचारले असता देखील त्यांनी सदर माहिती आयोगाच्या समोर उपलब्ध करुन देण्यास असमर्थता व्यक्त केली. त्यावरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस खरोखरच माहिती द्यावयाची होती किंवा कसे कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेश निर्माण होत आहे. तेव्हा संबंधीत जन माहिती

अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर ३ दिवसाच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास ३ दिवसाच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०७-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अजय गंगाधरराव देवधर, व्दारा- ॲङ एस. बी. भरदम, गणपती गल्ली, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमी अभिलेख, औरंगाबाद विभाग, दमडी महल, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक भूमी अभिलेख, औरंगाबाद विभाग, दमडी महल, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८९९

निर्णय दिनांक ०७-०२-२००८

श्री. कोरडे नाथाराम कोंडीबा, : अपिलार्थी
मु. पो. नाळवंडी,
तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, प्राथमिक व माध्यमिक
आश्रमशाळा, गेवराई, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कोरडे नाथाराम कोंडीबा, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, गेवराई व जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतःविषयी शैक्षणिक वर्ष २००४-०५ व २००५-०६ या कालावधीतील एकूण ३ मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. श्री. नाथाराम कोंडीबा कोरडे मी स्वतः सह शिक्षक म्हणून प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा गेवराई येथे कार्यरत असतांना शैक्षणिक वर्ष २००४-०५ व २००५-०६ साठी काढलेल्या टाचनवहीच्या सत्यप्रती.

२. शैक्षणिक वर्ष २००४-०५ व २००५-०६ करिता रुजू करुन घेतांना घेतलेल्या रुजू अहवालाच्या नाथाराम कोंडीबा कोरडेच्या सत्यप्रती तसेच स्पर्धा व प्रशिक्षणातील सहभागाबाबतची सत्यप्रतीत माहिती.

३. शैक्षणिक वर्षे २००५-०६ साठी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, नाईकनगर, गेवराई तालुका गेवराई जि. बीड ची सुशील शिक्षण संस्था बीड व्दारा दिलेल्या जाहिरातीची सत्यप्रत देण्यात यावी ही विनंती."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा दिनांक १२-०९-२००६ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २२-०९-२००६ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाला. अपिलार्थी यांच्या वरील अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०९-२००६ / ०३-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीप्रीत्यर्थ रुपये ७७ /- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील पत्राच्या सुचनेन्वये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना रुपये ७७ /- ची मनीऑर्डर पाठविली. सदर मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांना दिनांक १४-१०-२००६ रोजी प्राप्त झाली.

अपिलार्थी यांच्याकडून आवश्यक ते शुल्क प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांना अपेक्षित असलेली माहिती पाठविली.

तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-११-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा नाही हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन कळून येत नाही. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने कोणताही निर्णय त्यांना प्राप्त झाला नसल्याचे कळविले आहे. थोडक्यात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्याने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

व्दितीय अपील करतांना अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळाली नाही, प्राप्त माहिती अपूर्ण व खाडाखोड करुन दिली व अपिलावर मुदतीत निर्णय न कळविल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी लागलीच दिनांक १८-१०-२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कडे मागितलेल्या माहितीमधील मुद्दा क्रमांक १ अन्वये त्यांच्या स्वतःच्या वर्ष २००४-०५ व २००५-०६ या कालावधीतील टाचणवहीच्या सत्यप्रतीची मागणी केली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उत्तर देतांना फक्त शैक्षणिक वर्ष २००४-०५ या कालावधी-तील टाचणवहीच्या संदर्भात अपिलार्थीस माहिती दिली आहे. यावरुन सदर कालावधीमध्ये अपिलार्थीने मुळात त्यांच्याकडे टाचणवह्या सादर न केल्यामुळे त्याच्या प्रती त्यांना अपिलार्थीस पुरविता आल्या नसल्याचे दिसून येते. तथापि शैक्षणिक वर्ष २००५-०६ या कालावधीतील टाचणवहीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती या पत्रामध्ये पुरविली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती अपुरी असल्याचे सिध्द होते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे तर मुद्दा क्रमांक ३ वरील माहिती देतांना दिलेल्या माहिती मध्ये करण्यात आलेल्या खाडाखोड वर कोणीही सह्या केल्याचे दिसून येत नाही.

वरील परिस्थिती व वस्तुस्थिती पाहता अपिलार्थी यांच्या, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपुरी व खाडाखोड केलेली माहिती पुरविल्याच्या दाव्यामध्ये तथ्यंशः असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या अर्जाचे नीटपणे अवलोकन न करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे.

सबब जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या कारवाईस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, सचिव / अध्यक्ष, सुशील शिक्षण संस्था बीड यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी संबंधीत संस्थेचे सचिव / अध्यक्ष ही कारवाई विहित मुदतीत करतील असे पहावे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी २००५-०६ या शैक्षणिक वर्षातील मुद्दा क्रमांक १ ची माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ संदर्भातील उर्वरीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव / अध्यक्ष सुशील शिक्षण संस्था, बीड यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत पाठवावा.

४. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी वरील आदेश क्रमांक ३ चे अनुपालन संबंधीत संस्थेचे सचिव / अध्यक्ष यांच्याकडून होईल हे पहावे.

औरंगाबाद<br>
दिनांक ०७-०२-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कोरडे नाथाराम कोंडीबा, मु. पो. नाळवंडी, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

सचिव / अध्यक्ष, सुशील शिक्षण संस्था, मातोश्री निवास, महावीर चौकपेठ, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९१७
निर्णय दिनांक- ११ फेब्रुवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महंमद शफी अकमलोद्दीन काझी,<br>काझीवाडा, वाडी चौक, अमळनेर,<br>मु.पो.ता.अमळनेर, जि.जळगांव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>तालूका भूमि अभिलेख निरीक्षक,<br>कोर्ट कचेरीरोड, अमळनेर, जिल्हा-जळगांव | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, जळगांव | : | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ११-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.महमद शफी अकमलोद्दीन काझी (यापुढे

त्यांना  अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा तालूका निरिक्षक भूमि अभिलेख, अमळनेर, श्री.अशोक वामन अहिरराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, जळगांव, श्री.शाम दत्तात्रय खामकर (यापुढे त्यांना  जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ३०-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अमळनेर येथील शेत सर्व्हे नंबर ३३ च्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> "अमळनेर येथील शेत स.नं. ३३ मधील सर्व पोट हिश्श्याच्या नकाशाच्या नकला (यात अतितातडी मोर नं.३१/ दि.१७-९-१९९६ रोजी मोजणी झालेली आहे.) पो.हि.फॉर्म नं.४ च्या नकला अमळनेर येथील शीट नं. २१ ची प्रत मिळावी (यातच स.नं. ३३ पण आहे.) "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक-१९-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीस त्यांचे कार्यालयाकडून स.नं. ३३ मधील सर्व पोटहिस्याची मोजणी झालेली दिसून येत नाही, व अमळनेर येथील स.न.३३ मधील पोटहिस्सा नक्कल व पोटहिस्सा फॉर्म नं.४ ची नकल पुरविता येत नसल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने  समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०७-११-२००६ रोजी प्रथम अपील

केले. सदर अपीलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २७-११-२००६ रोजी घेवून या सुनावणीतील आपला अंतिम आदेश दिनांक- १५-१२-२००६ रोजी पारीत केला. या आदेशामध्ये त्यांनी तालूका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर यांनी त्यांच्या कार्यालयातील मौजे अमळनेर येथील सर्व्हे नं. ३३ मधील पोटहिस्सा मोजणी नकाशा व पोट हिस्सा फॉर्म नं. ४ यांचा त्यांच्याकडील अभिलेखावर कसून शोध घेऊन त्याच्या नकला अपिलार्थीना पुरविण्याचे सूचित केले. त्याचबरोबर अमळनेर येथील शीट नंबर २१ च्या प्रती संदर्भात त्यांनी असा निर्णय दिला की, अमळनेर येथील शीट नंबर २१ ची छापील प्रत तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयात अपिलार्थीने २४८/- रुपये रक्कमेचा भरणा करुन प्राप्त करुन घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २८-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या शेतसर्व्हे नंबर ३३ मधील पोट हिस्याच्या नकला व पोटहिस्सा फॉर्म नं. ४ च्या नकला त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाहीत. जमिनीच्या लहान तुकडयाचे एकत्रिकरण करण्याची योजना अमळनेर गावात १९६८ मध्ये पार पाडली गेली आहे. त्यावेळी सर्व्हेनंबरचे

रुपांतर गट क्रमांकामध्ये झाले आहे. आज रोजी संबंधीत जमिनीचे अधिकार अभिलेख पाहिले असता, त्यामध्ये सव्हेनंबर असा उल्लेख आढळत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी अमळनेर येथील शीट नंबर २१ ची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध होती व ती त्यांनी अपिलार्थीस देवू केली असता, अपिलार्थीने ती घेण्याचे नाकारले.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील स.नं. ३३ च्या पोटहिस्याचा नकाशा त्यांच्याकडे सहज उपलब्ध नव्हता. तथापि त्यांनी त्यांच्याकडे त्या सर्व्हे नंबरशी संबंधीत असलेल्या इतर अभिलेख्यावरुन अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या सर्व्हे नंबर ३३ मधील सर्व पोट हिस्याच्या नकला आता नव्याने तयार केल्या आहेत व ते त्या अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे अपील सुनावणीस आले असतांना स.नं. ३३ चा फेरफार त्यांनी दाखविला. सदर फेरफारवरुन स.नं. ३३ चा हिस्सा पडल्याचे त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पोटहिस्सा व फॉर्म नंबर ४ च्या नकला देण्याचे सूचित केले. अपिलार्थीस मागितलेली शीट नंबर २१ ची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याने सदर शीटची प्रत प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ २४८/- रुपये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुन घेवून सदर प्रत हस्तगत करण्याचे त्यांनी अपिलार्थीस सूचित केले.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी तो नकारार्थी स्वरुपाचा आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवल्याचे

आढळून येत नाही. अपिलार्थीकडे सर्व्हे नंबर ३३ च्या पोटहिश्याचा पुरावा असतांना देखील जन माहिती अधिकारी यांनी या पुराव्याचा विचार न करता त्यांच्याकडील दिनांक- १९-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये चुकीचे उत्तर दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम दिलेले उत्तर चुकीचे असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयावरुनहि सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही खूप जूनी असल्यामूळे व संबंधीत सर्व्हे नंबरचे आता गट पडले असल्याने, अपिलार्थीस आता आवश्यक असलेली माहिती देणे, हे जन माहिती अधिकारी यांना जिकीरीचे होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने काय करता येईल, याचा काहीही सकारात्मक दृष्टया विचार केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी शीट नंबर २१ च्या प्रती बाबत अपिलार्थीस विचारणा केली असता, जन माहिती अधिकारी यांनी अशा उत्तराची कोणतीही प्रत त्यांना देवू केली नव्हती, असे त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले. तथापि या मुद्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला असून त्यांनी या निर्णयामध्ये अपिलार्थीस योग्यती फी घेवून अपिलार्थीस फॉर्म नंबर २१ ची प्रत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केल्याचे दिसते. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी शीट नंबर २१ ची प्रत देवू केली नव्हती हा त्यांचा दावा फोल ठरत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील सर्व्हेनंबर ३३ च्या पोटहिश्याची नकल जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी नव्याने तयार करुन ती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची तयारी त्यांनी दर्शविली आहे. अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत आता संपली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदी नुसार विनामूल्य द्यावी लागेल, हे उघड आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम पत्राव्दारे कोणताही सकारात्मक प्रतिसाद न देता स.नं. ३३ मधील पोट हिस्याची मोजणी झालेली दिसून येत नाही, असे असत्य विधान करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव त्यांनी स्पष्ट केला आहे. या प्रकरणात त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील अशा प्रकारच्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी त्यांच्यावर प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याचे आत पाठवावा. असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त (जमाबंदी) पुणे, यांनी त्यांच्यावर प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करावी व अनुपालन अहवाल

तद्नंतर एक महिन्याचे आत आयोगास पाठवावा.

**औरंगाबाद** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- ११-०२-२००८.** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक**

प्रत

१. श्री.महंमद शफी अकमलोद्दीन काझी, काझीवाडा, वाडी चौक, अमळनेर, मु.पो.ता.अमळनेर, जिल्हा- जळगांव.

२. जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगांव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधानभवना समोर,पुणे-१, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९१८
निर्णय दिनांक-११ फेब्रुवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुधीर राजाराम भद्रे,<br>जिल्हा सरचिटणीस,<br>भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन,<br>मु.पो.चिचोंडी पाटील ता.जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नाशिक. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक. | : | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ११.०२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुधिर राजाराम भद्रे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नाशिक, श्री. राजेद्र सोनु निकम व तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री.विजय नामदेवराव घावटे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा विभागीय कृषि सहसंचालक,नाशिक,

श्री. रामभाऊ भय्याजी बळी (यापुढे त्यांना  जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-२५-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या जिल्हयातील १ जानेवारी २००३ ते ३१ डिसेंबर, २००४ या कालावधीमध्ये झालेल्या मृद व जलसंधारणाच्या कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" आपल्या जिल्हयामध्ये मृद व जलसंधारणाच्या झालेल्या उपरोक्त कालावधितील कामांची पुढील तक्यात माहिती मिळावी.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | कामाचे व योजनेचे नाव | मंजुर रक्कम | खर्च रक्कम | अडलेले पाणी (टी.सी.एम.मधे) | काम पूर्तता अहवाल दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

उपरोक्त माहिती ही आपल्या जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातच उपलब्ध असल्याने कनिष्ठ कार्यालयांकडून मागवण्यात वेळेचा कृपया अपव्यय करु नये व वेळेत, ५० पैसे- १ पान या प्रमाणे, सुस्पष्ट, सुवाच्च अक्षरात माहिती वेळेत, नियमानुसार द्यावी, ही विनंती."

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या  सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक-१७-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीस काही माहिती पुरविली.

सदर माहिती अपिलार्थीस दिनांक- २०-०५-२००६ रोजी प्राप्त झाली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रित्यर्थ रजिष्टर पोस्टाच्या स्वीकृती पत्राची झेरॉक्सप्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली आहे. यावरुन सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २०-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलाचे कारण त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही, असे दिले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि अपीलार्थीच्या अपीलअर्जा संदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- ०४-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिलेली असल्यामूळे अपिलार्थीचे अपील फेटाळून लावण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय घेण्याची अशा प्रकारची पध्दत चुकीची असून त्यांनी, त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाव्दारे प्राप्त झालेल्या अपीलावर निर्णय घेण्याचेवेळी, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून व ते नोंदवून नंतर त्यावर आपला निर्णय पारीत करणे, हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस सुनावणीसाठी न बोलावून, त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी

जन अपिलीय अधिकारी यांनी दिली नसल्याचे सिध्द होत आहे. इतःपर त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर एकतर्फी निर्णय घेण्याचे टाळावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अपील निर्णयावर व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १४-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले असून या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही होवून जन माहिती अधिकरी यांना माहिती देण्याचे आदेशीत करण्या संबंधात आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामूळे, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामधील त्यांचे म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहिती मागितली, त्यावेळी ते त्या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी तत्कालीन माहिती अधिकारी, श्री.वि.ना.घावटे, हे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी म्हणून काम पाहत होते.  तत्कालीन जन माहिती अधिकारी,श्री.घावटे यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होती ती त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांनी माहिती पुरविल्यानंतर अपिलार्थीचे या संदर्भात कोणतेही पत्र त्यांना प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीचे प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाले असे त्यांना वाटल्यावरुन त्यांनी पुढे कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीने, ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत

(दिनांक १५-०७-२००६) असे पर्यंत कोणताही पत्रव्यवहार केला नसल्यामूळे अपिलार्थीस अधिकच्या माहितीची आवश्यकता नसावी, असे त्यांना वाटले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर नव्याने जानेवारी, २००८ मध्ये रुजू झाले असून अपिलार्थीने प्रथम अपील केले त्यावेळेस श्री.रा.द.पाटील नावाचे अधिकारी त्या पदावर कार्यरत होते. ते या पदावर त्यावेळी कार्यरत नसल्यामूळे त्यांना या प्रकरणी काहीही म्हणणे मांडावयाचे नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या ठिकाणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये काही माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका विशीष्ट ७ कलमी तक्त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये ७ कलमांपैकी ३ कलमा संदर्भातील संपूर्ण माहिती व एका कलमा संदर्भात अंशतः माहिती, तर २ कलमा संदर्भात कोणतीच माहिती दिली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील गावाचे नाव, कामाचे नाव, अडलेले पाणी व कामपूर्तता अहवाल, दिनांक, या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती अर्धवटस्वरुपात पुरविल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या व अपिलार्थीस न पुरविल्या गेलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, सदर माहिती तालुकास्तरावर उपलब्ध होती, असे त्यांनी आयोगासमोर सांगितले. अपिलार्थीने अर्ज केला त्यावेळेस अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील जन माहिती अधिकारी यांच्याकडे फक्त उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस

द्यावयाची, असा त्यांचा समज झाल्याने, अपिलार्थीने उर्वरीत माहिति देण्याच्या दृष्टीने कोणताही प्रयत्न केला नाही. जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली अशा प्रकारची भूमिका अधिनियमातील तरतुदीशी पूर्णपणे विसंगत आहे. अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांना देणे हे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. तथापि अधिनियमातील तरतुदीचा चुकीचा अर्थ लावून व त्याव्दारे अपिलार्थीस अर्धवट माहिती उपलब्ध करुन देवून जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव दर्शविला आहे, असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त प्रकरणातील त्यांच्या अपिलार्थीस अर्धवट माहिती देण्याच्या कृतीमूळे ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त (कृषि) यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी. सदर प्रशासकीय कार्यवाही त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्‌नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस उर्वरित मुद्दांवरील माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती  अधिकारी यांनी अपिलार्थीस, उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी

३ आयुक्त (कृषि) यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश  निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद

**दिनांक- ११-०२-२००८.**

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ - औरंगाबाद**

प्रत

१. श्री. सुधीर राजाराम भद्रे,भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, मु.पो.चिचोंडी पाटील, ता.जि.अहमदनगर.

२. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात  पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त कृषि,  कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-०५, यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१६२

निर्णय दिनांक : ११-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. कांतीलाल हिरालाल मिठावाला,<br>सुपारी हनुमान रोड,<br>औरंगाबाद | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता, नगर रचना विभाग,<br>महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. कांतीलाल हिरालाल मिठावाला (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका, औरंगाबाद श्री. प्रकाश गोपीनाथ पवार ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयामध्ये त्यांच्याकडील दि. १७.०५.२००६ रोजीच्या अर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, नगर भूमापन क्रमांक १३१६३ जालना रोड, औरंगाबाद या मिळकतीवर दिलेली बांधकाम परवानगी रद्द झाल्यावरही या निर्णयाच्या आदेशाविरुध्द बांधकाम तसेच चालू ठेवल्यासंदर्भात त्यांनी मनपा, औरंगाबाद यांचेकडे सदर मिळकतीशी संबंधित कागदपत्रांची मागणी केली होती. तथापि महानगरपालिका आयुक्त व त्यांचे

कार्यालयातील संबंधित विभागाने त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती पुरविली नाही. सदर मिळकतीवरील बांधकाम परवानगीच्या व या संदर्भात झालेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती तक्रारदार यांना देण्याचे महानगरपालिकेला आदेशित करावे, अशी त्यांनी या अर्जामध्ये विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांनी महानगरपालिका आयुक्त यांचेकडे दि. २९.१२.२००५,८.३.२००६, १३.४.२००६, ९.५.२००६, ११.५.२००६, रोजी पत्रव्यवहार करुन संबंधित कथित अनधिकृत बांधकाम थांबविण्यासाठी विनंती केली आहे व बांधकाम परवानगीची व परवानगीसंदर्भात झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रतींची मागणी केलेली आहे. या पत्रामध्ये त्यांनी पुढे कथित अनधिकृत बांधकाम थांबविण्याची देखिल आयुक्तांस विनंती केली आहे.

महानगरपालिकेचे संबंधित उपअभियंता, नगररचना विभाग यांचेतर्फे तक्रारदाराच्या या मुद्यांसंदर्भात असा युक्तीवाद करण्यात आला की, तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. ७.१०.२००६ रोजीच्या व त्यांच्या कार्यालयात दि. ३१.१०.२००६ रोजी प्राप्त झालेल्या अर्जान्वये ज्या माहितीची मागणी केली होती, त्यासंबंधी तक्रारदार यांचेकडून रु. १२८/- इतके शुल्क दि. १५.११.२००६ रोजी, पावती क्रमांक १९९७३७ अन्वये भरुन घेऊन, त्याच दिवशी तक्रारदारास नगरभूमापन क्रमांक १३१६३ च्या मिळकतीवरील बांधकाम परवानगी, नकाशा व इतर दहा प्रती त्यांनी पुरविल्या आहेत. तथापि तक्रारदाराने मागितलेली त्यांच्या दि. ३१.१०.२००६ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ४ वरील माहिती तक्रारदारास देण्याचे त्यांनी नाकारले. तक्रारदाराच्या दि. ३१.१०.२००६ रोजीच्या अर्जाचे अवलोकन केले असता, तक्रारदाराच्या या अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे औरंगाबाद महानगरपालिकेने सि.स.नं. १३१६३ व १३१६२ करिता किती बांधकाम परवाने दिले आहेत, मुद्दा क्र. २ द्वारे कोणाच्या नावाने या बांधकाम परवानग्या मंजूर झाल्या आहेत व एकूण किती अर्ज व हरकती औरंगाबाद जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी या संस्थेने व इतर जनतेने केले आहेत, या संदर्भात माहिती मागितली आहे. उत्तरवादी यांनी सदर माहिती तक्रारदारास न देण्याचे सकृतदर्शनी आयोगास कोणतेही कारण दिसून येत नाही. सदर माहिती न देण्याचे कारण संबंधित प्रतिनिधीला विचारले

असता, त्यांना आयोगाच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देता आली नाहीत. सबब असे आदेशित करण्यात येते की, तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ३१.१०.२००६ रोजी मागितलेल्या माहितीबाबत त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.

१,२ व ४ मधील संपूर्ण माहिती उत्तरवादी यांनी तक्रारदार यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. उत्तरवादी यांनी तक्रारदारास कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अर्धवट माहिती देऊन त्यांनी त्यांचे कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब आयुक्त, महानगरपालिका यांनी या प्रकरणी उत्तरवादी यांच्या या प्रकरणातील वर्तनाची चौकशी करुन त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ३१.१०.२००६ रोजी मागितलेल्या माहितीबाबत त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ४ मधील संपूर्ण माहिती उत्तरवादी यांनी हे आदेश निर्गमित होताच तक्रारदार यांना सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, महानगरपालिका यांनी या प्रकरणी उत्तरवादी यांच्या या प्रकरणातील वर्तनाची चौकशी, करुन त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कांतीलाल हिरालाल मिठावाला, सुपारी हनुमान रोड, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगररचना विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८८६

निर्णय दिनांक १२-०२-२००८

श्री. बंडे भालचंद्र माधवराव, : अपिलार्थी
माजी जिल्हा कार्याध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी
जन आंदोलन, नांदेड, व्हॉईट हाऊस टेलर्स,
मेन रोड, मुखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अधिकारी, देगलूर,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बंडे भालचंद्र माधवराव हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देगलूर श्री. मिनीयार जगदीश गोपीकिशन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी श्री. देवघरे शशिकांत नथू (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००६ ते अर्ज करण्याच्या दिनांका-पर्यतच्या कालावधीतील, मुखेड केंद्रामध्ये घेतल्या गेलेल्या डि एड च्या परिक्षासंदर्भातील चौकशी अहवालासंदर्भातील प्रत व इतर माहिती खालील प्रमाणे साक्षांकीत करुन मागितली होती.

> " परवा मुखेड केंद्रावर डि एड परिक्षेसंदर्भात जो गैरव्यवहार, Management करण्यात आली, मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालाय ह्याबाबत मा. जिल्हाधिकारी नांदेड ह्यांनी आपणास ताबडतोब चौकशी करुन अहवाल सादर करण्याचेबाबत आदेशित केलेले होते. त्या अनुषंगाने आपण केलेल्या चौकशी अहवालाची प्रत, साक्षीदारांच्या साक्षींची प्रत देणे. तसेच मा. जिल्हाधिकारीसाहेबांनी ह्या बाबत जे पत्र (दिलेले असेल तर) दिले त्याची झेरॉक्स प्रत देणे बाबत.
>
> नोट : सर्व प्रति झेरॉक्स, साक्षांकित हव्यात, अहवाल पूर्ण असावा."

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी आयोगासमोर शपथपत्र सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये, त्यांनी आपल्या मूळ माहितीच्या मागणीमध्ये बदल करुन चौकशीबाबतच्या पत्राची प्रत व चौकशीनंतरच्या निर्णयाच्या प्रतीची मागणी केली आहे. या अपिलामध्ये त्यांनी साक्षीदारांच्या साक्षीच्या प्रतीची मागणी केलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिनांक १५-०१-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १८-०१-२००७ रोजी पारीत केले आहे. या आदेशान्वये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस नियमाप्रमाणे संपूर्ण माहिती दिनांक २०-०१-२००७ पर्यत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०१-२००७ रोजी माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या स्थळप्रतीवर माहिती मिळाल्याची दिनांक २०-०१-२००७ रोजी पोच दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशामध्ये माहिती अधिका-यावर दंडात्मक कारवाई न केल्याने व अपूर्ण माहिती मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी चौकशी अहवालाची प्रत, चौकशीसाठी नेमणूक झालेल्या पत्राची प्रत, साक्षीदारांच्या साक्षीची प्रत अशी माहिती अपेक्षिली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मुळात अपिलार्थी यांचा दिनांक १६-११-२००६ रोजीचा माहितीसाठीचा कथित अर्ज त्यांच्या कार्यालयात कधीही प्राप्त झाला नाही व त्यांचे हे म्हणणे त्यांनी आयोगासमोर शपथपत्राव्दारे सादर केले आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे काही माहिती मागितली आहे हे त्यांना जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अपील दाखल केल्यानंतर झालेल्या सुनावणीच्या पत्राने त्यावेळी कळले. अपिलार्थीने काही माहिती मागविली आहे हे सुनावणीचे वेळी कळल्यानंतर लगेच त्यांनी, सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक १९-०१-२००७ रोजी झाल्यानंतर, दिनांक १९-०१-२००७ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये फक्त चौकशी अहवालाची प्रत मागितली असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस फक्त चौकशी अहवालाची प्रत दिली. सदर चौकशी तत्कालीन उपविभागीय अधिकारी, देगलूर यांनी स्वतःहून केली होती. याकरिता त्यांना कोणीही आदेशीत केले नव्हते त्यामुळे अपिलार्थीच्या चौकशीसाठी नेमणूक झालेल्या पत्राची प्रत या मुद्दयावर अपिलार्थीस त्यांनी माहिती देणे अपेक्षित नव्हते. अपिलार्थीच्या प्रथम अपिल अर्जामध्ये मागणी केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी चौकशी अहवालाची प्रत दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करतांना अपिलार्थीने साक्षीदारांनी दिलेल्या जबाबाची प्रत मागितली नव्हती त्यामुळे त्यांना ती अपिलार्थीस देता आली नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याचा किंवा माहिती दडविण्याचा अशा प्रकारचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करणत आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दाखल केलेल्या दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक १५-०१-२००६ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या पत्राने आदेशीत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे याचे अवलोकन

करता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने मूलतः जो अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला आहे तोच त्यांना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने देखील त्यांचा दिनांक १६-११-२००६ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दाखल केल्याप्रीत्यर्थ कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नाही हे आयोगासमोर शपथपत्राव्दारे कबूल केले असल्यामुळे या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही हा मुद्दा आयोग ग्राह्य धरत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या, त्यांना अर्ज प्राप्त न झाल्याच्या, विधानाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये चौकशी अहवालाची प्रत, चौकशीसाठी नेमणूक झाल्याचे पत्र व साक्षीदारांच्या साक्षीची प्रत मागितली होती. याच मागणीचा पुनरुच्चार त्यांनी व्दितीय अपिलामध्ये राज्य माहिती आयोगाकडे केलेला आहे. तथापि अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नाही. अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी आहे याचे आकलन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी झाले. प्रथम अपील अर्ज करतांना अपिलार्थीने फक्त चौकशी अहवालाची प्रत मागितली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरविली आहे. चौकशीसाठी नेमणूक झाल्याची प्रत व साक्षीदारांच्या साक्षीची प्रत याची मागणी अपिलार्थीने अपिल अर्जामध्ये केलेली नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करतांना थोडाशी बदलली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त चौकशी अहवालाची प्रत दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास मुद्दाम होऊन अथवा इतर असद्‌हेतुने टाळाटाळ केल्याचे किंवा माहिती दडवून ठेवण्याचे या प्रकरणी निःसंशयपणे

सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची अपिलार्थीची विनंती आयोगास मान्य करता येत नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर त्यांनी दिलेला त्वरीत प्रतिसाद पाहिला असता जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस माहिती न देण्याचा कोणताही असद्‌हेतू होता असे आयोगास वाटत नाही. उलट अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या व्याप्तीमध्ये बदल केल्याने व मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे निश्चितपणे प्राप्त झाल्याची शहानिशा न केल्याने, अर्धवट माहिती प्राप्त होण्यास तेच जबाबदार आहेत असे आयोगाचे मत आहे.

सबब अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याच्या दृष्टीने असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता या चौकशी प्रकरणी साक्षीदारांनी दिलेल्या साक्षीची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक १२-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बंडे भालचंद्र माधवराव, माजी जिल्हाध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, नांदेड, व्हॉईट हाऊस टेलर्स, मेन रोड, मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८८७

निर्णय दिनांक १२-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहन लिंबाजीराव मुंडे,<br>मु. लिंबुटा, पो. पांगरी, तालुका परळी वै.<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, परळी वै.<br>तालुका परळी, जिल्हा बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी,<br>अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहन लिंबाजीराव मुंडे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी हरीराम भानुदासराव फड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी श्री. शिवहर रावसाहेब उत्के (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयांतर्गत परळी तालुक्यात असलेल्या कामांची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " मौजे परळी तालुक्यातील सन २००५ ते २००६ ते २००७ या कालावधीत आपल्या कार्यालयामार्फत रो. ह. यो. तून मंजूर असलेल्या कामाची व पूर्ण झालेल्या कामांची व अर्धवट राहिलेल्या कामांची व गांडुळसेड थिबक सिंचन, तुषार सिंच यांची पुर्ण माहिती द्यावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. तसेच अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्य रेषेखालील असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक १५-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असल्याचे अपिलार्थीस कळविले व तदनंतर अपिलार्थी यांना त्यांनी दिनांक ३०-११-२००६ रोजी, अपिलार्थी हे त्यांचे कार्यालयात समक्ष हजर झाल्यानंतर आवश्यक ती माहिती पुरविली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या वरील अर्जास त्यांच्याकडील दिनांक १५-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांना दिनांक ३०-११-२००६ रोजी विनामूल्य पुरविली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याची पोच पावती त्यांनी आयोगा-समोर सादर केली आहे. सदर माहितीची पोच देतांना अपिलार्थीने त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार नाही असे जन माहिती अधिकारी यांना लेखी लिहून दिल्याचे दिसून येते.

तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या

तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. येथे अपिलार्थीने उपविभागीय कृषि अधिकारी, परळी वैजनाथ जिल्हा बीड यांच्याकडे दिनांक १८-०१-२००७ रोजी व जिल्हा कृषि अधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक २८-१२-२००६ रोजी (या दोनही प्राधिकरणाकडे) या प्रकरणी प्रथम अपील केल्याचे दिसून येते. तथापि या प्रकरणामध्ये तालुका कृषि अधिकारी या कार्यालयाच्या माहिती अधिकार अधिनियमांसदंर्भात अपिलीय अधिकारी उपविभागीय कृषि अधिकारी असल्याने जिल्हा कृषि अधिकारी यांनी अपिलार्थीस उपविभागीय कृषि अधिकारी अंबाजोगाई या कार्यालयाकडे अपिलार्थीस अर्ज करण्यास सुचविले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधीत तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी (श्री. रविशंकर बाबुराव चलवदे) यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीच्या अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये सुनावणी न घेऊन संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाची आयुक्त (कृषि) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्रथम अपिलावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेतल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना जाणुन बुजून माहिती देण्याचे टाळले असल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी व

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहितीपासून वंचित ठेवल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ३०-११-२००६ रोजी म्हणजेच विहित मुदतीत दिली असून सदर माहिती प्राप्त झाल्याबद्दल व या माहितीबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे अर्जदाराने त्यांच्याकडील पत्राच्या स्थळप्रतीवर लिहून दिले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने प्रथम अर्ज केला त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते व त्यांच्या निदर्शनास अशा प्रकारची प्रलंबीत असल्याची बाब त्यांच्या कार्यालयाने आणून दिली नाही त्यामुळे या अपिलावर त्यांना सुनावणी घेता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली होती त्या माहितीचे स्वरुप अत्यंत मोघम असे आहे. माहितीचे स्वरुप मोघम असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या बुध्दीस पटेल अशी दिनांक ३०-११-२००६ रोजी संपूर्ण माहिती दिली आहे. सदर माहिती समक्ष प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी लेखी पत्र देखील जन माहिती अधिकारी यांना दिले आहे. माहिती प्राप्त होऊनही अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करतांना व राज्य माहिती आयोगाकडे अपील करतांना

त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.  अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणुन बुजून माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी जाणुन बुजून त्यांना माहिती देण्याचे आदेश दिले नाहीत असे म्हटले आहे.  तथापि उपलब्ध कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली असल्याचे दिसून येत नाही. मुलतः अपिलार्थीने वेगवेगळ्या स्वरुपाची माहिती मागविणे, माहिती प्राप्त होऊनही जन अपिलीय अधिकारी व आयोगाकडे अपील करणे, माहिती प्राप्त झाली नाही अशी असत्य विधाने करणे व आयोगाच्या सुनावणीस गैरहजर राहणे, अशा प्रकारच्या त्यांच्या वर्तनाने अपिलार्थीस खरोखरच माहितीची आवश्यकता होती किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होतो.  अपिलार्थीने या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या विसंगतीपूर्ण वर्तनामुळे व आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये असत्य विधाने केल्यामुळे अपिलार्थीचे सदर अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब अपिलार्थीचे सदर अपील, अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त झाल्यामुळे, अपिलार्थीचे विसंगतीपूर्ण वर्तन व अपील अर्जातील असत्य विधाने या कारणामुळे फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१.    अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक    १२-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहन लिंबाजीराव मुंडे, मु. लिंबुटा, पो. पांगरी, तालुका परळी वै. जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परळी वै. तालुका परळी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८९५

निर्णय दिनांक    १२-०२-२००८

श्री. मुके अनिल अदिनाथ, : अपिलार्थी
व्दारा- डॉ. सरदार खान यांचे घर,
समर्थनगर, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मुके अनिल अदिनाथ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. शेलार संतोष गजानन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक

बांधकाम मंडळ यांचे प्रतिनिधी, वरिष्ठ लिपीक श्री. केंद्रे शत्रुघ्न सखाराम (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा सूचना क्रमांक ४ सन २००४-०५ च्या संदर्भात दिनांक ११-०८-२००४ ते १२-०९-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. या निविदेतील सर्व कामे ५ टक्के अधिक दराने देण्यात आलेली नसून अंदाजपत्रकीय दराने (कंत्राटदारांनी लेखी कळविल्यानुसार) देण्यात आलेली आहेत. या सर्व कामाच्या कंत्राटदाराच्या लेखी सत्यप्रती देण्यात याव्यात.

२. या निविदेतील सर्व कामांचे कार्यारंभ आदेशाच्या सत्यप्रती (वर्क ऑर्डर्स) देण्यात याव्यात.

३. या निविदेतील सर्व कामांच्या बिलांच्या सि. सि. च्या सत्यप्रती देण्यात याव्यात.

४. या निविदेतील सर्व कामांच्या मोजमाप पुस्तिकेतील बिलांच्या पास ऑर्डरच्या पानाच्या सत्यप्रती देण्यात याव्यात."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक १३-०९-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी शुल्क रुपये १९० /- इतके त्यांच्या कार्यालयात दिनांक २६-१०-२००६ रोजी किंवा तत्पूर्वी भरण्याच्या सूचना दिल्या. अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यात येणार असलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या

व माहिती पुरविण्यासाठी प्रती पृष्ठ शुल्क कळविलेले नाही. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-१०-२००६ रोजी किंवा तत्पूर्वी सदर रक्कम प्रदान करण्याचे सूचित केले आहे. तथापि अपिलार्थीस त्यांना हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यास जन माहिती अधिकारी यांनी मुदत घालण्याची आवश्यकता नव्हती. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. सदर पत्र घेऊन कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातील शिपाई श्री. एस. टी. परसे हे अपिलार्थी यांच्याकडे दिनांक २७-०९-२००६ रोजी सकाळी १२-३० वाजता व ०४-१५ वाजता दोन वेळेस गेले होते. परंतु या कालावधीमध्ये त्यांचे घर बंद असल्यामुळे त्यांना सदर पत्र अपिलार्थीस देता आले नाही अशा अर्थाचे कबुली पत्र श्री. परसे यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक २०-१०-२००६ रोजी दिले आहे. सदर शिपाई दिनांक १८-१०-२००६ रोजी अपिलार्थी यांच्या घरी सकाळी ११-३० वाजता व दुपारी ०१-३० वाजता गेला होता. तथापि अपिलार्थी हे या दोनही वेळी त्यांचे घरी उपस्थित नव्हते असा शिपाई यांनी लेखी जबाब दिला आहे. या जबाबावर कोणत्याही प्रकारच्या तारखेचा उल्लेख नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचे दिनांक २७-०९-२००६ रोजीचे पत्र अपिलार्थी यांना व्यक्तिशः हस्तांतरीत न करता आल्याने त्यांनी अपिलार्थीस हे पत्र दिनांक १८-१०-२००६ रोजी रजिस्टर पोस्टाने अपिलार्थीस पाठविले. तथापि अपिलार्थी हे त्यांनी दिलेल्या पत्त्यावर उपलब्ध होऊ न शकल्याने सदर रजिस्टर पत्राचा बटवडा होऊ शकला नाही व ते त्यांच्याकडे परत आले आहे. बटवडा न झालेले कथित, दिनांक २७-०९-२००६ रोजीचे पत्र असलेले बंद पाकीट पोस्टाच्या शिक्क्यासह त्यांनी आयोगास सादर केले आहे. सदर पाकीट पोस्टामध्ये दिल्याबद्दलची पावती जन माहिती अधिकारी आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी या

प्रकरणी पोस्ट ऑफिसमधील कर्मचा-यांना हाताशी धरुन या पाकिटावर पोस्टाचा शिक्का उमटविला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक २०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये या संदर्भातील आदेश पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी, अपिलार्थीने केलेले अपील मान्य करुन अपिलार्थीस मोफत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशीत केले आहे व अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. या आदेशावर अपिलीय अधिकारी यांची सही नसून त्यांच्या कार्यालयातील दुस-या कर्मचा-याची सही "त्यांच्याकरिता" म्हणून केलेली आहे. कोणत्याही अपिलावर निर्णय देतांना सदर निर्णयावर निर्णय देणा-या अधिका-याची सही असणे अपेक्षित आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांची सही नसल्याने सदर अपील अवैध ठरत आहे. सदर अपील निर्णयाची प्रत अपिलार्थी यांना प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २२-११-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयासंदर्भात त्यांची भूमिका स्पष्ट करणारे पत्र लिहिले आहे व त्यांचा अपील निर्णय मान्य नसल्याचे त्यांना कळविले आहे. अपिलार्थीने अशा अर्थाचे पत्र जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ३१-०१-२००७ रोजी पाठविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांना व्दितीय अपिलाच्या दिनांकापर्यंत प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन ती माहिती त्यांना देण्याचे दृष्ट हेतूने टाळल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांना हवी असलेली माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोघेही संगनमताने वारंवार माहिती देण्यासंदर्भात चूका करीत असून त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे. त्यांच्या दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या अर्जाने मागितलेली माहिती त्यांना परत दिनांक ०७-०९-२००७ रोजी नव्याने अर्ज करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागवावी लागली. ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार जात असतात. त्यांना इतर विषयासंदर्भातील माहिती मिळते पण नेमके याच विषयासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यास टाळले जाते. ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार जाऊनही त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील मूळ माहितीच्या दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या अर्जास त्यांच्या कडील दिनांक २७-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला होता. तथापि अपिलार्थीचे घर बंद असल्यामुळे सदर पत्राची तामिली त्यांच्या शिपायास करता आली नाही. याच प्रकारची पुनरावृत्ती दिनांक १८-१०-२००६ रोजी झालेली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः

उपलब्ध होत नसल्याने त्यांनी दिनांक १८-१०-२००६ रोजी रजिस्टर पोस्टाने अपिलार्थीस सदर पत्र पाठविले. तथापि रजिस्टर पत्र देखील अपिलार्थीस त्यांनी दिलेल्या पत्त्यावर न उपलब्ध होऊ शकल्यामुळे त्यांच्याकडे परत आले. सदर पत्र त्यांनी पोस्टाव्दारे सादर केले होते. व हे पत्र प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ पोस्ट कार्यालयाने सदर पाकीटावर शिक्का देखील मारला आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यावर लगेच कोणतीही कारवाई केली नाही. तथापि अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी घेऊन जाण्याबद्दल त्यांच्याकडील दिनांक १२-०३-२००७ च्या पत्राने कळविले आहे. सदर पत्र देखील अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी यांनी सांगितले. त्यानंतर अपिलार्थीस परत दिनांक २०-०९-२००७ रोजी सदर माहिती तयार असून माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचना देणारे पत्र दिनांक २०-०९-२००७ रोजी पाठविले आहे व दिनांक २०-०९-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांनी, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हस्तांतरीत केली आहे. अपिलार्थी हे नेहमी व्यक्तिशः माहिती मागतात परंतु अर्जामध्ये दिलेल्या पत्त्यावर स्वतः कधीही उपलब्ध होत नाहीत त्याचबरोबर या अर्जातील माहिती संदर्भात अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही व्यक्तिशः उपस्थित झाले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलाचा निर्णय दिलेला आहे. अपिलार्थीस हजर राहण्यासाठी त्यांनी त्यांचे कार्यालयामार्फत कोणतेही पत्र पाठविले नव्हते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित

केलेल्या, अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे विहित मुदतीत कारवाई केली आहे. अपिलार्थीस सदर पत्र न प्राप्त होण्याचे कारण म्हणजे अपिलार्थीने दिलेल्या पत्त्यावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील शिपाई ज्या ज्या वेळी गेले त्या त्या वेळी अपिलार्थी संदर्भिय पत्त्यावर उपलब्ध नव्हते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये दिलेल्या पत्ता हा घरमालकाचे नांव टाकून (C/o असा) दिलेला आहे. अपिलार्थीस स्वतःचे या पत्त्यावर कायम स्वरुपी निवासस्थान नसल्याने कदाचित पोस्टमनला अपिलार्थीस सदर पत्राचा बटवडा करणे, त्यांच्या या पत्त्यावरील अनुपलब्धतेमुळे, शक्य झाले नसावे असे आयोगास वाटते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या युक्तिवादामध्ये ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाला वारंवार जातात असे म्हटले आहे. तथापि ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः गेले असल्याबाबतचा त्यांच्याकडे आज रोजी कोणताही पुरावा उपलब्ध नाही.

अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीमध्ये प्राप्त करुन घेण्यामध्ये जर स्वारस्य असेल आणि जर अपिलार्थीने माहिती व्यक्तिशः मागितली असेल तर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः जाणे हे त्यांचे कर्तव्य ठरते. या प्रकरणी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे गेल्याचा कोणताच सबळ पुरावा उपलब्ध नाही. याच बरोबर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेली भूमिका देखील संशयास्पद आहे असे आयोगाचे मत आहे. वास्तविकतः अपिलार्थीचे प्रथम अपील ठरवितांना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून त्यावर आपला निर्णय पारीत करणे हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. तथापि उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी कोणतीही संधी त्यांना उपलब्ध करुन दिली नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादामध्ये सिध्द झाले आहे. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांच्यातील आपसातील ताळमेळ या प्रकरणी लागत नाही.

आता अपिलार्थीस दिनांक २०-०९-२००७ रोजी संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर माहिती त्यांना विलंबाने प्राप्त झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाने शास्ती व प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्याचे आदेशीत करावे. तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते व्यक्तिशः कधीच त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे व त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०३-००७ रोजी तशा अर्थाचे पत्र देखील लिहिले होते. जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत पत्र लिहिले आहे तर अपिलार्थी यांचे म्हणणे सदर पत्र त्यांना प्राप्त झाले नव्हते. या प्रकरणाशी संबंधीत असलेल्या सर्व अधिकारी व अपिलार्थी यांच्या वर्तनाचा ताळमेळ लागत नसल्याने या प्रकरणी मुख्य अभियंता, सार्वजनिक प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी स्वतः चौकशी करावी व आवश्यक असल्यास सर्व संबंधितांविरुध्द यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने अपिलार्थीची शास्ती लावण्याची मागणी आयोग मान्य करत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १२-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुके अनिल अदिनाथ, व्दारा- डॉ. सरदार खान यांचे घर, समर्थनगर, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९१९
निर्णय दिनांक- १२-०२-२००८.

१ श्री.संपत तुकाराम गायकवाड, अपिलार्थी
रा.शेंडी (भंडारदरा वसाहत)
ता.अकोले, जिल्हा-अहमदनगर

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प
गुणनियंत्रण विभाग क्र.२ चोंढे
ता.शहापूर, जिल्हा- ठाणे.

२. जनअपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता,
घाटघर जलविद्युत प्रकल्प मंडळ,
नाशीक.

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.संपत तुकाराम गायकवाड (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प विभाग क्रमांक-२, चोंढे, श्री. सुधाकर नारायण कुलकर्णी (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, घाटघर जलविद्यूत प्रकल्प मंडळ नाशिक, श्री.दिलीप रामरतन जोशी (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०७-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रवासभत्ता बिलासंदर्भात व वर्ग-४च्या कर्मचा-यांच्या निवासा संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागविली आहे.

" प्रवासभत्ते बील मिळणेबाबत व मा.उपविभागीय अभियंता यांनी वर्ग ४ चे कर्मचारी कोणत्या खोलीमध्ये राहतात. त्या आदेशाची झेरॉक्स प्रत काढुन मिळणे बाबत.
श्री. संपत तुकाराम गायकवाड यांना दिनांक- १-११-२००३ ते ३१-१२-२००५ पर्यंत अद्यापपर्यंत प्रवासभत्ते बील मिळालेले नाही. मा.उपविभागीय अभियंता यांनी काढलेले कर्मचारी कोठे रहातात त्याबाबत लेखी पत्र काढलेले - पत्राची झेरॉक्स प्रत १-११-२००३ ते १-७-२००५ हया कालावधीची झेरॉक्स प्रत देण्यात यावी."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- १२-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत सहाय्यक अभियंता श्रेणी-१,घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प, गुणनियंत्रण उपविभाग क्रमांक-५,चोंढे, यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मागविली व अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- १८-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये योग्य तो प्रतिसाद दिला. या

पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांनी निर्देशित केलेली कोणतीही प्रवासभत्ता देयके त्यांच्या कार्यालयात प्राप्त न झाल्याने ती मंजूर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही व अपिलार्थीने विचारलेली दुसरी माहिती - उपअभियंता यांनी काढलेले कर्मचारी कोठे राहतात, या बाबत लेखी पत्र काढलेले- पत्राची झेरॉक्सप्रत - या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना बोध न झाल्यामूळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. तसेच अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नव्हती, असे त्यांनी या पत्रात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १७-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अतिरीक्त मुद्यावर माहिती मागविली आहे. कामानूसार हुद्दा व हुद्यानूसार वेतनश्रेणीचा प्रस्ताव पाठविणे बाबत असा अतिरीक्त मुद्दा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपीलामध्ये अपिलार्थीने उपस्थित केला आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक- ०९-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आपला निर्णय कळविला आहे. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ अथवा चुकीची माहिती दिली नसल्याने अपिलार्थीचा दिनांक १७-०५-२००६ रोजीचा अर्ज निकाली काढला असल्याचे म्हटले आहे. याच बरोबर त्यांनी या निर्णया पूर्वीच्या १५ दिवसात अपीलार्थीच्या पाचव्या अपील अर्जावर निर्णय देत असल्याचाही उल्लेख केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपील आयोगास करण्याप्रित्यर्थ त्यांनी, मागितलेली माहिती देण्यात आलेली नाही, अपिलीय अधिका-याने कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अधिका-याची बाजू घेतली आहे व प्रतिज्ञापत्र नसतांना निकाल देण्यात आला आहे, अशी कारणे दर्शवून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक- ०१-११-२००३ ते ३१-१२-२००३ या कालावधीत काही प्रवास भत्याचे बील उपअभियंता घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प यांच्याकडे सादर केले होते. तथापि सदर प्रवासभत्ता बील मंजूर न करता संबंधित अधिका-याने त्यांच्याकडे परत केले. संबंधित अधिका-याने प्रवास भत्ता बील अपिलार्थीस परत पाठविल्या नंतर त्यांनी ते संबंधीत अधिका-याकडे पोस्टाने परत पाठविले. पोस्टाने पाठविलेले बील देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत मंजूर करण्यात आले नाही. सन १९८७- १९९८ पर्यंत अशा प्रकारचे बील उपविभागा तर्फे अदा केले जात होते. युक्तीवादाच्या शेवटी त्यांनी त्यांना ८००/- रुपये या दराने प्रवासभत्ता बील मंजूर करावे, अशी आयोगास विनंती केली. या पुढे देखील अपिलार्थी यांनी त्यांच्या वैयक्तीक गा-हाण्याचा पाढा आयोगा पुढे वाचून दाखविला.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस कोणतेही प्रवास भत्ता बील अनुज्ञेय नाही. कारण अपिलार्थीचे मुख्यालय कोदणी या गावी निश्चीत करण्यात आले असून अपिलार्थी तेथेच काम करीत होते. अपिलार्थीस त्यांचे मुख्यालय कोदणी असल्यामूळे त्यांना प्रवासभत्ता बील अनुज्ञेय नाही. हे संबंधीत उपविभागाने वेळोवेळी कळविले आहे व त्याचबरोबर त्यांच्या प्रवासभत्याचा अर्ज दप्तरी दाखल करण्यात

येत असल्याचेही त्यांनी पत्र अपिलार्थीस दिलेले आहे. अपिलार्थी हे कोदणी या मुख्यालयी राहत नसून मुख्यालयापासून दूर अंतरावर राहतात. अपिलार्थी बरोबर असलेले इतर कर्मचारी मुख्यालयाच्या आसपासच्या गावात राहत असून त्यापैकी  कोणालाही प्रवासभत्ता दिलेला नाही. अपिलार्थी हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अन्वये स्वतःचे वैयक्तीक गा-हाणे सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. अपिलार्थीने  मागितलेल्या माहितीचा त्यांना स्पष्टपणे अर्थबोध न झाल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम माहितीच्या  अर्जासंदर्भात दिनांक-१८-०४-२००६ रोजी योग्य ते उत्तर दिले आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये उपविभागीय अभियंता यांनी काढलेले कर्मचारी कोठे राहतात? या बाबत माहिती विचारली आहे. कर्मचारी काढणे बाबतचे अधिकार उपअभियंता यांना नाही. त्यामूळे अपिलार्थीने विचारलेली काढलेले कर्मचारी कोठे राहतात या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांनी कोणत्याही विशिष्ट प्रकारची माहिती मागितली नसल्याचे त्यांना आढळून आले उलट अपिलार्थी हे त्यांचे वैयक्तीक मागण्या माहिती आयोगासमोर मांडून कायद्याचा दुरुपयोग करीत आहेत. अपिलार्थीने आतापर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ७२ अर्ज माहितीसाठी केले असून त्यांच्याकडे आजतागायत ३६ अपील अर्ज सादर केले आहेत. अपिलार्थीच्या सतत माहिती मागण्याच्या व सतत अपील करण्याच्या प्रवृतीमूळे त्यांना त्यांचे दैनंदिन कर्तव्य पार पाडण्यात अडथळे निर्माण होत आहेत. सदर अपिलार्थी माहिती अधिकाराचा सर्रास दुरुपयोग करीत असून त्याला पायबंद घालणे आवश्यक आहे, असे मत त्यांनी सुनावणीमध्ये व्यक्त केले आहे.  कायद्याचा दुरुपयोग अपिलार्थी करीत असल्याने त्यांच्यावर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याची मूभा त्यांच्या नियंत्रण अधिका-यांना द्यावी, अशीही त्यांनी पुढे आयोगास विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी मूळात असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चीत कोणती माहिती हवी आहे, याचा अर्थबोध होत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- १८-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेले उत्तर आयोगास योग्य वाटते. मूळात अपिलार्थीस त्यांना निश्चीत कोणती माहिती हवी आहे, ती सदर अर्जामध्ये अपिलार्थीस व्यवस्थीतरित्या मांडता आलेली नाही. माहिती या शब्दाची व्याख्या, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

> २(च):- "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो."

अपिलार्थीने मागितलेली माहिती वरील व्याख्येमध्ये बसत नसल्यामूळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निर्णयाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमा व्दारे स्वतःच्या वैयक्तीक मागण्या आयोगासमोर मांडून या मागणी संदर्भात त्यांना आयोगाकडून प्रवास भत्ता बीला संदर्भात आदेश प्राप्त करुन घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला असल्यामूळे, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही कायद्यातील "माहिती" या

शब्दाच्या व्याख्येत बसत नसल्यामूळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांचे वैयक्तीक मागणी बद्दल काही निर्णय अपेक्षित असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठस्तरावरील अधिकारी, मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प सिंचन भवन, बारणे रोड, पूणे यांच्याकडे आपली मागणी अर्जाव्दारे मांडून तत्संबंधीचा योग्य तो निर्णय त्यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावा, असे अपिलार्थीस या ठिकाणी सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळून लावण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>दिनांक- १२-०२-२००८

( वि.बा.बोरगे )<br>राज्य माहिती आयुक्त<br>खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.संपत तुकाराम गायकवाड, मु.पो.शेंडी (भंडारदरा वसाहत) तालूका- अकोले, जिल्हा- अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प विभाग क्रमांक-२ चोंढे तालूका-शहापूर जिल्हा-ठाणे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, घाटघर जलविद्यूत प्रकल्प मंडळ, त्र्यंबक रोड, नाशीक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प, 'सिंचनभवन', बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे-४११०११, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९१२
निर्णय दिनांक- १२ फेब्रुवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.सुरेश रतन माळी<br>(संपादक साप्ता.शिरपूर संदेश)<br>९९, वरवाडे ता.शिरपूर जि.धुळे. | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>उपविभाग कार्यालय क्रमांक-१, तळोदा,<br>जिल्हा-नंदुरबार. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,नंदुरबार<br>ता.जि.नंदुरबार. | : | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरेश रतन माळी (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक-१, तळोदा, श्री. पाटील तुकाराम ज्योतीराम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार, श्री. पाटील राजेंद्र टिला (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०९-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे तळोदा सार्वजनिक बांधकाम उपविभागा मार्फत रोहयो अंतर्गत सन २००४ ते २००६ या कालावधीतील श्री. पी.जी.वळवी कनिष्ठ अभियंत्याने केलेल्या कामा संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

> ''तळोदा बांधकाम विभागामार्फत रोजगार हमी योजने श्री.पी.जी.वळवी, कनिष्ठ अभियंता यांच्या अंतर्गत झालेल्या कामांची माहिती मिळणे बाबत.
> कारण पी.जी.वळवी या अभियंत्याने राणीपूर ते न्युबल आणि त्यांच्या अखत्यारित येणारे कामांचे, काम पूर्ण होण्यापूर्वीच पैसे अदा केले, त्या पैशांचा दुरुपयोग केला. असे त्या भागातील गावक-यांच्या व लाभार्थ्यांच्या तक्रारी आल्या त्यानुसार काही कामे खाजगिरित्या केले आहेत का ? काही ठिकाणी निकृष्ठ दर्जाची कामे झाली आहेत.''

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना निश्चीत काय माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही.

अपिलार्थींचा कथीत अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नाही. त्यामूळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १०-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर कडक कार्यवाही करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. अपिलार्थींचा सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १५-०६-२००६ रोजी प्राप्त झाला आहे. अपिलार्थींचा अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक- १६-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १०-०७-२००६ रोजी सुनावणी ठेवली. या सुनावणीची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना देण्यात आली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी ठेवलेल्या दिनांक- १०-०७-२००६ रोजीच्या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहीले. अपिलार्थी दिनांक- १३-०७-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाले असता, विभागीय कार्यालयाने त्यांना आवश्यक ती माहिती दिली. सदर माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १३-०७-२००६ रोजी पोंचपावती देखील दिलेली आहे. थोडक्यात, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींचा अपील अर्ज दिनांक- १०-०७-२००६ रोजी अपिलार्थी हे गैरहजर राहीले असल्यामूळे, अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही परंतू अपिलार्थीस दिनांक १३-०७-०६ रोजी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहीले असता त्यांनी, त्यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध करुन दिली.

तथापि माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १२-०७-२००६ रोजीचे व्दितीय अपील दिनांक- २५-०७-२००६ रोजी दाखल केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी त्यांच्या अर्जाची दखल जन माहिती अधिकारी यांनी घेतली नाही. वेळोवेळी विचारणा करुनही त्यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यात आली नाही व माहिती प्राप्त करुन घेण्याचा हक्क डावलल्याबद्दल त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामूळे आयोगाकडे सादर केलेल्या अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा लेखी युक्तीवाद समजून अपिलाची सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नव्हता. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी ठेवल्यानंतर त्यांना अपिलार्थीने त्यांच्याकडून काही माहिती मागविली आहे, असे कळले. अपिलार्थीस निश्चीत कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे, याचा अर्थबोध त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातून प्राप्त अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या प्रतीवरुन देखील झाला नाही. अपिलार्थीस राणीपूर ते न्युबल या रस्त्यांच्या कामाच्या अंदाजपत्रकाची प्रत हवी असल्याचे त्यांना दिनांक- १३-०७-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात अपिलार्थी हजर झाले असता प्रथम कळले. अपिलार्थीस निश्चीतपणे कोणती माहिती हवी आहे, याचा अर्थबोध दिनांक- १३-०७-२००६ रोजी होताच त्यांनी त्याच दिवशी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती देवून अपिलार्थीची पोंचपावती देखील घेतली आहे. सदर पोचपावतीची छायांकितप्रत त्यांनी आयोगासमोर दाखविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिनांक- १०-०७-२००६ रोजी प्रथम सुनावणी ठेवली होती. तथापि सुनावणीच्या दिवशी अपिलार्थी हजर झाले नाहीत. तद्नंतर दिनांक- १३-०७-२००६ रोजी अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले. अपिलार्थी हजर झाल्यानंतर त्यांना निश्चीत कोणती माहिती हवी आहे, याची त्यांना विचारणा केली. अपिलार्थीस निश्चीतपणे हवी असलेल्या माहितीचे स्पष्टीकरण त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक- १३-०७-२००६ रोजी व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीचे स्वरुप निश्चीतपणे कळून येत नाही. या उपर सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त देखील झालेला नाही. सदर अर्ज प्राप्त न झाल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर शपथपत्र सादर केले. अपिलार्थीने मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) अन्वये 'माहिती' या शब्दाच्या स्पष्ट केलेल्या व्याख्येमध्ये कोठेही बसत नाही. मूळात अपिलार्थीस निश्चीत कोणती माहिती मागावयाची हे माहिती नव्हते. त्यांना निश्चीतपणे कोणती माहिती अपेक्षित आहे हे त्यांनी सर्व प्रथम जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या बाबतचे दिनांक- १३-०७-२००६ रोजी स्पष्टीकरण दिले. त्यांना सदर रस्त्यांच्या कामाच्या अंदाजपत्रकाची प्रत आवश्यक होती. त्या प्रतीची मागणी केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीची सदर माहितीची मागणी

तात्काळ पूर्ण केली. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जामध्ये कोणत्याही प्रकारच्या निश्चीत स्वरुपाच्या माहितीची मागणी केली नसल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निर्णयाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१.अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
**दिनांक- १२-०२-२००८.**

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक**

**प्रत**

१. श्री.सुरेश रतन माळी, (संपादक साप्ता.शिरपूर संदेश) ९९, वरवाडे ता.शिरपूर जि.धुळे.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग तळोदा, जिल्हा- नंदूरबार, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नंदूरबार, जिल्हा- नंदूरबार, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/ १५७

निर्णय दिनांक : १२-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. ए. आर. शेख,<br>प्रमाणित लेखापरिक्षक सह.संस्था,<br>राहुरी, ता. राहुरी,<br>जिल्हा अहमदनगर. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष कार्य अधिकारी तथा<br>अतिरिक्त निबंधक सह. संस्था पदुम लेखापरीक्षा मंडळ,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई-१८. | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. ए. आर. शेख (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी तथा अति. निबंधक,सह. संस्था पदुम लेखापरीक्षा मंडळ, श्री.एल.एन.बोदडे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. १६.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, त्यांनी उत्तरवादी यांचेकडे संस्था वाटप

प्रस्तावाबाबत दि. ३१.५.२००६ रोजीच्या आदेशासंदर्भात दि. १४.६.२००६, १.७.२००६ व १५.७.२००६ रोजी केलेल्या तक्रारीवर त्यांचे कार्यालयाने घेतलेल्या निर्णयाच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती.

सदर माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी या संदर्भात अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास यांचेकडे विहित नमुन्यात अपील केले होते. सदर अपीलावर जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल विहित मुदतीत निर्णय घेतलेला नाही. या प्रकरणी तक्रारदार यांना माहिती न दिल्यामुळे, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यासंदर्भात आदेश देण्याची तक्रारदार यांनी आयोगास विनंती केली आहे.

उत्तरवादी यांनी यावर असा युक्तीवाद केला आहे की, तक्रारदार यांनी त्यांचेकडे माहितीसाठीचा अर्ज दि. २९.७.२००६ रोजी केला असता, या प्रकरणी त्यांनी दि. २५.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन तक्रारदार यांनी मागितलेली माहिती जिल्हा विशेष लेखा परीक्षक (पदुम) अहमदनगर यांचेकडून अहवाल मागितला असल्याचे कळविले व त्याचबरोबर संबंधित जिल्हा विशेष लेखा परीक्षकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांचे अर्जात नमुद केलेल्या मुद्यांचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे तक्रारदारास आश्वासित केले, त्याचप्रमाणे तक्रारदारास त्यांचेकडील दि. ३१.८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे देखिल अशाच अर्थाचे पत्र लिहून त्यांना वस्तुस्थितीची जाणीव करुन दिली. उत्तरवादी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने तक्रारदार यांनी आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास

यांचेकडे या प्रकरणी दि. ८.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपीलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, यावरुन, तक्रारदार यांचे अपीलाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल घेतलेली नाही व माहिती पुरविली नाही, हा मुद्दा सिध्द होत आहे.

तक्रारदार यांचा सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १५.९.२००६ रोजी प्राप्त झाल्याचे उत्तरवादी यांनी सुनावणीमध्ये सांगितले. मध्यंतरीच्या कालावधीमध्ये उत्तरवादी यांनी

अपीलार्थीस दि. १२.९.२००६ रोजी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केली माहिती विनामूल्य दिली असल्याचे दिसून येते.

तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेल्या तक्रारीमध्ये एक असाही मुद्दा उपस्थित केला आहे की, त्यांचा अर्ज दि. २९.७.२००६ रोजीचा असतांना उत्तरवादी यांचे कार्यालयाने दि. २६.७.२००६ च्या पत्राद्वारे संबंधितांकडून खुलाशाची मागणी कशी केली, यावर उत्तरवादी यांनी असा खुलासा केला आहे की, त्यांनी त्यांचेकडील दि. २६.७.२००६ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था (पदुम) अहमदनगर यांचेकडून तक्रारदाराच्या त्यापूर्वीच्या दि. १.७.२००६ व दि. १५.७.२००६ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भात खुलासा मागविण्यात आला होता व तक्रारदाराच्या या अर्जातील मुद्दा व त्यांच्या दि. २९.७.२००६ रोजीच्या तक्रारीतील मुद्दा एकच आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी उत्तरवादी यांनी आयोगास समजाऊन सांगितली. त्यांनी असे सांगितले की, तक्रारदार हे खाजगी व्यक्ती असून त्यांचे खात्यातील संस्थांचे लेखा परिक्षण करण्यासाठी तक्रारदाराच्या नावाचा समावेश त्यांनी मान्यताप्राप्त लेखा परीक्षकाच्या यादीमध्ये केलेला आहे. तक्रारदारास जिल्हा विशेष लेखा परीक्षक (पदुम) अहमदनगर यांनी अकरा संस्थांचे लेखा परीक्षणाचे काम देण्याचे तोंडी आश्वासन दिले, तथापि तितकेच काम तक्रारदार यांना देणे उत्तरवादी यांचेवर बंधनकारक नाही.

तक्रारदारास तपासणीसाठी अकरा संस्थांचे काम अपेक्षित असतांना उत्तरवादी यांनी त्यांना आठ संस्थांचे काम दिल्यामुळे तक्रारदार यांनी ही तक्रार आयोगाकडे केली आहे. तथापि संबंधित जिल्हा विशेष लेखा परीक्षक (पदुम) अहमदनगर हे तक्रारदारास आश्वासन देण्यास सक्षम अथवा प्राधिकृत नाहीत. त्यांनी देखील उत्तरवादी यांचे कार्यालयाकडे सादर केलेल्या प्रस्तावात तक्रारदार यांना आठ संस्थांचे काम देण्याचे मूलतः प्रस्तावित केले होते. त्यामुळे तक्रारदारास आठ संस्थांचे लेखा परीक्षणाचे काम सोपविण्यात आले आहे. सदर वस्तुस्थिती त्यांनी तक्रारदारास दि. १२.९.२००६ रोजीच निदर्शनास आणून दिलेली आहे.

लेखा परीक्षक यांनी अधिकारिता नसतांना देखिल तक्रारदार यांना काम देण्याचे आश्वासन देण्याची संबंधित जिल्हा विशेष लेखा परीक्षक यांची कृती नियमबाहय व गंभीर स्वरुपाची असल्याची नोंद उत्तरवादी यांच्या कार्यालयाने घेतली असून तसे संबंधितास दिनांक ३.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांची वैयक्तिक मागणी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचा आधार घेऊन सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणी उत्तरवादी यांनी तक्रारदारास, संबंधिताकडून माहिती प्राप्त करुन घेऊन त्यांचे माहितीच्या अर्जावर योग्य तो खुलासा केला असल्याचे दिसून येते. या प्रकरणी उत्तरवादी यांनी तक्रारदारास माहिती देण्यासंदर्भात कोणतीही टाळाटाळ केल्याचे किंवा माहितीचा कोणताही भाग असद्हेतूने दडविल्याचे आढळून येत नसल्यामुळे त्यांचेविरुध्द कोणतीही कार्यवाही आयोगाकडून प्रस्तावित नाही. तथापि उत्तरवादी यांनी येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये त्यांचे कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जावर विशेष सतर्क राहण्याबाबत सूचित करण्यात येते.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ए. आर. शेख, प्र. लेखा परिक्षक सह.संस्था, राहुरी ता. राहुरी जि. अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, अति.निबंधक संस्था पदुम लेखापरीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई प्रशासकीय इमारत, ३ रा माळा, अ.ग.खान रोड, वरळी सी फेस, मुंबई-१८यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८७२

निर्णय दिनांक १३-०२-२००८

श्री. रऊफ एन पटेल, : अपिलार्थी
पटेल प्रोव्हीजन्स, प्रियदर्शनी इंदिरानगर,
गारखेडा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम), औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रऊफ एन पटेल हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) श्री. भारत धोंडीराम तोडकरी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी अतिरिक्त

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्री. व्ही. व्ही. गुजर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९६२ ते २००६ या ४० वर्षाच्या कालावधीतील कनिष्ठ अभियंता यांच्या सेवासंदर्भात खालील प्रमाणे २८ मुद्यावर माहिती मागितली होती. या २८ मुद्यामध्ये देखील काही मुद्यावर उपप्रश्न विचारल्याचे दिसून येते.

"१. औरंगाबाद जिल्हा परिषद अंतर्गत सिंचन व बांधकाम विभागाची मंजूर पदे किती आहेत संख्या द्यावी.

२. मंजूर पदापैकी भरलेली पदे संख्या किती ?

३. मंजूर पदापैकी पदोन्नतीने व नामनिर्देशनाने किती पदे भरावी लागतात वेगवेगळी संख्या द्यावी.

४. पदाच्या मंजूर संख्येच्या प्रमाणात पदोन्नती देण्याचे प्रमाण काम आहे ?

५. नामनिर्देशनाने किती पदे भरलेली आहेत ती संख्या द्यावी.

६. पदोन्नतीने किती पदे भरलेली आहेत ती संख्या द्यावी.

७. सर्वसाधारण संवर्गातील मंजूर पदे किती ?

अ) सरळसेवेने किती पदे भरलेली आहेत संख्या द्यावी.

ब) पदोन्नतीने किती पदे भरलेली आहेत संख्या द्यावी.

क) मागासवर्गीय आरक्षित जागेवर सर्वसाधारण किती उमेदवारांना पदोन्नती दिली आहे नावासहित यादी द्यावी.

८. अनुसुचित जातीचे कनिष्ठ अभियंताचे राखीव पदे किती आहेत संख्या द्यावी.

अ) सरळसेवेने किती पदे भरलेली आहेत यादी द्यावी.

ब) पदोन्नतीने किती पदे भरलेली आहेत यादी द्यावी.

क)	अनुसुचित जमाती राखीव जागेवर सरळसेवेच्या व पदोन्नतीच्या किती सर्वसाधारण उमेदवारांना पदोन्नती दिली आहे.  नावासहित यादी द्यावी.

ड)	अनुशेष शिल्लक आहे काय ? असल्यास संख्या द्यावी.

इ)	अनुसुचित जातीच्या पदोन्नती (अनुशेष अंतर्गत) दिलेल्या उमेदवारास पदावनत केले आहे काय याची माहिती द्यावी.

ई)	पदानवत करण्याची स्पष्ट तरतूद जि. प. सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ चे कलम ५ (२) मध्ये आहे काय ? असल्यास त्यांची छायांकीत प्रत द्यावी.

उ)	मा. विभागीय आयुक्त यांची पदानवत करणेसाठी स्पष्ट आदेश दिले होते काय ? त्याची छायांकीत प्रत द्यावी.

९.	अनुसुचित जमातीचे कनिष्ठ अभियंताची राखीव पदाची संख्या द्यावी, सरळसेवेची किती, पदोन्नतीचे किती, संख्या द्यावी.

१)	सरळ सेवेने किती पदे भरलेली आहेत नावासहीत यादी द्यावी.

२)	पदोन्नतीचे किती पदे भरलेली आहेत यादी द्यावी.

३)	अनुसुचित जमातीच्या सरळसेवेच्या राखीव जागेवर किती सर्वसाधारण उमेदवारांना पदोन्नती दिलेली आहे यादी द्यावी.

४)	अनुसुचित जमातीच्या पदोन्नतीच्या राखीव जागेवर सर्वसाधारण उमेदवारांना पदोन्नती दिलेली आहे यादी द्यावी.

५)	अनुसुचित जमातीच्या उमेदवारांच्या मंजूर संख्येनुसार कनिष्ठ अभियंताच्या ७ (सात) राखीव आहेत.  एकही उमेदवार या जागेवर भरण्यात आलेला नाही.  त्यामुळे ह्या जागा रिक्त असावयास पाहिजे ह्या जागा रिक्त आहे काय ?

६) मागासवर्गीयांच्या सरळसेवेच्या रिक्त जागेवर सर्वसाधारण उमेदवारांना पदोन्नती देता येईल काय ? देता येत असल्यास त्याची छायांकीत प्रत द्यावी.

७) अनुसुचित जमातीच्या पदोन्नतीच्या रिक्त जागेवर सर्वसाधारण उमेदवारांना पदोन्नती देता येईल काय ? देता येत असल्यास कोणत्या नियमान्वये त्याची छायांकीत प्रत द्यावी.

८) अनुसुचित जमातीच्या सरळसेवा / पदोन्नती सात (७) जागा रिक्त आहे काय ? नसतील तर का रिक्त नाही त्याची सविस्तर माहिती द्यावी.

९) अनुसुचित जमातीच्या पदोन्नती दिलेल्या उमेदवारांचा (अनुशेष अंतर्गत) पदानवत केले काय याची माहिती द्यावी.

१०) पदावनत करण्याची स्पष्ट तरतूद जि. प. सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ चे कलम ५ (२) मध्ये पदावनत करण्याची तरतूद आहे काय ?

११) मा. विभागीय आयुक्त यांनी पदावनत करणेसाठी स्पष्ट आदेश दिले आहे काय ?

१२) जर आयुक्तांनी पदावनत करण्याचे आदेश दिले नाहीत तर पदावनत कसे केले याचा खुलासा करावा.

१०) अनुसुचित भटक्या जाती, जमाती अ, ब, क व ड ची राखीव पदे किती संख्या द्यावी.

१) सरळसेवेची किती पदे राखीव आहेत संख्या द्यावी.

२) पदोन्नतीची किती पदे राखीव आहेत संख्या द्यावी.

३) सरळसेवेची किती पदे भरलेली आहेत नावासहीत यादी द्यावी.

४) पदोन्नतीने किती पदे भरलेली आहेत नावासहीत यादी द्यावी.

११) स्पेशल मागासवर्गीयाच्या (A.B.C.) च्या किती जागा राखीव आहेत.

१) सरळसेवेच्या किती जागा राखीव आहेत संख्या द्यावी.

२) पदोन्नतीच्या किती जागा राखीव आहेत संख्या द्यावी.

३) सरळसेवेनी किती जागा पदे भरल्या आहेत नावासहीत यादी द्यावी.

४) पदोन्नतीने किती पदे भरल्या आहेत यादी द्यावी.

५) सरळसेवा पदोन्नती जागा रिक्त आहेत काय ?

६) या जागेवर सर्वसाधारण उमेदवारांना पदोन्नती देण्यात आली आहे काय ?

१२) जात पडताळणी प्रमाणपत्र नसेल तर पदोन्नती देता येते काय ? अनुसुचित जमातीसाठी, जात पडताळणी प्रमाणपत्र नसतांना पदोन्नती दिलेल्या उमेदवारांची यादी द्यावी.

१३) कनिष्ठ अभियंता यांच्या रिक्त असलेल्या जागेचा सर्वच जागेचा सरळसेवा / पदोन्नती तपशील द्यावा.

१४) मागासवर्गीयाच्या सरळसेवा व पदोन्नतीच्या राखीव जागेवर सर्वसाधारण उमेदवारांना पदोन्नती देण्यात आलेल्या उमेदवारांची नावासहित यादी द्यावी.

१५) मागासवर्गीयाच्या राखीव जागेवर सरळसेवा व पदोन्नतीच्या सर्वसाधारण उमेदवारांना पदोन्नती देता येते काय ? देता येत असल्यास कोणत्या नियमान्वये छायांकीत प्रत द्यावी.

१६) मागासवर्गीय अनुशेष मोहिमे अंतर्गत पदोन्नती दिलेली नसेल तर त्यास पदावनत करता येते का ? असल्यास कोणत्या नियमान्वये.

१७) अनुशेष भरण्यासंदर्भात शासनाचे धोरण काय आहे ?

१८) शासनाचे धोरण अनुशेष भरणे असेल तर अनुशेष मोहिमे अंतर्गत पदोन्नती देण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता पदावनत केले आहे त्याच्या नावासहीत यादी द्यावी.

१९) जर त्यांना पदावनत केले असेल तर शासनाच्या धोरणानुसार मागासवर्गीयावर अन्याय केला नाही काय ?

२०) कनिष्ठ अभियंताचे सहाय्यकाची जेष्ठता यादी देण्यात यावी.

२१) कनिष्ठ अभियंताची जेष्ठता यादी देण्यात यावी.

२२) रोष्टर (बिंदूनामावली) बदलता (रिवाईज) करता येते का ?

२३) रोष्टर (बिंदूनामावली) बदलली असल्यास कोणत्या नियमान्वये त्यांची छायांकीत प्रत देण्यात यावी.

२४) जुने व नवीन रोष्टर (बिंदूनामावली) छायांकीत प्रत द्यावी.

२५) व्यवसायिक परिक्षेची अट मागासवर्गीयानाच आहे काय ?

२६) व्यवसायिक परिक्षेची अट सर्वसाधारण उमेदवारांना नाही का ? कारण बरेच कर्मचारी परिक्षा पास नसतांना १४ ते १५ वर्षापर्यत या पदावर नौकरी केली व नंतर त्यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यावर सद्यस्थितीत पदावर कार्यरत आहे याचा खुलासा द्यावा.

२७) मागासवर्गीय उमेदवारांना वयाची ४५ वर्ष पूर्ण होईपर्यत पदावर कार्यरत का ठेवले नाही. सर्वसाधारण उमेदवारांनाच पदावनत का केले नाही याचा सविस्तर खुलासा करावा.

२८) जि. प. अंतर्गत माहितीनुसार तीन सर्वसाधारण कनिष्ठ अभियंता परिक्षा पास नसतांना कार्यरत आहेत.

१)	श्री. एन. पी. अहिरवाल कनिष्ठ अभियंता हे दिनांक २६-१२-१९८९ पासून सेवेत कार्यरत आहेत ते सद्यस्थितीत ते ४५ वर्षाचे झाले असतील यापूर्वी त्यांची सेवा १५ वर्षे परिक्षा पास नसतांना पदावर होते त्यांना का पदावनत केले नाही याचा खुलासा द्यावा.

२)	श्री. वाय. पी. खंबाट हे सुध्दा परिक्षा पास नसताना त्यांना पदावनत केले नाही. याउलट त्यांना शाखा अभियंता म्हणून उच्च पदावर पदोन्नती दिली व ते सेवानिवृत्त झाले.

३)	श्री. भिमराव मानकापे हे सुध्दा श्री. खंबाट प्रमाणेच निवृत्त झालेले आहेत.

४)	तेव्हा बांधकाम व सिंचन विभागात परिक्षा वरील ती क. अ. सारखे किती कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता परिक्षा पास नसलेले उमेदवार आहेत त्यांची सविस्तर यादी द्यावी.

५)	परिक्षा पास झालेल्या उमेदवारांच्या Service Book ची छायांकित सत्यप्रत देण्यात यावी. ज्यांनी परिक्षा पास केली नसेल त्यांच्या नावाची यादी द्यावी.

६)	जे परिक्षा पास नसतांना पदोन्नती देवून सेवानिवृत्त झाले त्यांच्या नावासहित यादी द्यावी.

७)	कनिष्ठ अभियंता पदावर हजर झाल्यावर किती वर्षात परिक्षा पास करावी लागते कालावधी द्यावा.

८)	तीन वर्षात परिक्षा पास नसतांना किती अभियंतांना वेतनवाढी व उच्च श्रेणी देण्यात आली त्याचा तपशील द्यावा.

९)	मागासवर्गीयांच्या अनुशेष अंतर्गत किती जागेवर सर्वसाधारण क. अ. कार्यरत आहेत यांचा तपशील द्यावी.

२९)	सरळसेवेची केलेली माहिती

| सरळसेवा | S.C. | S.T. | V.J.N.T. | | | | SBC | OBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | A | B | C | D | | | |
| मंजूर पदे | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | |
| शिल्लक अनुशेष | | | | | | | | | |

पदोन्नती

| | S.C. | S.T. | V.J.N.T. | | | | SBC | OBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | A | B | C | D | | | |
| मंजूर पदे | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | |
| शिल्लक अनुशेष | | | | | | | | | |

२)	वरील एकूण शिल्लक अनुशेषाप्रमाणे आज रोजी शिल्लक रिक्त पदे आहे का ? नसल्यास शिल्लक अनुशेषावर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची सरळसेवेने समायोजनाने, नियुक्ती केली आहे काय ?

३)	१३-७-२००४ च्या नंतर सहाय्यक आयुक्त मागासवर्गीय कक्ष औरंगाबाद यांनी तपासणी केली आहे काय ?

४)	सरळसेवेने ६८ कनिष्ठ अभियंता संवर्गाची उमेदवारांची १०० बिंदू नामावली नुसार प्रवर्गनिहाय यादी देण्यात यावी.

५)	१३-७-२००५ च्या सहाय्यक आयुक्त मागासवर्गीय कक्ष यांच्या अनुशेष तपासणीनुसार १५ अतिरिक्त क. अभियंताची यादी देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक २०-१२-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण २३ पृष्ठांची माहिती दिल्याचे आढळून येत आहे. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक २५-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २४-०१-२००७ च्या स्थळप्रतीवर सही करुन माहिती मिळाल्याची पोच दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जात म्हटले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०२-२००७ रोजी सुनावणी घेतली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक २४-०१-२००७ रोजी देण्यात आलेली असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर आदेश दिनांक ०६-०३-२००६ रोजी पारीत केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर

अपिलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांना सुनावणीच्या तारखेची लेखी सूचना न देता प्रशासनाची बाजू घेऊन त्यांच्या विरोधात प्रकरण निकाली काढले असल्याची आयोगाकडें तक्रार केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडील पत्र दिनांक २४-०१-२००७ अन्वये, दिनांक २५-०१-२००७ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती दिली आहे. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्याकडील स्थळप्रतीवर सही केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिनांक २२-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन या सुनावणी संदर्भातील आपले आदेश दिनांक ०६-०३-२००७ रोजी पारीत केले आहेत. सदर सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. अपिलार्थीस त्यांनी सदर पत्र साध्य पोस्टाव्दारे पाठविले होते. त्यांच्या म्हणण्याप्रीत्यर्थ त्यांनी अपिलार्थीस सुनावणीस हजर राहण्याच्या, त्यांच्याकडून दिनांक १७-०२-२००७ रोजी अपिलार्थीस पाठविलेल्या, पत्राची प्रत आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुलतः अपिलार्थीने मागितलेली माहिती ४० वर्षांशी संबंधीत असून त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विचारलेली बहुतांशी माहिती प्रश्नार्थक स्वरुपात व काही वेळा त्यांचे खुलासे अपेक्षित करणारी अशी आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जातील सर्व २९ मुद्दयासंदर्भात माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०१-२००७ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपिलात म्हटल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील करतांना फक्त जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना सुनावणीची लेखी सूचना न देता प्रशासनाची बाजू घेऊन विरोधात प्रकरण निकाली काढले असा दावा केला आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीसाठी त्यांच्याकडील दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. तथापि त्यावेळी अपिलार्थी गैरहजर राहीले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीच्या दर्जावर अभिप्राय व्यक्त करण्यासाठी अपिलार्थी आज देखिल आयोगासमोर हजर नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती आयोगास सकृतदर्शनी सुसंगत वाटते. जन अपिलीय अधिकारी यांचे सुनावणीस हजर राहण्याचे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही असे जरी गृहीत धरले तरी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयाची प्रत अपिलार्थीस दिनांक ०६-०३-२००७ रोजी दिलेली आहे ही सर्व वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले दिनांक २१-०३-२००७ रोजीचे (दिनांक २०-०३-२००७) व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

प्रसंगावशात येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडून ४० वर्षे इतक्या मोठ्या कालावधीशी संबंधित एकूण २९ मुद्दयावर व त्यापैकी काही मुद्दयावर परत उपमुद्दे उपस्थित करुन, मोठ्या प्रमाणात व्याप्ती असलेली माहिती मागवली आहे. सदर माहिती चुकीची वाटल्यावरुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले व स्वतः प्रथम अपिल सुनावणीचे वेळी गैरहजर राहीले. आज देखिल आयोगासमोर त्यांचे, त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात, नेमके काय म्हणणे आहे हे सांगण्यास ते गैरहजर आहेत. या सर्व प्रकारावरुन अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये कितपत स्वारस्य होते याची आयोगास शंका आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडे विस्तृत प्रमाणात माहिती मागवायची ती प्राप्त झाल्या-नंतर तिची शहानिशा न करता जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे सदर माहिती अपूर्ण, दिशाभूल करणारी अशा प्रकारचे अभिप्राय व्यक्त करत, अपिले करुन स्वतः सुनावणीस गैरहजर रहावयाचे अशा प्रकारची कार्यशैली असणा-याचा सार्वजनिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारच्या प्रवृत्ती वाढीस लागल्यास माहिती अधिकारासारखे नागरिकांच्या हाती सोपविलेले प्रभावी अस्त्र बोथट होण्यास वेळ लागणार नाही. तेव्हा माहिती अधिकाराखाली मागविण्यात येणा-या माहितीच्या आकारमानावर काही बंधने घालण्याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे असे वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १३-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रऊफ एन पटेल, पटेल प्रोव्हीजन्स, प्रियदर्शनी इंदिरानगर, गारखेडा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८७३

निर्णय दिनांक १३-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. सदाशिव कचरु वाघमारे,<br>मुख्य संपादक, साप्तहिक विश्वनायक,<br>शाक्यनगर, डॉ. आंबेडकर चौक (भोईवाडा),<br>कोतवालपूरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा प्राचार्य, पी. ई. एस. अभियांत्रिकी<br>महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्राचार्य, पी. ई. एस. अभियांत्रिकी<br>महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रबंधक, पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सदाशिव कचरु वाघमारे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय श्री. मोहन दिगांबर सोनटक्के (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, पी. ई. एस. अभियांत्रिकी

महाविद्यालय श्री. मिलींद मनोहरराव देशपांडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९९४ ते २००६ या कालावधीतील वर्ग ४, वर्ग ३ या पदासाठी लागू केलेल्या ऑल इंडिया कॉन्सील फॉर टेक्नीकल (ए) तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य (डीटीइ) आदेश पत्राच्या छायांकित प्रतीची मागणी खालील प्रमाणे केली होती.

"वर्ग ४, वर्ग ३ या पदांच्या वेतनश्रेणी संबंधी (जी. आर.)"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-१२-२००६ रोजी प्रथम अपील करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तद्वतच त्यांनी आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नसल्याचे कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीच माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९

(३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असून वर्ग ४ व वर्ग ३ पदाच्या वेतनश्रेणी संबंधातील शासन आदेशाची प्रत प्राप्त झाल्यास त्यांना समाधान होईल. आपण व्यक्तिशः माहिती मागवूनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविण्याचा कोणता प्रयत्न केला काय किंवा त्यांच्याकडे किती वेळा गेला असे आयोगाने विचारले असता अपिलार्थीने, ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे अंदाजे ३ ते ४ वेळा गेले असल्याचे सांगितले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दावा खोडून काढून सदर माहिती प्राप्त करण्याप्रीत्यर्थ अपिलार्थी त्यांच्याकडे कधीही आले नाहीत असे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहितीची मागणी ज्यावेळी केली त्यावेळी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदी त्यांना पुरेशा स्पष्टपणे अवगत नव्हत्या. अपिलार्थीच्या नातेवाईकास त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या जी. आर. संदर्भातील छायांकीत प्रत त्यांनी दिनांक ०४-०७-२००६ रोजी हस्तांतरीत केली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात काही खुलासा त्यांनी अपिलार्थीने अशाच प्रकारच्या केलेल्या वेगळ्या अर्जासंदर्भात दिला होता त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती अपेक्षित नसावी असे त्यांना वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात कारवाई केली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अशा प्रकारच्या माहितीसाठी वेगवेगळे ३ अर्ज केले होते. सदर तीनही अर्ज एकत्र करुन

त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली असल्यामुळे व माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींची त्यांना पुरेशी कल्पना नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली नाही, विहित मुदतीत अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार ठेऊन व त्याप्रमाणे अपिलार्थीस लेखी कळवून त्यांना ही माहिती अपिलार्थीस सहज देता आली असती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता त्यांना आदेशाची फक्त झेरॉक्स प्रत अपेक्षित होती. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देणे एवढेच जन माहिती अधिकारी यांचे काम होते. तथापि ते देखील त्यांनी विहित मुदतीत पार पाडल्याचे आयोगास दिसून येत नाही. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीस सदर माहिती ३ दिवसाच्या आत देण्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. तथापि अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाली हा मुद्दा शेवटी राहतोच. अपिलार्थीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी व अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील कोणतीही कारवाई काही गृहीतके मनात धरुन केली नाही ही दोनही अधिका-यांच्या हातून घडलेली चूक आहे असे आयोग मानतो. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या नातेवाईकास अपिलार्थीने सदर अर्ज त्यांच्याकडे करण्यापुर्वीच माहिती दिल्याचे म्हटले आहे तथापि जन माहिती अधिकारी यांचा हा दावा आयोग अमान्य करत आहे. कारण अपिलार्थी व त्यांचे नातेवाईक या दोघांनाही स्वतंत्र आस्तित्व असून त्यांना वेगवेगळी अधिकारिता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम ३ अन्वये प्राप्त झालेली आहे. नातेवाईकास माहिती दिली व ती अपिलार्थीस मिळाली असे जन माहिती अधिकारी यांनी काढलेले गृहीतक आयोगास मान्य नाही. वर उल्लेख केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्याचे आपले कर्तव्य जन माहिती अधिकारी यांनी योग्यपणे पार न पाडून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द केला आहे त्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, सचिव, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. संचालक, तंत्रशिक्षण मुंबई यांनी सचिव पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई हे या आदेशाचे अनुपालन विहित मुदतीत करतील असे पहावे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल सचिव, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई यांनी त्यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

४.	संचालक तंत्रशिक्षण, मुंबई यांनी सचिव, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई हे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाने विहित केलेल्या मुदतीत कारवाई करतील असे पहावे.

औरंगाबाद
दिनांक	१३-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. सदाशिव कचरु वाघमारे, मुख्य संपादक, साप्तहिक विश्वनायक, शाक्यनगर, डॉ. आंबेडकर चौक (भोईवाडा), कोतवालपूरा, औरंगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सदस्य सचिव, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, (मुंबई), आनंभवन, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८८०

निर्णय दिनांक १३-०२-२००८

श्री. बंडे भालचंद्र माधवराव, : अपिलार्थी
जिल्हा कार्याध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन
आंदोलन, नांदेड,
व्हॉईट हाऊस, मेन रोड, मुखेड, ता. मुखेड
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा धर्मादाय आयुक्त, नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा धर्मादाय सहाय्यक आयुक्त, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, महावीर सोसायटी, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग नांदेड, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, महावीर सोसायटी, नांदेड

# निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बंडे भालचंद्र माधवराव हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय श्री. पांडुरंग रामराव चव्हाण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. भगवानराव यशवंतराव फड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च १९८२ ते डिसेंबर २००५ या कालावधीतील श्री. योगीराज गजानन महाराज संस्थान समिती मुखेड यांच्याबाबतची माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

"१. घटनेची (नियमावलीची) प्रत देणे.

२. लेखा परिक्षण अहवालाच्या प्रति देणे.

३. आजवरच्या विश्वस्त मंडळाची यादी देणे.

४. निवणुका झाल्यात काय ? झाल्यास कशा ? पध्दत कोणती ? माहिती देणे.

५. घटनेनुसार सभासद, आजीव सभासद, मतदार, विश्वस्त ह्यांची निवड कायदेशीर झाली काय तसे असल्यास त्यांची यादी देणे.

६. विश्वस्तांकडून बेकायदेशीर/अवैध कर्तव्य झाले असल्यास त्यावरील कार्यवाहीचा तपशील देणे.

७. प्रशासक नेमण्यासाठी आवश्यक परिस्थिती कोणती ? प्रशासक नेमता येईल काय ? प्रशासकाचे निकष कोणते ?

८. प्रशासक नेमण्याची पध्दत व प्रशासकाची योग्यता ई बाबत माहिती देणे. सर्व प्रति साक्षांकित हव्यात."

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांना देणे शक्य आहे ती माहिती देऊन उर्वरीत माहितीसंदर्भात अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये ३५ व सदर माहिती टपालाने हवी असल्यास टपाल खर्च रुपये २५ असे एकूण रुपये ६० त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीने प्रथम अपील चुकीच्या प्राधिकरणाकडे केले असल्याने संबंधीतांनी अपिलार्थीचे सदर अर्ज सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड (जे या प्रकरणी प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी आहेत) यांच्याकडे दिनांक २५-०७-२००६ रोजी पाठविला. येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळ अपील अर्ज धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १७-०३-२००६ रोजी केला. सदर अर्ज धर्मादाय सह आयुक्त यांच्या कार्यालयात दिनांक २१-०३-२००७ रोजी दाखल करुन घेण्यात आला. धर्मादाय सह आयुक्त औरंगाबाद यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांच्याकडे सरळ पाठविण्याऐवजी तो प्रथम सहाय्यक धर्मादाय आयुक्त औरंगाबाद, ज्यांचा या प्रकरणाशी

काहीही संबंध नाही, त्यांच्याकडे प्रथम पाठविला व तदनंतर त्यांनी तो सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड जे या प्रकरणी प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी आहेत त्यांच्याकडे पाठविला. या प्रकरणी अपिलार्थीचा अपील अर्ज विचारार्थ घेण्यासाठी सह धर्मादाय आयुक्त औरंगाबाद यांचेकडून निरर्थक कालपव्यय झाला आहे असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या अपिलासंदर्भातले आदेश दिनांक १७-०८-२००६ रोजी पारीत केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या निर्णयाव्दारे अपिलार्थीचा अपील अर्ज, त्यांनी माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरल्याने फेटाळला. अपिलार्थीस सुनावणीस हजर राहण्याची नोटीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठवून देखील अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीस हजर राहिले नाहीत याची नोंद येथे घेण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांना माहिती न दिल्याने व त्यांच्या अर्जाची दखल न घेतल्याने त्यांना माहिती देण्यासाठी व त्यांच्यावर दंडात्मक कारवाई आयोगाने करण्याविषयी विनंती केली आहे व या विनंतीबरोबरच त्यांनी आपल्या या अर्जामध्ये मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांना, त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या उर्वरित माहितीच्या प्रती त्यांना देण्यापोटीचे एकूण रुपये ६० इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस याच पत्राव्दारे कळविले आहे. त्यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरले नाही अथवा सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी त्यांनी नंतर जन माहिती अधिकारी यांच्याशी कोणताही संपर्क साधला नाही. अपिलार्थीने आवश्यक असलेले माहितीपोटीचे भरावे लागणारे शुल्क त्यांच्या कार्यालयात न भरल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती पाठविता आली नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कधीही टाळाटाळ केली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करणत आला की, अपिलार्थीचा दिनांक १७-०३-२००६ रोजीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्रत्यक्षतः दिनांक २५-०७-२००६ रोजी सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडून प्राप्त झाला. सदर अपिलावर त्यांनी दिनांक ०४-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक १७-०८-२००६ रोजी पारीत केले. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांना सुनावणीस हजर राहण्याचे पत्र देऊन देखील गैरहजर राहिले. जन माहिती अधिकारी यांनी या सुनावणीच्या वेळी मांडलेले त्यांचे म्हणणे ग्राह्य धरुन त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जाव्दारे एकूण ८ मुद्दयावर माहिती मागविली असून त्यातील २ मुद्दयावरील माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. या प्रकरणी मुळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस

आवश्यक असलेल्या माहितीपोटी एकूण रुपये ६० इतके शुल्क भरण्यास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या पत्रामध्ये स्पष्ट केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सूचना देऊन देखील अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहिती-पोटीचे शुल्क भरले नाही, येथे जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) प्रमाणे अपेक्षित कारवाई केल्याचे दिसून येते. याउलट अपिलार्थीने मात्र त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे कोणतेही शुल्क भरले नाही, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीस अनुपस्थित राहिले व त्याचबरोबर आज सुनावणीस देखील ते अनुपस्थित आहेत हे पाहता त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये त्यांना काही स्वारस्य होते किंवा कसे असा आयोगास प्रश्न पडतो. या प्रकरणी मुळात अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क भरले नसल्याने अपिलार्थीचा व्दितीय अपील अर्ज फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आज आयोगाकडे त्यांनी अपिलार्थीस पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. त्यावरुन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्रव्यवहारासंबंधात पत्रे पाठविल्याचे सिध्द होत आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत योग्य प्रतिसाद दिलेला आहे परंतु अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे आवश्यक शुल्क जन माहिती अधिकारी यांचेकडे भरलेले नाही हे पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

माहितीचा अधिकार हा कायदा प्रभावीपणे राबविण्यासाठी ज्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून जनसामान्यांनी काही अपेक्षा ठेवल्या

जातात त्याचबरोबर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीनुसार या कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता त्यांचेही काही उत्तरदायित्व असल्याची तरतूद या अधिनियमामध्ये आहे. तथापि सदर उत्तरदायित्वाची पुर्तता न करता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती अपेक्षित करणे चुकीचे आहे. या प्रकरणी नेमके असेच घडले आहे.

प्रसंगवशात या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा प्रथम अपील अर्ज धर्मादाय सह आयुक्त यांच्या कार्यालयाकडे दिनांक १७-०३-२००६ रोजी दाखल केला असता तो प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमल्या गेलेल्या अधिका-याकडे दिनांक २५-०७-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीचा अपील अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे पाठविण्याकरिता धर्मादाय सह आयुक्त औरंगाबाद यांनी लावलेला कालावधी निश्चितपणे समर्थनीय नाही असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार धर्मादाय सह आयुक्त यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयामध्ये या कायद्याची त्वरेने अंमलबजावणी होण्याकरिता अशा प्रकारचे विलंब कसे टळू शकतील याची धर्मादय सह आयुक्त यांनी त्यांचे स्तरावर तपासणी करुन आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रशासकीय पध्दतीमध्ये आवश्यक ते बदल घडवून आणावेत असे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील १९ (८) (a) (iv) मधील तरतुदी अन्व्ये सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक १३-०२-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बंडे भालचंद्र माधवराव, जिल्हा कार्याध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, नांदेड, व्हॉईट हाऊस, मेन रोड, मुखेड, ता. मुखेड जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, महावीर सोसायटी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग नांदेड, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, महावीर सोसायटी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/५६

निर्णय दिनांक : १३-०२-२००८

१ श्री. अमर अंबादासराव कदम (परमेश्वर), : तक्रारदार
रा. तुळजापूर जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१
(मध्यम प्रकल्प), उस्मानाबाद

## विवेचन

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. अमर अंबादासराव कदम (परमेश्वर) (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी क्र. १ (मध्यम प्रकल्प), उस्मानाबाद ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. ०७.०९.२००७ रोजीच्या अर्जान्वये तक्रार केली असून त्या तक्रारीची नोंद राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दि. १३.९.२००७ रोजी झालेली आहे. सदर तक्रारीमध्ये तक्रारदार यांनी अशी तक्रार केली आहे की, राज्य माहिती आयोगाने त्यांचेकडील दि. ११.१.२००७ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी त्यांना दि.१४.२.२००७ रोजी फेरसुनावणीचे पत्र पाठविले होते,

सुनावणीचे वेळी उत्तरवादी व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी हे गैरहजर असल्यामुळे तक्रारदार यांनी त्यांचे लेखी म्हणणे जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केले.

आज झालेल्या सुनावणीचे वेळी तक्रारदार यांनी असा युक्तीवाद केला की. आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता ६० दिवसांनंतर तक्रारदार यांचे अपीलावर चुकीचा निर्णय दिलेला आहे. उत्तरवादी व जन अपिलीय अधिकारी हे दोघेही आयोगाची व त्यांची दिशाभूल करत आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दोन वेळेस वेगवेगळी माहिती दिल्याचे सिध्द होऊनही जन अपिलीय अधिकारी हे त्यांना पाठीशी घालत आहेत. उत्तरवादी यांच्याकडून त्यांना विसंगत माहिती प्राप्त झाल्याने त्यांच्यावर रु. २५,०००/- इतक्या रकमेची शास्ती लावण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

तक्रारदार यांनी त्यांचे अर्जासोबत जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाचे आदेशानंतर फेर अपीलावर दिलेल्या निर्णयाची प्रत जोडलेली नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्या कृतीवर आयोगास अभिप्राय देता येणार नाही. तथापि तक्रारदार यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी फेरसुनावणीनंतर दिलेला निर्णय मान्य नसल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार आयोगाकडे व्दितीय अपील करावे म्हणजे त्यांचे तक्रारीवर आयोगास निर्णय घेणे सुकर होईल.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अमर अंबादास कदम (परमेश्वर), तुळजापूर जि.उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी क्र. १ (मध्यम प्रकल्प), उस्मानबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८७८

निर्णय दिनांक १४-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ शंकरराव सुरडकर,<br>जुना उस्मानपुरा पोस्ट ऑफिस शेजारी,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्रशासकीय अधिकारी,<br>(जल व भूमी) व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा (जल व भूमी) व्यवस्थापन संस्था,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षत : | जन माहिती अधिकारी | : | प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, पत्रपेटी क्र. ५०४, कांचनवाडी, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अधीक्षक अभियंता व सह संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, औरंगाबाद |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भाऊ शंकरराव सुरडकर हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था श्री. प्रकाश एकनाथ देशमुख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व सह संचालक, जल व भूमी व्यवस्थापन

संस्था श्री. अशोक कलप्पा घाटे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या विभागातंर्गत सन २००३-०४, २००४-०५ व २००५-०६ या वर्षात विविध विभागामध्ये लेखा शिर्षनिहाय अनुदान व खर्चाबाबतची माहिती मिळण्याबाबत खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ अनुदान | अंतीम अनुदान | मार्च अखेर एकूण खर्च | कमी | अधिक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये १०० /- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्यास सूचित केले होते. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाने पाठविले असून अपिलार्थीस हे पत्र प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ रजिस्टर पोस्टाची अपिलार्थीची पोच पावतीची प्रत आयोगासमोर सादर केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी प्रमाणे, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १६-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निर्देशीत केल्याप्रमाणे आवश्यक ते शुल्क त्यांचे

कार्यालयात भरुन त्यांच्या कार्यालयात तयार असलेली माहिती घेऊन जाण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर अपिलार्थी यांनी त्यांना दिनांक १५-११-२००६ रोजी पत्र लिहून, त्यांनी एकतर्फी निर्णय घेतल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले असून या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती केली आहे.

अपिलार्थीचे सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक २३-११-२००६ रोजी या प्रकरणावर सुनावणी ठेवली. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या वेगवेगळ्या विषया-वरील अनेक अर्जावर एकाच बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला. या निर्णयाच्या अनुषंगाने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, त्यांनी मागितलेली माहिती देण्यास संस्थेने नकार दिला नाही व त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयास दिनांक २३-११-२००६ रोजी पाठविण्यात आली आहे. वास्तविकतः या बैठकीचे इतिवृत्त तरी किमान जारी करणे अपेक्षित होते, तथापि अशा प्रकारचे कोणतेही इतिवृत्त त्यांनी जारी न करता अपिलार्थीस दिनांक २३-११-२००६ रोजी माहिती पाठविल्याचे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय घेण्याची ही पध्दत चुकीची आहे. त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना दोघांनाही एकत्र बोलावून, त्यांचे म्हणणे नोंदवून त्यावर आपले आदेश पारीत करणे हे “अपील ठरविणे” या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे याची त्यांनी नोंद घ्यावी. दिनांक २३-११-२००६ रोजी झालेल्या बैठकीनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-११-२००६ रोजी अपिलार्थीने मागितलेली माहिती दिली. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-११-२००६ रोजी दिलेल्या पत्रासोबत ३७ प्रती सोबत जोडल्या असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही एकाच

पृष्ठाची असून उर्वरीत ३६ पृष्ठे कशासंदर्भात आहे असे विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे माहितीसाठीचे सर्व अर्ज एकत्रीतपणे निकाली काढले असून सर्व अर्जाशी संबंधीत माहिती त्यांनी दिनांक २३-११-२००६ रोजी रोजी एकत्रच दिल्याचे सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-१२-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलाची नोंदणी माहिती आयोगाच्या कार्यालयात दिनांक १५-०१-२००७ रोजी झाली आहे.

या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले असे म्हणून जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी आयोगा-कडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांचे जे लेखी म्हणणे मांडले आहे, तोच त्यांचा युक्तिवाद आहे असे समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-१०-२००६ रोजीच्या पत्राने अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये १०० /- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क न भरता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील झालेल्या दिनांक २३-११-

२००६ रोजीच्या बैठकीमध्ये ठरल्यप्रमाणे दिनांक २३-११-२००६ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिनांक २३-११-२००६ रोजी बैठक झाली त्यावेळी अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी त्यांचे कार्यालयात भरावयाचे शुल्क अपिलार्थीस दिनांक १२-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. तथापि अपिलार्थीने त्यांच्याकडे शुल्क भरले नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या दिनांक २३-११-२००६ च्या बैठकीत ठरल्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-११-२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोच दिली आहे. सदर पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखवली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊनही त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे, त्यांना माहिती प्राप्त झाली नाही असे असत्य विधान करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार व्दितीय अपील केले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन सदर माहिती अपिलार्थीस दिनांक २३-११-२००६ रोजी प्राप्त झाली असल्याने, सदर माहिती मिळाली नाही असे असत्य विधान करुन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करण्याचे अपिलार्थीस कोणतेही प्रयोजन नव्हते. तथापि त्यांनी असत्य विधान करुन आयोगाकडे व्दितीय अपील केले असून त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. त्यांच्या अशा विसंगत वर्तनामुळे

राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप आयोग आला आहे.

सबब अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जासंदर्भात विहित मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन कलम ७ (१) च्या तरतुदींचे पालन केले असल्यामुळे व अपिलार्थीस विलंबाने माहिती मिळण्यास ते जबाबदार नसल्याने त्यांच्यावर शास्तीच्या कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>दिनांक १४-०२-२००८

( वि. बा. बोरगे )<br>राज्य माहिती आयुक्त,<br>खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भाऊ शंकरराव सुरडकर, जुना उस्मानपुरा पोस्ट ऑफिस शेजारी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, पत्रपेटी क्र. ५०४, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व सह संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९३०
निर्णय दिनांक- १४-०२-२००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.संपत तुकाराम गायकवाड,<br>रा.शेंडी (भंडारदरा वसाहत)<br>ता.अकोले, जिल्हा-अहमदनगर | | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, घाटघर<br>उदंचन जलविद्युत प्रकल्प<br>गुणनियंत्रण विभाग क्र.२ चोंढे<br>ता.शहापूर, जिल्हा- ठाणे. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>घाटघर जलविद्युत प्रकल्प मंडळ,<br>त्र्यंबकरोड, नाशिक-२. | : | |

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १४-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.संपत तुकाराम गायकवाड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, घाटघर उदंचन जल विद्यूत प्रकल्प विभाग क्रमांक-२, चोंढे, यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी सहाय्यक

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, श्री.विकास माधवराव येवले (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा सहा.अधीक्षक अभियंता, घाटघर जलविद्यूत प्रकल्प मंडळ नाशिक, श्री.दिलीप रामरतन जोशी (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ११-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन १९८१ ते २००५ या २४ वर्षाच्या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

> "शैक्षणीक पात्रतेसहीत भंडारदरा विभागाकडील लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अहमदनगर सेवाजेष्ठता यादी.
> मिस्त्री, हजेरीलिपीक, कारकून प्रयोगशाळासहाय्यक, लॉगबूककिपर, भांडारपरिचर, मुकादम, अवेक्षक, उपअवेक्षक, हत्यारपार."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या वरील माहितीचे स्वरुप निश्चीतपणे जरी कळून येत नसले तरी त्यावरुन अपिलार्थीस वर उल्लेखिलेल्या संवर्गाची १९८१ ते २००५ या कालावधीतील शैक्षणीकपात्रतेसह सेवाजेष्ठतेची यादी हवी असावी, असे अनूमान काढण्यास हरकत नाही. अपिलार्थीच्या या मूळ माहितीच्या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- १७-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीने

मागणी केलेली माहिती पुरविण्यासाठी तयार असल्याचे पुढे अपिलार्थीस कळवून ही माहिती समक्ष येवून घेवून जाण्याचे त्यांनी या पत्राव्दारे समक्ष घेवून जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात हजर झाले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगाच्या सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीने माहितीची मागणी समक्ष केली असूनही व ती पुरविण्यास जन माहिती अधिकारी यांनी तयारी दर्शवूनही अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात माहिती घेण्यासाठी उपस्थित झाले नाहीत. याची येथे नोंद घेण्यात येत आहे.

तद्नंतर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतूदीनूसार दिनांक ०२-०५-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती देण्यात आली नाही, त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली या कारणास्तव प्रथम अपील केले आहे. या अपीलवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि त्यांनी त्यांचेकडील दिनांक ३१-०५-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस संबंधीत विभागाशी संपर्क साधून उपलब्ध माहिती आवश्यक ते शुल्क भरुन घेवून जाण्याचे सूचित केले. याच विषयावर त्यांनी अपिलार्थीस परत दिनांक २१-०८-२००६ रोजी दुसरे पत्र देवून असे कळविले आहे की, '' आपल्या अपील अर्जाच्या अनुषंगाने संबंधीत माहिती अधिकारी यांच्याकडे पुणे परिमंडळाने प्रसिध्द केलेल्या सन २००३ च्या संवर्गनिहाय सेवाजेष्ठता याद्या उपलब्ध आहेत. सेवाजेष्ठता याद्यामध्ये समाविष्ट असलेल्या संवर्गात शैक्षणीक पात्रतेचा उल्लेख आढळून येत नाही व तशा याद्या उपलब्ध नसल्याने जी

माहिती उपलब्ध नाही ती देता येणे शक्य नाही. लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर या कार्यालयाच्या सेवाजेष्ठता याद्या संबंधीत विभागाकडे उपलब्ध नाहीत. याबाबत आपण संबंधीत कार्यालयाकडे संपर्क साधावा. आपण नमूद केलेल्या संवर्गापैकी कारकून, हजेरी लिपीक, तांत्रिक सहाय्यक, मिस्त्री, रोजवहीपाल, भांडारपरिचन, प्रयोगशाळा सहाय्यक, हत्यारपाल या संवर्गाची दिनांक- ३१-१२-२००३ अखेरच्या जेष्ठतासूच्या ( पुणे परिमंडळाने) प्रसारित केलेल्या जशा आहेत त्यांच्या प्रती विभागाकडून उपलब्ध होऊ शकतील. कृपया सदर माहिती विभागात समक्ष पाहून घ्यावी व आवश्यक वाटल्यास किंवा नसल्यास तसे परस्पर विभागास कळवावे. आपला अर्ज निकाली काढण्यात आला आहे."

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती दिली नाही, माहिती अपूर्ण आहे, रक्कम कळविण्यात आली नाही व एकाच विषयावर दोन वेळा निकाल देण्यात आलेला आहे, असे म्हटले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना शैक्षणीकपात्रतेसह लाभक्षेत्र विकास प्राधिकरण ,अहमदनगर या कार्यालयाची जेष्ठतासूची देण्यात आलेली नाही, सेवाजेष्ठता यादीत वाहन चालक, फिटर, मुकादम, चौकीदार, जड मजुर इत्यादी पदाची चुकीची माहिती देण्यात आलेली आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे चुकीची माहिती देण्यात आली असल्यामूळे त्यांचे दप्तर तपासून जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. त्यानी आयोगाकडे सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या एका वेगळ्या पत्राव्दारे वरील

मुद्यासह आयोगास असे निदर्शनास आणले की, काही मजूरांना ते एस.एस.सी पास नसतांनाही मुकादम पदी पदोन्नती देण्यात आलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दिनांक- ११-०३-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याने व अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः मागितली असल्यामूळे त्यांना ती तयार असल्याचे त्यांच्याकडील दिनाक-१७-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. तथापि अपिलार्थीने समक्ष माहिती अपेक्षिली असूनही ती ही माहिती घेण्यास हजर झाले नाहीत.

अपिलार्थी यांनी मागितलेली जेष्ठतासूची त्यांच्याकडे तयार होती त्या सेवा जेष्ठतासूचीमध्ये शैक्षणीकपात्रतेची नोंद ठेवण्यात आली नसल्याने, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यामध्ये उपलब्ध नसल्याने ती देणे आवश्यक नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी हे नियमात न बसणारी मागणी पदरात पाडून घेण्यासाठी शासकीय अधिका-यांना वेठीस धरुन माहिती अधिकार अधिनियम २००५ चा अयोग्य वापर करुन असंबंधीत माहिती वेळोवेळी मागवित असतात. आज पर्यंत त्यांनी त्यांच्याकडील ६५ अर्जाव्दारे २९ अपीलान्वये माहितीसाठीचे वेगवेगळे अर्ज त्यांच्याकडे केले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास आवश्यक असलेल्या पदाचे सन १९८१ ते २००५ या कालवधीतील जेष्ठतासूची (लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अहमदनगर वगळून) कार्यालयात

उपलब्ध असून ती घेवून जाणेकामी अपिलार्थीस त्यांचेकडील कार्यालीयनपत्र क्रमांक-धा.उ.ज.वि.प्र.क्र.१ प्रलि/१४०९, दिनाक १७-०५-२००६ अन्वये कळविण्यात आले आहे.

मंडळ स्तरावर त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांच्या सेवाजेष्ठतेच्या यादीमध्ये अधिक्षक अभियंता तथा प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अहमदनगर यांचेकडील कर्मचा-यांचा देखील समावेश आहे. त्यामूळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती शैक्षणीक पात्रता वगळता त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे. त्यांच्या कार्यालयामध्ये आजतागायत ठेवण्यात आलेल्या जेष्ठतासूची मध्ये शैक्षणीक पात्रतेचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे, ती ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देवू केलेल्या माहितीत देखील लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अहमदनगर यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांचा समावेश आहे.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमा व्दारे विहित केलेल्या तरतूदी मध्ये प्रतिसाद दिलेला नाही. त्यांचेकडील दिनांक १७-०५-२००६ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अहमदनगर वगळून अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये समक्ष माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी ही माहिती मिळविण्याप्रित्यर्थ उपस्थित राहिल्याबाबतचा कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केलेला नाही. वास्तविकतः अहमदनगर लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांच्याकडील

कर्मचा-यांचा देखील जन माहिती अधिकारी यांनी देवू केलेल्या माहितीमध्ये समावेश होता. तथापि जन माहिती अधिकारी यांना ही माहिती नव्हती. अपिलार्थी हे राज्य शासनाच्या जल संपदा विभागातंर्गत घाटगर उदचंन जलविद्युत प्रकल्प विभाग क्रमांक-२, चोंढे तालूका-शहापूर जिल्हा- ठाणे या कार्यालयांतर्गत रुपांतरीत अस्थाई आस्थापनावर मजूर या पदावर कार्यरत आहेत. जलसंपदा विभागातील क्षेत्रीय रुपांतरीत आस्थापनेवरील कर्मचा-यांची जेष्ठता परिमंडळाचे स्तरावर ठेवण्या बाबत जलसंपदा विभागाने त्यांच्याकडे दिनांक- १० जून १९९३ रोजी आदेश पारित केले आहेत. राज्य शासनाने दिलेल्या निर्णयानूसार रुपांतरीत आस्थापनेवरील कामागारांच्या जेष्ठता सूची परिमंडळीय स्तरावर ठेवण्याच्या स्पष्ट सूचना या परिपत्रकामध्ये आहेत. त्याच बरोबर याच परिपत्रकातील ४. ५ मध्ये प्रत्येक विभाग / मंडळ परिमंडळ कार्यालयात कामगारांचे पदनामनिहाय नोंदवही ज्या प्रपत्रात ठेवावयाची आहे. त्या प्रपत्राचा नमूना या निर्णयासोबत जोडला आहे. सदर प्रपत्राचे अवलोकन करता यामध्ये कोठेही शैक्षणीक पात्रतेचा उल्लेख नाही. त्यामूळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आलेल्या जेष्ठतासूचीमध्ये संबंधीत कामगाराच्या शैक्षणीक पातत्रतेचा उल्लेख केलेला नाही. ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस शैक्षणीक पात्रतेसह जेष्ठता सूची अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीनुसार देणे, हे जन माहिती अधिकारी यांना शक्य नाही. अपिलार्थीस कोणत्याही कर्मचा-यांच्या शैक्षणीक पात्रतेची माहिती हवी असल्यास ते स्वतंत्रपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन सदर माहिती प्राप्त करु घेवू शकतात.

अपिलार्थीने युक्तीवादाच्या वेळी श्री.लहू यशू करवंदे व रविंद्र रघुनाथ शेराटे यांच्या सेवापाटाची झेरॉक्सप्रत आयोगास सादर करुन सदर कर्मचारी अनु. इयत्ता आठवी , एस.एस.सी नापास असूनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पदोन्नती दिल्याचे आयोगास

सांगितले. अपिलार्थीस त्यांच्या वैयक्तीक मागणीची तड लावण्यासाठी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हवी आहे, असे दिसून येते. तथापि अपिलार्थीच्या वैयक्तीक गा-हाण्याच्या संदर्भात निर्णय देण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने, या प्रकरणी अपिलार्थीच्या या विषयावरील अर्जावर मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प सिंचनभवन, बारणे रोड, पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही प्राधान्याने करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद न देवून माहिती अधिकार अधिनियमामधील कलम ७ च्या तरतुदीचा भंग केल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी अशा प्रकारची पुनरावृत्ती इतःपर टाळून माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांचेकडे प्राप्त होणा-या अर्जावर निर्णय द्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

विचाराधीन प्रकरणामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आवश्यक असलेल्या “माहिती” चे अवलोकन करता त्यांना निश्चीत काय माहिती हवी आहे, याचा अर्थबोध होत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्या प्रमाणे विहित मुदतीत कळविणे भाग होते. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सेवाजेष्ठते संदर्भात असावी, असे त्यांनी अनुमान काढून अपिलार्थीस त्यांचेकडील या विषयावरील माहिती देवू केली. हे पाहता त्यांचा दृष्टीकोन अपिलार्थीस माहिती देण्याकडेच असल्याचे दिसून येते. तेव्हा माहिती सदोषपूर्ण मागविल्याने व व्यक्तीशः माहिती मागवूनही अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेल्याचे सिध्द न करु शकल्याने आयोगाकडे त्यांनी केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळून लावण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१.अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक- १४-०२-२००८**

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक**

प्रत

१. श्री.संपत तुकाराम गायकवाड, मु.पो.शेंडी (भंडारदरा वसाहत) तालूका- अकोले, जिल्हा- अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, घाटघर उदंचन जल विद्युत प्रकल्प विभाग क्रमांक-२ चोंढे तालूका-शहापूर जिल्हा-ठाणे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, घाटघर जलविद्यूत प्रकल्प मंडळ, त्र्यंबक रोड, नाशीक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प, 'सिंचनभवन' बारणे रोड पूणे, मंगळवार पेठ, पुणे-४११०११, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८८४

निर्णय दिनांक १४-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बाबू नामदेव गबाळे,<br>रा. भवानीनगर, कंधार, तालुका कंधार,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद कंधार, तालुका कंधार,<br>जिल्हा नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप आयुक्त (सा. प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बाबू नामदेव गबाळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कंधार सौ. सविता खरपे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय यांचे

प्रतिनिधी नायब तहसीलदार नगरपालिका प्रशासन सौ. अनिता एस. भालेराव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, कंधार नगरपरिषदेच्या हद्दीतून जाणा-या रस्त्याविषयी एकूण २२ मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“१. वरील रस्ता न. पा. कंधारकडे हस्तांतरीत झाला आहे काय ? व न. पा. कंधारने ताब्यात घेतला आहे, हे खरे आहे काय ? माहिती द्यावी.

२. कंधार न. पा. कडे लोहा-कंधार राज्य मार्ग २२३ चा रोड (रस्ता) कि. मी. ११-०० ते १२-८० नगर परिषद कंधारकडे हस्तांतरीत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केंव्हा झाला ? ते हस्तांतर आदेशाची व नगर परिषदेने सदर रस्ता ताब्यात घेतल्याबाबतच्या कागदपत्रांची झेरॉक्स सत्यप्रत देणे.

३. सार्वजनिक बांधकाम विभागाने वरील दर्शविलेला रस्ता (रोड) सिमांकन (हद्द निश्चित) करुन दिला आहे काय ? सिमांकन (हद्द निश्चित) करुन दिला असल्यास सदरील रस्ता (रोड) च्या सिमांकन (हद्द निश्चित) नकाशाची सत्यप्रत देण्यात यावी. सिमांकन कशाच्या आधारे करण्यात आले त्या रेकॉर्डची माहिती व सत्यप्रत द्यावी.

४. हस्तांतर करुन न. पा. ने ताब्यात घेतलेला रोड (रस्ता) किती फुट रुंदीचा आहे ? माहिती द्यावी.

५. वर दर्शविलेल्या मुळ रोडवर डांबरीकरण केले आहे, ते बहुतांशी रस्त्याच्या मध्यबिंदू पासून उत्तरेकडे आहे, हे सत्य आहे किंवा नाही ? याची माहिती द्यावी.

६. वरिल रस्त्यावर डांबरीकरण मुळ रस्त्याच्या मध्यबिंदूच्या बहुतांशी उत्तरेकडेच आहे, रस्ता रुंदीकरण व दुभाजक बसविते वेळेस मुळ रोडच्या मध्यबिंदूपासून करणे बाबत लेखी विनंती अर्ज दिले आहे, ते खरे आहे काय ? लेखी विनंती अर्जाची दखल घेतली आहे किंवा नाही ? ह्याबाबत माहिती द्यावी.

७. लेखी विनंती अर्जाची दखल घेतली नाही, ती का घेतली नाही ? याची माहिती द्यावी.

८. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हस्तांतर झालेल्या रोड (रस्त्यावर) मूलभूत बदल (सुधारणा) करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव केव्हा पाठविला आहे ? त्या परवानगी मागणी पत्राची व संबंधीत प्रस्तावाच्या कागदपत्रांची झेरॉक्स सत्यप्रत देणे.

९. सार्वजनिक बांधकाम विभागाने मूलभूत बदल सुधारणा करणेसाठी न. पा. ने मागणी केलेल्या पत्र व प्रस्तावाप्रमाणे मंजुरी (मान्यता) दिलेल्या परवानगी व मंजूर प्रस्तावाची संबंधीत कागदपत्राच्या झेरॉक्स सत्यप्रती देणे.

१०. मुलभूत सुधारणा (बदल) प्रस्तावामध्ये अंतीम रुंदीकरण किती फुटाचे प्रस्तावीत केले आहे ? त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी.

११. न. पा. ने सा. बां. विभागाकडून रस्ता (रोड) हस्तांतर करुन ताब्यात घेतेवेळेस रस्ता सिमांकन करुन घेतला आहे किंवा नाही. रस्ता सिमांकन करुन घेतला असल्यास सिमांकन रस्त्याच्या नकाशाची झेरॉक्स सत्यप्रत देणे. मुळ रस्त्यासाठी भुसंपादन केलेल्या भुसंपादनाचा नकाशा गट नं. तपशिलासह माहिती व सत्यप्रत देणे.

१२. न. पा. कंधार प्रथम दुभाजकापासून दक्षिण व उत्तरेकडे ३० फुट रुंदीकरण करणार आहे की, ५० फुट रुंदीकरण करणार आहे ? याची माहिती द्यावी.

ह्याबाबत न. पा. मध्ये ठराव झाला आहे का ? ठरावाची सत्यप्रत व सविस्तर माहिती द्यावी.

१३. प्रथम दुभाजकापासून दक्षिणेकडे ३० फुट व उत्तरेकडे ३० फुट रुंदीकरण केल्यावर उर्वरीत २० फुटाचे रुंदीकरण भविष्यात न. पा. करणार आहे किंवा नाही ? याची माहिती द्यावी.

१४. मुळ रोड रस्ता १०० फुटाचा असतांना सध्या रुंदीकरण ६० फुटाचे होत आहे, उर्वरीत ४० फुट रस्ता मोकळा ठेवण्यात येणार आहे काय ? सविस्तर माहिती द्यावी.

१५. ३० फुट रुंदीकरणानंतर नाली बांधकाम करण्यात येणार आहे किंवा नाही ? माहिती द्यावी.

१६. सदर रोडवरील अतिक्रमणाबाबत माजी आमदार मा. गुरुनाथराव कुरुडे व इतरांनी उच्च न्यायालय औरंगाबाद येथे जनहित याचिका दाखल केली होती, सदर याचिकेत मुख्याधिकारी न. पा. कंधार हे प्रतिवादी होते हे खरे आहे काय ? माहिती द्यावी.

१७. प्रतिवादी म्हणून मुख्याधिकारी न. पा. कंधार यांनी जनहित याचिके अंतर्गत आलेल्या नोटीसच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे सादर केलेल्या लेखी जबाबाची सत्यप्रत देणे.

१८. सदरील जनहित याचिकेत लोहा-कंधार रोडचे न. पा. हद्दीतील उत्तरेकडील सर्व्हे नं. २१/ब मधील कायदेशीर मालकीच्या प्लॉट धारकांची नावे अतिक्रमण यादीत नव्हती, हे खरे आहे काय ? माहिती द्यावी.

१९. सदर जनहित याचिकेची आपणास प्रतिवादी म्हणून आलेल्या प्रतीची झेरॉक्स सत्यप्रत देणे.

२०. सदर जनहित याचिकेत अतिक्रमण नसलेल्या प्लॉट धारकाची जागा आता न. पा. ने मोजमाप केल्यावर अतिक्रमण रेषेत येतात म्हणजे जनहित याचिकेत सादर केलेली अतिक्रमण धारकांची यादी सत्य की, न. पा. ने केलेल्या मोजणीमध्ये अतिक्रमणामध्ये आलेली नावे सत्य आहे ? याची सविस्तर माहिती द्यावी.

२१. न. पा. ने रस्ता रुंदीकरणाअंतर्गत अतिक्रमण धारकाला अतिक्रमण काढून घेणेबाबत लेखी नोटीसा देणे, जाणीवपूर्वक टाळून फक्त भोंग्याव्दारे घोषणा देवून एक प्रकारे अतिक्रमण धारकास तणावाखाली ठेऊन मानसिक व आर्थिक त्रास दिला आहे, हे खरे आहे काय ? व त्याचे काय कारण आहे ? याची सविस्तर माहिती द्यावी.

२२. सदर रस्ता (रोड) बाबत इतर माहिती असल्यास ती देण्यात यावी." अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना हवी आलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये २५ इतके त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक २१-०९-२००६ रोजी प्राप्त झाले. तदनंतर अपिलार्थीने दिनांक २१-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक ते शुल्क त्यांचे कार्यालयात जमा करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २१-०९-२००६ रोजी माहिती हस्तगत करुन घेतली. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत होती. जन माहिती अधिकारी यांना सदर माहिती सार्वजनिक बांधकाम विभागा-कडून प्राप्त झाली नसल्याने अपिलार्थीच्या अर्जातील काही मुद्दयावरील माहिती त्यांना या पत्रामध्ये देता आली नाही.

तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १६-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी, अपूर्ण, गोलमाल व दिशाभूल करणारी माहिती ८ दिवस विलंबाने दिली असल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-११-२००६ व २४-११-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश दिनांक १७-०१-२००७ रोजी पारीत केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली सर्व माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले व त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही भाग त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसेल तर अपिलार्थीचा अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०१-२००७ रोजीच्या दिलेल्या आदेशाप्रमाणे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या

त्यांच्या अर्जाव्दारे उर्वरीत माहितीची मागणी केली. तथापि सदर माहिती अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरीत माहिती ही सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत असून त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे त्यांच्या हद्दीतील रस्त्याचा मोजणी नकाशा मागितला असता सार्वजनिक बांधकाम खात्याने सदर मोजणी नकाशा नगरपरिषदेने त्यांच्या स्तरावर तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाकडून परस्पर प्राप्त करुन घ्यावा असे त्यांना सूचित केले आहे. सदर नकाशा प्राप्त करुन घेण्यासाठी अंदाजे २,५०,००० रुपये खर्च येणार असून नगरपरिषदेची सदर खर्च सहन करण्याची ताकद नाही त्यामुळे त्यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती पुरविता आलेली नाही. सदर रस्त्याची तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाकडून यापुर्वी मोजणी झाली असून प्रश्नाधीन मोजणी नकाशा त्यांच्याकडे तयार आहे. तथापि सदर नकाशा प्राप्त करुन घेण्यापोटी लागणारे शुल्क नगरपरिषद त्यांच्याकडे भरु शकत नसल्यामुळे त्यांना तो अद्याप अप्राप्त आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे यासंदर्भात त्यांनी यापुर्वीच मार्गदर्शन मागितले असून अद्याप सदर मार्गदर्शन अप्राप्त आहे. नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती त्यांच्या कर्मचा-यांचे नियमीत पगार देण्याची देखील नसल्याने रस्त्याच्या मोजणी नकाशाची फी भरणे नगरपरिषदेस अवघड आहे. त्यामुळे सदर मोजणी नकाशा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर तो अपिलार्थीस देण्यात येईल असे सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दाखल केलेल्या दिनांक १६-१०-२००६ रोजीच्या अपिलावर त्यांनी त्यांचे आदेश दिनांक १७-०१-२००७ रोजी पारीत करुन त्यामध्ये अपील मान्य केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता प्रथमतः असे दिसून येईल की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी बरीचशी माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असून ती माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस कंधार नगरपरिषदेतून जाणा-या रस्त्याच्या सीमांकन नकाशाची सत्यप्रत हवी असल्याचे दिसून येते. सदर नकाशाची सत्यप्रत प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस व नगरपरिषदेस निश्चितपणे कोणी अतिक्रमण केले हे ठरविता येईल.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सदर सीमांकन नकाशा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारा आवश्यक निधी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. वास्तविकतः सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर रस्ता हस्तांतरीत होतानांच नगरपरिषदेने सीमांकन नकाशाचा आग्रह सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करावयास हवा होता किंवा या संदर्भातील जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागावर निश्चित करावयास हवी होती. सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नगरपरिषद कंधार कडे झालेल्या हस्तांतरण अहवालामध्ये उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग कंधार यांनी रस्त्याचे ३० मीटर सीमांकन करुन घेणे व सडकेची जागा निश्चित करण्याकरिता तालुका भूमी अभिलेख कंधार यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला असल्याचे स्पष्ट केले आहे. यावरुन सदर रस्ता नगरपरिषदेकडे हस्तांतरणापुर्वीच सार्वजनिक बांधकाम विभागाचा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कंधार यांच्याशी सीमांकन नकाशा प्राप्त करुन घेण्यासंदर्भात पत्रव्यवहार चालू होता हे सिध्द होते. नगरपरिषदेकडे रस्ता हस्तांतरण करतांना रस्त्याचा सीमांकन नकाशा हस्तांतर करणे ही जबाबदारी सार्वजनिक बांधकाम खात्याची होती. तथापि त्यांनी येथे ती जबाबदारी पार

पाडली नसल्याचे दिसून येते. तेव्हा वरील युक्तिवादातून जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे लक्षात घेता सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर रस्त्याचा सीमांकन नकाशा नगरपरिषदेकडे हस्तांतरण करणे उचित राहील असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या अर्जास सर्वसाधारण परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-०९-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे अभिप्रेत होते. तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद त्यांच्याकडील दिनांक १९-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा एकूण ६ दिवस इतक्या विलंबाने दिला आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेली बरीचशी माहिती प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांचेकडून भविष्यातील नियोजन, खुलासे अपेक्षित करणारी होती हाही मुद्दा येथे विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कारवाई करणे योग्य होणार नाही. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिल्याने त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती विनामूल्य द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यापोटी विहित मुदत टळून गेल्यानंतरही २५ रुपये त्यांच्या कार्यालयात भरुन घेण्याची त्यांची कृती चुकीची आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून माहिती देण्यापोटी घेतलले शुल्क रुपये २५ /- हे अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावे. अपिलार्थीस उर्वरीत माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी स्विकृत केलेले रुपये २५ /- हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत अपिलार्थीस परत करावेत.

औरंगाबाद
दिनांक १४-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबू नामदेव गबाळे, रा. भवानीनगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१५८

निर्णय दिनांक : १४-०२-२००८

१ श्रीमती त्रिवेणी पापैय्या गोलकोंडा, : तक्रारदार
घ.नं. ८५५, सुभाषपेठ, कॅन्टोनमेंट,
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा कार्यासन अधिकारी,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्रीमती त्रिवेणी पापैय्या गोलकोंडा (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई श्री. दिनकर धोंडू तिवरेकर तसेच जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई श्री. बाळासाहेब ओंकार हेमाडे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांचे दि. १२.१०.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे अशी तक्रार केली आहे की, त्यांनी अपील क्र. २००६/३७९/०२ च्या संदर्भात दिलेल्या आदेशाची पूर्तता उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत अद्यापही झाली नाही.

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये केलेल्या द्वितीय अपीलाची सुनावणी मुख्य माहिती आयुक्त यांनी दि. १३.९.२००६ रोजी घेऊन या संदर्भातील अपील आदेश त्याच दिवशी पारीत केले आहेत. सदर आदेशामध्ये त्यांनी तक्रारदाराचे अपील फेटाळून लावले आहे. तथापि निकालाच्या विवेचनामध्ये त्यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभागास तक्रारदार यांच्या दि. १०.२.२००१ च्या पत्रावर शक्य तितक्या लवकर उत्तरवादी यांना उत्तर देण्याची सूचना केली होती. मुख्य माहिती आयुक्त यांच्या वरील सूचनांनुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यांचेकडील १७.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारास त्यांच्या दि. १०.२.२००१ च्या पत्रासंदर्भात उत्तर दिले आहे.

तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, सदर पत्राबाबत राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी दि. १३.९.२००६ रोजी आदेशित करुनही उत्तरवादी यांनी सुमारे सहा महिने इतक्या विलंबाने सदर उत्तर दिलेले आहे तसेच सदर उत्तरामध्ये त्यांनी तक्रारदार यांच्या पत्राच्या दिनांकाचा दि. १०.४.२००१ असा चुकीचा उल्लेख केला आहे. या चुकीची दुरुस्ती देखिल त्यांनी दि. ३१.७.२००७ रोजी केली आहे. तक्रारदार यांनी आज सुनावणीचे वेळी उत्तरवादी यांनी त्यांना चुकीचे उत्तर दिले असल्याचे आयोगासमोर आपले म्हणणे मांडले. तक्रारदार यांचे मते सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय त्यांच्या बाजूने लागला आहे, असे असतांनाही उत्तरवादी यांनी शासनाच्या बाजूने लागला असल्याचे तक्रारदारास उद्देशून दिलेल्या दि. १७.३.२००७ रोजीच्या पत्रामध्ये नमुद केले असल्याने सदर उत्तर चुकीचे ठरते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, मुख्य माहिती आयुक्त यांनी दिलेल्या दि. १३.९.२००६ रोजीच्या निर्णयामध्ये तक्रारदारास शक्य तितक्या लवकर उत्तर देण्यात यावे, असे आदेश दिले होते. या आदेशामध्ये निश्चित कालमर्यादा घालून दिलेली नव्हती. तथापि सर्वसाधारण परिस्थितीत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये ३० दिवसांचे आत माहिती देण्याचे बंधन असल्याने मुख्य माहिती आयुक्त यांचे आदेश पारीत झाल्यानंतर जास्तीत जास्त ३० दिवसांचे आत माहिती पुरविणे अपेक्षित आहे. तथापि, या प्रकरणात तक्रारदार यांच्या म्हणण्याप्रमाणे उत्तरवादी यांनी तक्रारदारास उत्तर देण्यास उशिर लावल्याचे दिसत आहे. तक्रारदारास उशिरा उत्तर देऊनही त्या उत्तरामध्ये त्यांनी तक्रारदाराच्या

संदर्भिय अर्जाची दिनांक चुकीची कळविली आहे, या चुकीची दुरुस्ती देखिल त्यांनी प्रथम उत्तर दिल्यापासून सुमारे साडेतीन महिने इतक्या विलंबाने केली आहे. यावरुन उत्तरवादी यांनी तक्रारदारास विलंबाने प्रतिसाद दिल्याचे सिध्द होत आहे. तक्रारदाराच्या वैयक्तिक गाऱ्हयाण्यासंदर्भात प्रलंबित निवेदनावर विभागाने दिलेले उत्तर तक्रारदारास मान्य नसल्यास त्यांनी संबंधित विभागाच्या सचिवांकडे अपील करावे व आपल्या गाऱ्हाण्याची दाद मागावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीवरुन सदर प्रकरण सहसचिव/उपसचिव यांचे स्तरावरच हाताळले गेले असल्याचे दिसत आहे. तक्रारदारास न्याय मिळण्याच्या दृष्टीने उत्तरवादी यांनी त्यांचे विभागाच्या सचिवांचे अभिप्राय घेऊन, त्यानुसार आपले निर्णय तक्रारदारास कळवावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१.तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती त्रिवेणी पापैय्या गोलकोंडा,घ.नं. ८५५, सुभाषपेठ, कॅन्टोनमेंट, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९०७

निर्णय दिनांक १५-०२-२००८

१ श्री. प्रशांत हरिभाऊ शेटे, : अपिलार्थी
३०, महाराष्ट्र हाऊसिंग कॉलनी,
तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड जिल्हा बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी : मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रशांत हरिभाऊ शेटे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी श्री. जयलाल हिरालाल

राजपूत कक्ष अधिकारी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद श्री. विक्रम पोकळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक ३०-११-२००६ ते २६-१२-२००६ या कालावधीतील श्री. हरिभाऊ नाथाजी शेटे यांच्या सेवापुस्तिकेच्या प्रथम पानाच्या प्रतीची मागणी खालील प्रमाणे केली होती.

" शेटे हरिभाऊ नाथाजी हे कारंजा (प्राथमिक शाळा) येथून १९८८ साली सह शिक्षक या पदावरुन सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवा पुस्तिकेच्या प्रथम पानाची साक्षांकीत प्रत पाहिजे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस खालीलप्रमाणे उत्तर दिले आहे.

" वरील प्रमाणे आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे या कार्यालयास श्री. शेटे हरिभाऊ नाथाजी हे कारंजा शाळा येथून सेवानिवृत्त झाल्याचे कळविले आहे. त्यानुसार अभिलेखे उपलब्ध करुन करावाई करण्यात येईल.

तरी सदर स्तरावर प्रकरण निकाली काढण्यात येत आहे."

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या पत्रातील वरील मजकुर पाहता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भा त्यांनी कोणतीही कारवाई न करता अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला आहे असे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १६-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक १४-०२-२००७ रोजी पारीत केले आहे. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यास जबाबदार असलेले त्यांचे वरिष्ठ सहाय्यक यांना दोषी ठरवून त्यांच्यावर एकूण ९५०० रुपयांची शास्ती लावण्याची शिफारस करुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विनामूल्य देण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या त्यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे सर्व अभिलेखे तपासून देखील उपलब्ध होऊ शकली नाही असे कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास जाणीवपूर्वक नकार दिला, माहिती ३० दिवसाच्या आत दिली नाही व २६ फेब्रुवारी २००७ रोजी लेखी पत्र देऊन माहिती देण्यास स्पष्ट नकार देऊन शासकीय दस्तऐवज नष्ट केले असे

समजून त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. वरील विनंतीबरोबरच त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मागितलेल्या माहितीतील व्यक्ती हे त्यांचे वडील असून त्यांच्या वडिलांना शासनाने दिलेले आर्थिक फायदे त्यांना मिळवून देण्याच्या दृष्टीने त्यांनी सदर माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळोवेळी सदर माहिती नाकारली आहे. कोणत्याही कर्मचा-याची सेवापुस्तिका सदर अभिलेखे ''ब'' वर्गात मोडत असल्याने ती ३० वर्षे जतन करुन ठेवणे हे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक आहे. तथापि सदर सेवापुस्तिका उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविले म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा दस्तऐवज नष्ट केला असे समजून त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही प्राप्त झाली नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी (शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद) यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर आडीच महिन्यापुर्वी नव्याने रुजू झाले असून अपिलार्थीने त्यांच्याकडील काही माहिती मागितली असल्याचे त्यांना आयोगाच्या व्दितीय सुनावणीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर प्रथम समजले. आयोगाकडून या प्रकरणाची सुनावणी होण्यासदंर्भात पत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यालयातील १० कर्मचा-यांचे एक पथक निर्माण केले. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा कसोशीने शोध घेतल्यानंतर सदर सेवापुस्तिका त्यांच्याकडील भांडार शाखेत दिनांक ०८-०२-२००८ रोजी आढळून आली. सदर सेवापुस्तिका आढळून

येताच त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला आहे. दिनांक १३-०२-२००८ रोजी अपिलार्थी यांच्या घराला कुलूप असल्याने ही माहिती त्यांना अपिलार्थीस देता आली नाही. दिनांक १३-०२-२००८ रोजी अपिलार्थी हे बाहेरगावी गेले होते. तदनंतर त्यांनी सदर माहिती अपिलार्थीस दिनांक १४-०२-२००८ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविली आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली असल्याने ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः होऊन सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता किती वेळा गेले व यासंदर्भात त्यांच्याकडे काय पुरावा उपलब्ध आहे काय असे विचारले असता त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते वारंवार गेले होते तथापि ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेल्याचा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही, असे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी आणि अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ३०-११-२००६ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये जो प्रतिसाद दिला आहे त्यावरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात निश्चितपणे काय म्हणावयाचे होते हे समजून येत नाही, किंबहुना या पत्रातील त्यांच्या बेजबाबदार विधानावरुन त्यांचा अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारण्याकडे कल असावा असे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविले आहे. अपिलार्थीने सेवापुस्तिका जतन करुन ठेवण्याच्या कालावधी संदर्भात

उपस्थित केलेला मुद्दा या ठिकाणी ग्राह्य धरण्यात येत आहे. कोणाही कर्मचा-याच्या सेवापुस्तिकेची प्रत ही "ब" या प्रवर्गात मोडत असल्याने व या प्रवर्गातील अभिलेखे जतन करण्याचा कालावधी ३० वर्षाचा असल्याने जन माहिती अधिकारी यांचे त्यांच्याकडील सर्व कर्मचा-यांच्या सेवापुस्तिका या कालावधीमध्ये जतन करणे हे प्राथमिक कर्तव्य ठरते. तथापि त्यांनी उपरोक्त प्रकरणी श्री. शेटे हरिभाऊ नाथाजी यांची सेवापुस्तिका नीट जतन न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती शोधण्याचा त्यांनी सुरुवातीपासूनच जर कसोशीने प्रयत्न केला असता तर त्यांना अपिलार्थीस ही माहिती विहित कालावधीत पुरविता येणे सहज शक्य होते. संबंधीत जन माहिती अधिकारी बदलल्यानंतर जे जन माहिती अधिकारी नव्याने रुजू झाले त्यांनी मात्र आयोगाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या कार्यालयातील भांडार शाखेत कसोशीने शोध घेऊन अपिलार्थीने मागितलेल्या सेवापुस्तिकेची प्रत शोधून काढली. हीच कारवाई तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना करता येणे सहज शक्य होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केलेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणी निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक या दोघांनाही संपूर्ण प्रकरणात दोषी ठरविले आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १५-०२-२००८ रोजी माहिती प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस सदर माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त झाली नाही आणि ज्यावेळी प्राप्त झाली त्यावेळी ती असमर्थनीय विलंबानंतर, हे या ठिकाणी निःसंशयपणे सिध्द होत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक या दोघांनीही अपिलार्थीस माहिती देण्याप्रीत्यर्थ

लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी वर म्हटल्याप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल सचिव (शालेय शिक्षण) यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांचेवर, प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे, यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल तदनंतर १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी अपिलार्थीस माहिती देण्याप्रीत्यर्थ लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये त्यांना विलंबाच्या

प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल सचिव (शालेय शिक्षण) यांनी त्यांचेवर, प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे, यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल तदनंतर १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक १५-०२-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रशांत हरिभाऊ शेटे, ३०, महाराष्ट्र हाऊसिंग कॉलनी, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. आर. एस. मोगल, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड)

४ श्री. ए. पी. लहुरीकर, वरिष्ठ लिपीक, तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड)

५ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९०८

निर्णय दिनांक  १५-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. चंद्रकांत व्यंकटेश ढोले,<br>"ऋग्वेद" घर नं. ११३, रामकृष्ण नगर,<br>परभणी, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, हिंगोली,<br>जिल्हा हिंगोली | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली,<br>जिल्हा हिंगोली | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. चंद्रकांत व्यंकटेश ढोले (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार हिंगोली श्री. ठाकूर नारायणसिंग बंकटसिंग, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल),  जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री. प्रकाश पिरतवाड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व

त्रयस्त पक्षकार श्री. वासुदेव नारायण सहस्त्रबुध्दे (यापुढे त्यांना त्रयस्त पक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे आमला तालुका हिंगोली येथील जमिनी-संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" मौजे आमला ता. हिंगोली येथील केशवराव देऊळगावकर यांचे १६-७-१९५९ ते १९-१०-१९७२ पर्यत, तुकाराम डुकरे रा. आमला हे स. नं. ४३/२ चे साधे कुळ होते अथवा नव्हते याबाबत वरील प्रमाणे माहिती देणे. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील या सदरा पुढे अपिलार्थीने खालील प्रमाणे नोंद केली आहे. " कुळ असल्यास " तसी सत्यप्रत आणि कुळ नसल्यास तसा " दाखला "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे, अपिलार्थीस त्यांच्याकडील अभिलेख कक्षाचे निरिक्षण करुन त्यांना हवी असलेली माहिती नियमानुसार शुल्क भरुन प्राप्त करुन घेण्याचे सुचविले व अपिलार्थीचा अर्ज फेटाळला.

जन माहिती अधिकारी यांच्याकडील वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले असून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थीने तहसीलदार हिंगोली येथील अभिलेखाचे निरिक्षण करुन हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित करुन अपिलार्थीचे अपील दिनांक २८-०२-२००७ रोजी निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत त्यांना प्राप्त झाली नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ०६-०३-२००७ रोजी तार केली होती. त्या तारेची प्रत त्यांनी या अपिलासोबत जोडली होती. अपिलार्थी यांनी आयोगाकडे अपील दाखल केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय दिलेला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचाअर्ज फेटाळण्यात आला असल्याचे निर्देशीत केले आहे तर त्यानंतरच्या परिच्छेदामध्ये अपिलार्थीस माहिती नाकारण्यात आली नाही असे म्हटले आहे. अशाच प्रकारच्या इतर प्रकरणी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसारखी माहिती त्यांना देण्याबाबत इतर प्राधिकरणाकडून त्यांना आदेश प्राप्त झालेले आहेत. अशाच प्रकारच्या प्रकरणात निर्णय होऊन त्यांना संबंधितांकडून माहिती उपलब्ध नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने त्यांना सदर माहिती जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील अभिलेख्याची पाहणी करुन देखिल उपलब्ध होऊ शकणार नाही. तथापि सदर माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही अशा अर्थाचे प्रमाणपत्र त्यांनी अपेक्षित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाचा निर्णय दिनांक २९-०३-२००७ रोजी पोस्टाने पाठविला तो त्यांना दिनांक ३०-०४-२००७ रोजी प्राप्त झाला. यावरुन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे

अपील केलेल्या दिनांकानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी या निर्णयाची प्रत त्यांना पाठविल्याचे सिध्द होते असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक १७-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्याने ती त्यांना देता येत नसल्याचे कळविले. मुळात अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात येत असल्याने त्यांचे अपील ग्राह्य धरण्यात येत नाही. अपिलार्थी हे वारंवार कागदपत्राची मागणी करत असल्याने व अपिलार्थीस त्यांनी हिंगोली - तहसील कार्यालयातील सर्व अभिलेख्यांचे निरिक्षण करण्याची संधी देखील दिली होती. सदर संधी अपिलार्थीस देऊनही अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात हजर झाले नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये फक्त उपलब्ध असलेली माहिती देणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. नव्याने माहिती तयार करुन देण्याची कायद्यात तरतूद नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात आहे. ती माहिती या अधिनियमातील व्याख्येशी जुळत नाही. अपिलार्थीस अपेक्षित असलेला दाखला हा कुळाशी संबंधीत असल्याने संबंधीत कायद्यान्वये तहसीलदार हिंगोली यांच्याकडे अपिलार्थीने वेगळा अर्ज करुन यासंदर्भात निर्णय प्राप्त करुन घ्यावा. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती शोधण्यासाठी त्यांचे व तहसील कार्यालयातील संपूर्ण अभिलेखे अपिलार्थीने ज्या ज्या वेळी मागणी करतील त्या त्या वेळी उपलब्ध राहतील अशा प्रकारच्या सूचना त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या अपील निर्णयामध्ये देखील दिल्या आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे प्रश्नोत्तराच्या स्वरुपातील आहे हा जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दा बरोबर आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेला, ते कुळ नसल्याचा दाखला जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देऊ शकत नाहीत. सदर दाखला अपिलार्थीस हवा असल्यास त्यांनी हैद्राबाद कुळ कायदा १९५० मधील तरतुदीनुसार संबंधीत तहसीलदार यांच्याकडे अर्ज करावा व त्यांच्याकडून तो प्राप्त करुन घ्यावा असे जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे जरी खरे असले तरी अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यास त्यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावयास काहीही हरकत नाही असे आयोगाचे मत आहे. मात्र अपिलार्थी हे कुळ असल्याचा / नसल्याचा कोणत्याही प्रकारचा दाखला जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आज रोजी तयार स्वरुपात उपलब्ध नाही. अपिलार्थी यांना दाखला हवा असल्यास तो त्यांना हैद्राबाद कुळ कायद्यामधील तरतुदीनुसार मिळू शकतो. अपिलार्थीने उपरोक्त प्रकरणी मागणी केलेली माहिती ही नव्याने तयार करुन द्यावयाची असल्याने ती "उपलब्ध माहिती" या सदरात मोडत नाही.

सबब माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या त्यांच्या कुळाच्या स्वामित्वाच्या दाखल्यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे हैद्राबाद कुळ कायदा १९५० खाली वेगळा अर्ज करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १५-०२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत व्यंकटेश ढोले, "ऋग्वेद" घर नं. ११३, रामकृष्ण नगर, परभणी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९०९

निर्णय दिनांक १५-०२-२००८

१ श्री. सागरभाई कुंडलीकराव दळवी, : अपिलार्थी
रा. समतानगर, गंगापूर,
तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार, गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सागरभाई कुंडलीकराव दळवी हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार सौ. सविता मनोज चौधर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री. पिराजी लक्ष्मण सोरमारे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ऑक्टोंबर २००५ ते ११-०९-२००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यायात माहितीच्या अधिकाराखाली विविध विभागात किती जणांनी अर्ज केले व इतर माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

“ १. माहितीचा अधिकाराचा कायदा अस्तित्वात आल्यापासून आपल्या कार्यालयाकडे माहितीच्या अधिकाराखालील एकूण किती अर्ज आज तारखेपर्यत आले ? त्या सर्व अर्जाच्या सर्टिफाईड सत्यप्रती मिळणे बाबत.

अ) माहितीच्या अधिकाराखाली एकूण किती अर्ज दाखल झाले ?

ब) त्यापैकी किती अर्जावरते मुदतीत कार्यवाही करुन संबंधितांना माहितीच्या कालावधीत पुर्ण माहिती दिली त्यांची नांवे, पत्त्यानिशी यादी मिळणेबाबत.

क) तसेच एकूण अर्जापैकी किती अर्ज पेन्डींग आहेत ? त्यांची नांव, पत्त्यानिशी यादी मिळणेबाबत.

ड) सदरील अर्जापैकी किती जणांना अपूर्ण माहिती दिली व किती जणांना अजून माहितीची दिली नाही त्यांची नांव, पत्त्यानिशी यादी मिळणेबाबत.

२. अपिलीय प्राधिकारी यांच्याकडील प्रकरणाबाबतची खालील प्रमाणे माहिती मिळणेबाबत.

अ) किती अर्जदारांनी माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहिती न मिळाल्या-बाबत अथवा माहिती अपूर्ण मिळाल्याबाबत अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे किती प्रकरणात अपील दाखल झाले ? त्यांची संख्या व त्या अपिलार्थीच्या अपिलीय प्रतीची सत्यप्रती मिळणेबाबत.

ब) सदरील अपिलापैकी किती प्रकरणात अपिलीय प्राधिकारी यांनी निर्णय दिला ? त्या निर्णयाच्या सत्यप्रती मिळणेबाबत.

क) तसेच अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अजुन किती प्रकरणे प्रलंबीत आहेत त्यांची नांव, पत्त्यानिशी यादी मिळणेबाबत.

३. दुसरे आपलेट प्राधिकारी यांच्याकडील प्रकरणाबाबतची खालील प्रमाणे माहिती मिळणेबाबत.

अ) किती अपिलार्थींनी अपिलीय प्राधिकारी यांचे विरुध्द माहिती न मिळाल्याबाबत अथवा माहिती अपूर्ण देऊन निर्णय दिल्याबाबत किती अशा प्रकरणात अपील दाखल झाले ? त्यांची संख्या व त्या अपिलार्थीच्या अपिलीय प्रतीची सत्यप्रती मिळणेबाबत. (गंगापूर तहसिल कार्यालयातील अंतर्गत असलेल्या माहितीबाबत)

दुसरे आपलेट प्राधिकारी यांच्याकडे दाखल झालेल्या प्रकरणापैकी किती प्रकरणात निर्णय (निकाल) लागलेला आहे काय ? असल्यास त्याबाबतची माहिती मिळणेबाबत. (निकालाची सत्यप्रतीची प्रत मिळणेबाबत)" अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या वरील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या साक्षांकीत प्रती संदर्भात अपिलार्थीस, काही माहिती देऊन "अर्जाच्या साक्षांकीत प्रती हव्या असतील तर नियमाप्रमाणे होणारी फी जमा करुन माहिती हस्तगत करावी. आपण माहिती व्यक्तिशः स्वतः हजर होऊन प्राप्त करावी. अपील झालेले एकही प्रकरण या कार्यालयात नाही." असे अपिलार्थीस याच पत्राव्दारे पुढे कळविले आहे.

अपिलार्थीस सदर पत्र दिनांक १९-१०-२००६ रोजी प्राप्त झाले. सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविण्याची विनंती केली आहे. या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेले प्रती पृष्ठ १० रुपये फी असे कळविल्याबद्दल आक्षेप घेऊन त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे निश्चित किती फी भरावयाची याची विचारणा केली आहे. तद्वतच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेले दिनांक ०९-१०-२००६ रोजीचे पत्र त्यांना वाचता येत नाही व काही बोध होत नाही असे या पत्रामध्ये म्हटले आहे. तसेच येथून पुढे सुवाच्च अक्षरात जन माहिती अधिकारी यांनी पत्रव्यवहार करण्याची त्यांनी या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २७-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणले आहे की, जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत व चलनाव्दारे पैसे स्विकारत नाहीत. या पत्रात पुढे त्यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, त्यांच्या कार्यालयाचे एकही प्रकरण प्रलंबीत नसल्याचे दिशाभूल करणारे विधान केले आहे. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी हे त्यांच्यापासून खरी माहिती लपवीत आहेत असा निष्कर्ष काढला आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०१-२००७ रोजी व दिनांक ११-०१-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले

आदेश दिनांक ११-०१-२००७ रोजी पारीत केले आहेत. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली सर्व माहिती पुरविण्याचे आदेश देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. अपिलार्थीस सदर माहिती सशुल्क अथवा विनामूल्य देण्याबाबत त्यांच्या वरील निर्णयामध्ये त्यांनी कोणतेही भाष्य केले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये स्मरणपत्र दिले. अपिलार्थीच्या या स्मरणपत्रास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये परत अपिलार्थीस जिल्हाधिकारी यांनी १० रुपये असा दर निश्चित केल्याचे कळविले व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीप्रीत्यर्थ २०२ रुपये त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०६-०२-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पावती क्रमांक ०५१३८२ या क्रमांकाच्या पावतीने २०२ रुपये इतक्या फीचा भरणा केला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०१-२००७ रोजी लिहिलेली दोनही पत्रामधील मजकूर एकसारखा असून अपिलार्थीस कळविण्यात आलेल्या दरामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस कळविलेल्या एकूण शुल्काच्या रक्कमेमध्ये व माहितीच्या प्रती पृष्ठ दरामध्ये खाडाखोड केल्याचे दिसून येते. सदर खाडाखोड साक्षांकीत नसल्याने ती अवैध ठरविण्यात येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २९-०१-२००७ रोजी आवश्यक इतके शुल्क भरल्यानंतर अपिलार्थीस दिनांक ०६-०२-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असे त्यांनी युक्तिवादाच्या वेळी सांगितले.

सदर माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या पत्रावर माहिती अपूर्ण असल्याच्या अभिप्रायासह पोच दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन व त्यांच्याकडून आवश्यक माहिती देण्यापोटी जन माहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन घेतलेले रुपये २०२ /- हे बेकायदेशीररित्या घेतल्याचे वाटल्यामुळे व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांचे जे लेखी म्हणणे मांडले आहे, तोच त्यांचा युक्तिवाद आहे असे समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये म्हणजेच विहित मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली आहे व उर्वरीत माहिती प्राप्त करुन घेण्याप्रीत्यर्थ त्यांना नियमाप्रमाणे आवश्यक ती फी जमा करण्याचे सूचित केले. अपिलार्थीपासून माहिती लपविण्याचा किंवा ती देण्यास टाळाटाळ करण्याचा त्यांचा काहीही हेतू नव्हता. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक ११-०१-२००७ रोजीच्या आदेशामध्ये " अर्जाच्या साक्षांकीत प्रती नियमाप्रमाणे होणारी फी जमा करुन माहिती हस्तगत करावी " हे वाक्य असल्याने व या वाक्याचा संदर्भ त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाशी लावल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-

०१-२००७ रोजीच्या पत्राप्रमाणे २०२ रुपयाचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी त्यांचे दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या पत्रामध्ये उल्लेख केलेल्या जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी निश्चित केलेल्या १० रुपयाच्या दरासंबंधी विचारले असता त्यांनी असे सांगितले की, जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यावेळी साक्षांकीत प्रतीकरिता रुपये १० प्रती दर लावण्यात यावा अशा अर्थाचे परिपत्रक जारी केले होते. सदर परिपत्रकाची प्रत आज त्यांच्याकडे उपलब्ध नाही व परिपत्रकाच्या सूचनेप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे घ्यावयाच्या माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ १० रुपये प्रमाणे दर कळविला आहे परंतु एकूण रक्कम रुपये २०२ /- इतकीच कळविली आहे. अपिलार्थीस दिनांक ०६-०२-२००७ रोजी पुरविण्यात आलेल्या प्रती साक्षांकीत नसल्यासंदर्भात त्यांना काहीही माहिती नाही असे त्यांनी आयोगापुढे स्पष्ट केले. अपिलार्थीने त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयासंबंधातील माहिती पुरविली नाही. अपिलार्थीस त्यांनी पूर्ण माहिती दिली असल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळावे अशी त्यांनी आयोगाकडे त्यांच्या युक्तिवादाच्या शेवटी विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय देतांना ते जन अपिलीय अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. तत्कालीन उपविभागीय अधिकारी श्री. उध्दव घुगे यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय दिलेला आहे. अपिलार्थीने माहिती मागतेवेळी माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी नव्याने सुरु झाली असल्याने कायद्यातील तांत्रिक तपशीलाचे ज्ञान त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांना नव्हते.

त्यांच्या कार्यालयात आवश्यक असलेले कर्मचारी भरले गेले नसल्याचे व असलेल्या नवीन कर्मचा-यांचा दर्जा अद्याप समाधानकारक पातळीपर्यंत पोहोचला नसल्याने त्यांना या कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात अडचणी येत आहेत. अपिलार्थी यांना माहिती न देण्यामागे जन माहिती अधिकारी यांचा कोणताही असद्हेतू होता असे त्यांना वाटत नाही. केवळ अधिनियमातील तरतुदींची त्यांना पुरेशी जाण नव्हती.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येईल की, अपिलार्थीने मुलतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे संपूर्ण माहितीच्या प्रती ''सर्टिफाईड सत्यप्रती'' म्हणून मागितल्या होत्या, याचाच अर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती साक्षांकीत करुन हवी होती. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी केलेल्या दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात जरी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी या पत्रामध्ये त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदींचे पालन केल्याचे दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) मध्ये अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जाचा निपटारा किती मुदतीत व कशा प्रकारे करावयाचा याचा सविस्तर खुलासा केला आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त नियमाप्रमाणे होणारी फी त्यांच्या कार्यालयात जमा करुन माहिती हस्तगत करण्याची सूचना केली आहे. तथापि अपिलार्थीस देण्यात येणारी माहिती अंदाजे किती पृष्ठांची आहे व सदर माहिती देण्याचा प्रती पृष्ठ दर किती याचा उल्लेख त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या पत्रामध्ये केलेला नाही. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे पाठविलेले दिनांक ०९-१०-२००६ रोजीचे पत्र

नीट वाचता येत नाही. सदर पत्राची प्रत पाहता अपिलार्थीच्या म्हणण्यामध्ये तथ्यांश दिसून येतो. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-११-२००६ रोजी दाखल केलेल्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०१-२००७ रोजी आपले आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती सशुल्क द्यावी किंवा कसे याचा कोणताही उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीस माहिती कशी द्यावी याचा उल्लेख त्यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये दिला नसल्याने त्यांचा अपील निर्णय काहीसा सदोष ठरतो. त्यांच्या निर्णयातील एका वाक्याचा संदर्भ जन माहिती अधिकारी यांनी चुकीचा लावून अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये रुपये २०२ /- भरण्यास सांगितले. वास्तविकतः अपिलार्थीस माहिती देण्याची विहित मुदत टळून गेली असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस विनामूल्य माहिती प्राप्त होणे हा त्याचा हक्क आहे असे आयोग मानतो. अपिलार्थीस माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी फक्त त्यांच्या कार्यालयाकडील माहिती पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी निम्मी माहिती उपविभागीय अधिकारी -- जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत त्यांच्या -- कार्यालयाशी संबंधीत होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) प्रमाणे कारवाई करणे अपेक्षित होते. त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा जो भाग उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंध होता त्याची प्रत उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांच्या कार्यालयास अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवावयास हवी होती. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती त्यांनी येथे केल्याचे आयोगास आढळून येत नाही.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१), कलम ६ (३) (i) व कलम ७ (६) चा भंग केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने अपील अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती देण्याचे टाळले असे नमूद केले आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांना केलेल्या प्रथम अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना नगरपालिकेच्या निवडणूकाचे कारण सांगून निवडणूक पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण माहिती देण्याचे आश्वासन दिले व निवडणूक पूर्ण झाल्यानंतर अपिलार्थी परत त्यांच्याकडे गेले असता माहिती देण्यास इन्कार दिला व माहिती पोटी लागणारे आवश्यक ते शुल्क स्विकारण्यास नकार दिला त्यामुळे जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याचे म्हटले आहे. तथापि त्यांच्या या विधानाचे समर्थन करण्यासाठी ते आज उपस्थित नाहीत किंवा जन माहिती अधिकारी यांच्याशी वैयक्तीक संपर्क साधल्याचा कोणताही पुरावा अपिल अर्जासोबत जोडला नसल्याने आयोग त्यांचा हा मुद्दा ग्राह्य धरत नाही. त्याचबरोबर हे संपूर्ण प्रकरण हाताळणारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i), कलम ७ (1) व कलम ७ (६) चा निःसंशयपणे भंग केल्याचे दिसून येत आहे. या कलमांचा भंग करुन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या, जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमाचे, सदर अधिनियमाची अंमलबजावणी त्यावेळी नव्याने सुरु झाली असल्याने आवश्यक ते तांत्रिक ज्ञान नव्हते या दाव्यात सकृतदर्शनी जरी काहीसा तथ्यांश वाटत असला तरी कायद्याचे अज्ञान हे कारण त्यांच्या या चुकीचे समर्थन करु शकत नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी वर म्हटल्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील कलमांचा भंग केला हे सत्य शेवटी उरत आहे. त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या

कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, सचिव, (महसूल) यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी वरील प्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत पाठवावा. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, उर्वरीत माहिती उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २० दिवसाच्या आत साक्षांकीत करुन विनामूल्य पुरवावी. त्याचबरोबर अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरलेले शुल्क रुपये २०२ /- हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करावे व आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती वर निर्देशीत केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत साक्षांकीत करुन विनामूल्य पुरवावी.

३. सचिव, (महसूल) यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावी व तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी, माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी दिनांक ०६-०२-२००७ रोजी पावती क्रमांक ०५१३८२ अन्वये अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात भरलेले शुल्क रुपये २०२ /- हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक १५-०२-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सागरभाई कुंडलीकराव दळवी, रा. समतानगर, गंगापूर, तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (महसूल) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१६३

निर्णय दिनांक : १५-०२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती संध्या बाबूराव बाविस्कर,<br>हरीहर, २२२, एन-३, सिडको, औरंगाबाद | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, ता.जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्रीमती संध्या बाबूराव बाविस्कर यांचे प्रतिनिधी ॲड. बी.एस.बावीस्कर (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद श्री. ब्रिजेश लक्ष्मणराव जाधव ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांचेकडील दि. १८.०९.२००६ रोजीच्या अर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, मुख्य माहिती आयुक्त यांनी त्यांचे अपीलावर दि. ११.७.२००६ रोजी उत्तरवादी यांनी तक्रारदारास माहिती देण्याचे आदेशित केले होते तथापि मुख्य माहिती आयुक्त यांनी असे आदेश पारीत केल्यानंतरही उत्तरवादी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती न दिल्यामुळे त्यांनी मुख्य माहिती आयुक्तांची दि. २२.८.२००६ रोजी समक्ष भेट घेऊन त्यांना ही वस्तुस्थिती अवगत केली व त्यांचे तोंडी निर्देशावरुन त्यांनी उत्तरवादी यांचेकडे दि. २४.८.२००६ च्या पत्रान्वये सदर माहिती

त्यांना दहा दिवसात  द्यावी, अशी विनंती केली.  सदर पत्र त्यांनी उत्तरवादी यांना रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले आहे. एवढे होऊनही आजतागायत उत्तरवादी यांनी त्यांना आजपर्यन्त कोणतीही माहिती दिली नाही. तक्रारदार यांनी त्यांनी मागितलेली माहिती उत्तरवादी यांनी अद्याप न देऊन त्यांनी व संबंधित गृहनिर्माण संस्था यांनी, आपल्यावरील जबाबदारी टाळली असल्याने त्यांचेवर कठोर कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. थोडक्यात, तक्रारदार यांनी हरतऱ्हेने प्रयत्न करुनही, त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून उत्तरवादी यांनी, तक्रारदाराच्या मते, हेतूपुरस्सर, संगनमताने वंचित ठेवले असल्याने, त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्याची तसेच त्यांनी अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त करुन देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये तक्रारदाराच्या दि. २७.१०.२००५ रोजीच्या मूळ माहितीच्या अर्जासंदर्भात, मुख्य माहिती आयुक्त यांनी दि. १५.७.२००६ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सदर निर्णयामध्ये मुख्य माहिती आयुक्त यांनी जन अपिलीय अधिकारी यांचे अपील निर्णयाशी सहमती दर्शवून  उत्तरवादी यांनी संबंधित गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बोलावून संस्थेने तक्रारदारास माहिती दिली किंवा कसे, याची चौकशी करुन आयोगास अहवाल सादर करावा, असे आदेशित केले होते. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व आज सुनावणीचे वेळी उपस्थित असलेल्या उत्तरवादी यांना विचारले असता मुख्य माहिती आयुक्त यांचे आदेशाचे पालन त्यांनी अद्यापही केलेले नाही. उत्तरवादी यांनी आयोगास आज सुनावणीचे वेळी असे सांगितले की, त्यांनी तक्रारदार यांना अपेक्षित असलेली माहिती मिळण्यासंदर्भात तक्रारदार यांनी त्यांना दि. १२.१०.२००६ रोजी पत्र दिले होते. या पत्रास त्यांनी त्यांचेकडील ३०.१२.२००६ रोजी योग्य ते उत्तर दिले आहे. तथापि तक्रारदार यांचे असे म्हणणे पडले की, उत्तरवादी यांनी त्यांना दि. ३०.१२.२००६ रोजी दिलेल्या उत्तराशी त्यांनी मूळ अर्जाच्या दि. २७.१०.२००५ रोजी केलेल्या अर्जाचा कोणताही संबंध नाही. त्यांना अद्यापही त्यांचे दिनांक २७.१०.२००५ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्र. ६ ते १० संदर्भात उत्तरवादी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

या प्रकरणाची पार्श्वभूमी पाहिली असता, असे दिसून येते की, तक्रारदार हे शिवनेरी सहकारी गृहनिर्माण संस्था, औरंगाबाद या संस्थेचे संस्थापक सदस्य असून, त्यांनी औरंगाबाद येथे सहा एकर जमिन सभासदांसाठी घरे बांधण्यासाठी खरेदी केली होती. तथापि संस्थेचे पदाधिकारी चेअरमन, सचिव यांनी तक्रारदाराची व इतर सदस्यांची संमती न घेता कथित खोटी कागदपत्रे जमा करुन ती जमीन परस्पर विक्री

करुन सदस्यांची फसवणूक केली असून या संदर्भात माहिती मिळण्यासाठी तालुका उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचेकडे दि. २७.१०.२००५ रोजी काही कागदपत्रांची मागणी केली होती. तक्रारदाराच्या या अर्जास उत्तरवादी यांनी त्यांचेकडील दि. १०.११.२००५ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती दिली व उर्वरित माहिती संस्थेच्या माहिती अधिकारी तथा अध्यक्ष यांचेशी संपर्क साधून घेण्याची सूचना केली. या संदर्भात तक्रारदार यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १४.१२.२००५ रोजी अपील केले. या अपीलावर जन अपिलीय अधिकारी यांनी उत्तरवादीस तक्रारदार यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती त्वरित उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. तथापि उत्तरवादी यांनी तक्रारदारास कोणतीही माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.२.२००६ रोजी द्वितीय अपील केले. या अपीलाच्या सुनावणीमध्ये निर्णय होऊन जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश ग्राहय धरुन उत्तरवादी यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बोलावून घेऊन संबंधित संस्थेने अर्जदारास माहिती दिली किंवा कसे याची चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. तथापि यावर उत्तरवादी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, संस्थेने जमीन विक्रीचा प्रस्ताव तालुका उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचे कार्यालयात सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव निश्चितपणे उत्तरवादी यांचे कार्यालयात असल्याबाबत आयोगासमोर त्यांनी कोणताही पुरावा सादर केला नाही. उत्तरवादी यांनी तक्रारदारास आवश्यक असलेली माहिती त्यांचे कार्यालयात शोधून सात दिवसांचे आत तक्रारदारास देण्याचे कबूल केले आहे.

सबब असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी तक्रारदाराच्या मूळ अर्जातील माहिती पैकी मुद्दा क्र. ६ ते १० च्या संदर्भातील माहिती तक्रारदार यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य द्यावी. जर ही माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसेल तर संबंधित गृहनिर्माण संस्थेकडील या विषयावरील उपलब्ध असलेले सर्व अभिलेख मागवून त्यावरुन तक्रारदारास हवी असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी उत्तरवादी यांनी तक्रारदारास विहित मुदतीत माहिती दिली नाही, मुख्य माहिती आयुक्त यांनी आदेश देऊनही त्या आदेशाचा अनुपालन अहवाल राज्य माहिती आयोगाकडे पाठविला नाही. त्यांची ही कृती त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव दर्शवित आहे. सबब विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी संबंधित

तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांचेवर हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याचे आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल सादर करावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१.तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. उत्तरवादी यांनी तक्रारदाराच्या मूळ अर्जातील माहिती पैकी मुद्दा क्र. ६ ते १० च्या संदर्भातील माहिती तक्रारदार यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य द्यावी. जर ही माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसेल तर संबंधित गृहनिर्माण संस्थेकडील सर्व अभिलेखे मागवून त्यावरुन तक्रारदारास हवी असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती संध्या बाबूराव बाविस्कर, हरीहर, २२२, एन-३, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.